# लोकसाहित्य संशोधन पद्धती

लेखक
**डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे**
माजी प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
पेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर

**चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद**

**लोकसाहित्य संशोधन पद्धती**
**Loksahitya Sanshodhan Paddhati**

**ISBN - 978 - 93 - 94662 - 43 - 8**

**लेखक**
डॉ. अनिल सहस्रबुद्धे
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष- ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

**प्रकाशक / मुद्रक**
चिन्मय प्रकाशन
औरंगाबाद

**तृतीयावृत्ती :** २०२३

© **सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**

**अक्षरजुळणी :** श्रीपाद कुलकर्णी,
अहमदनगर. मो. ९८५०२३२८९०

**मूल्य २००/-**

# हे वाचून पुढे जावेसे...

'लोकसाहित्य संशोधन पद्धती' हे पुस्तक संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक, व विद्यार्थी या सर्वांच्या हाती देताना विशेष आनंद वाटतो.

लोकसाहित्य हे स्वतंत्र व व्यापक अभ्यासक्षेत्र आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे. मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, सामाजिक शास्त्रे, तत्त्वज्ञान, नीती, धर्म, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भाषाशास्त्र अशा सर्व शास्त्रांच्या- एवढेच नव्हे तर भौतिकशास्त्राच्या दृष्टीनेही लोकसाहित्याचा अभ्यास पायाभूत सामग्री म्हणून उपयुक्त ठरतो, हेही सर्वसंमत झाले आहे. स्वाभाविकच सर्व क्षेत्रातील अभ्यासकांचे लक्ष लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वेधले गेले आहे. जागतिक अभ्यासक्षेत्राचा विचार करता अद्यापही लोकसाहित्याचा पद्धतशीर अभ्यास करण्याचा प्रयत्न चाचपडत जाण्याच्या स्थितीतच आहे.

आपल्याकडे लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे उशिरा लक्ष गेले आहे. लोकसाहित्याचा अभ्यास अगदीच दुय्यम स्तरावर- कलाशाखेअंतर्गत, पदव्युत्तर स्तरावर प्रांतभाषेच्या ललित साहित्याच्या अभ्यासाबरोबर एक पर्यायी प्रश्नपत्रिका म्हणून, उदा. महाराष्ट्रातील विद्यापीठात एम. ए. मराठीच्या आठ प्रश्नपत्रिकेतील एका प्रश्नपत्रिकेस पर्यायी प्रश्नपत्रिका म्हणून, एवढाच मर्यादेत केला जातो. या गोष्टींमुळे पद्धतशीर अभ्यास तर सोडाच परंतु अनेक गैरसमज मात्र निर्माण झाले आहेत. त्यातील ठळक गैरसमज म्हणजे - (१) लोकसाहित्य एक साहित्य प्रकार आहे असे वाटणे. (२) लौकिक साहित्यालाच लोकसाहित्य समजून चर्चा होणे. (३) ग्रामीण, दलित, आदिवासी लोकांच्या बोलीभाषेतील पारंपरिक कथा, गीते इत्यादींनाच केवळ लोकसाहित्य समजणे इत्यादी. हे गैरसमज अभ्यासकांच्या अपुऱ्या प्रयत्नांमुळे व विशिष्ट भाषिक

ललित साहित्याभ्यासांतर्गत परीक्षेच्या दृष्टीने अभ्यासाची परंपरा निर्माण झाल्याने झाले आहेत हे स्पष्ट आहे.

हे व असे गैरसमज दूर व्हावेत, लोकसाहित्याच्या अभ्यास व संशोधनास सुव्यवस्थित व सुसूत्र दिशा मिळावी या दृष्टीने 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' नेटकेपणाने मांडली जावी असा आग्रह प्रा. वसंत दावतर यांनी धरला. कै. अ. का. प्रियोळकर व्याख्यानमालेच्या निमित्ताने 'मराठी संशोधन मंडळ' आणि 'मुंबई विद्यापीठ' यांच्या संयुक्त विद्यमाने विविध विषयांवर ठोस व मूलगामी विचार व्यक्त करणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली. या व्याख्यानमालेत 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' मांडण्याची जबाबदारी प्रा. दावतर यांनी माझ्यावर टाकली. त्या निमित्ताने हा प्रयत्न घडला. १९७६ पासून केलेला लोकसाहित्याचा अभ्यास, 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंध सिद्धीसाठी घडलेला क्षेत्रीय अभ्यास, गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे यांच्याशी सतत होणारी चर्चा, विविध अभ्यासकांनी या संदर्भात केलेला विचार, यातून 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' हा निबंध सिद्ध झाला आहे. सुरुवातीचा प्रयत्न आहे. या दृष्टीने संशोधन पद्धतीची मांडणी अतिशय उपयुक्त हा ठरणार आहे असा विश्वास वाटतो.

मिथक (Myth) (दैवतकथा) हे लोकप्रकटीकरण मानवी जीवनाच्या सर्वांगे जीवन प्रवासाचे, जीजीविशेचे, स्थैर्याचे, धारणेचे मूल स्रोत आहे. एकूण जीवनाची उभारणीच या दैवतकथांवर आहे, याविषयी थोडेसे अंतर्मुख होऊन चिंतन केले तर सहज हे लक्षात येईल. आहार, निद्रा, भय आणि मैथून या विकारांशी व मानवाच्या मूलभूत अशा कळप करून राहण्याच्या प्रवृत्तीशी या दैवतकथांचा संबंध आहे. उत्पत्ती, धारणा, आणि प्रलय या तीनही संदर्भात मिथक विचार मूलगामी होय. लोकसाहित्य हे सर्व शास्त्रे व कला यांना पायाभूत आहे, तर दैवतकथा लोकसाहित्याला पायाभूत आहेत, हे हळूहळू सर्वमान्य होत आहे. त्या दृष्टीने 'मिथक' चा अभ्यास लोकसाहित्याच्या अभ्यासात सर्वात महत्त्वाचा होय. प्रस्तुत ग्रंथात (Myth) 'मिथक' ची तात्त्विक चर्चा भरपूर उदाहरणांसह केली आहे. लोकसाहित्य अभ्यासाच्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथाचे मूल्य खूपच वाढले आहे.



साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यास मूलगामी होय. भाषिक, सामाजिक व सांस्कृतिक अर्थगर्भता लोकसाहित्याच्या अभ्यासामुळेच केवळ उलगडत जाणे शक्य आहे. स्थल, काल, परिस्थिती सापेक्षतेने साहित्य कलेची बदलती रूपे उलगडण्यास या अभ्यासाची खूपच मदत होते. लोकमानसाचे सर्वकालीन पारंपरिक आविष्कार, शाब्द प्रतीके व प्रतिमांच्या (अर्थात भाषेच्या माध्यमातून) कलात्मकतेने ललित, विदग्ध साहित्यात प्रकट होत असतात. त्या दृष्टीने अभिव्यक्तीची रूपे व साहित्याचे अंतरंग उलगडण्यास लोकबंधांच्या अभ्यासाची आवश्यकता असते. 'लोकबंधात्मक समीक्षा' ही संकल्पना या आवश्यकतेतूनच जन्माला आली आहे. लोकबंधांच्या मूलगामित्वामुळे आशयनिष्ठ व आकृतिनिष्ठ अशा विविध समीक्षापद्धतींना पोटात घेऊन लोकबंधात्मक समीक्षा पद्धती साहित्य समीक्षा करू शकते. शास्त्रीय समीक्षेचे कार्य ही समीक्षा पद्धती करू शकेल. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य आदी वाङ्मय प्रवाहांतील साहित्याची समीक्षा करण्यासाठी आवश्यक वाटणारा मार्ग या समीक्षा पद्धतीने उपलब्ध करून दिला आहे. लोकबंधात्मक समीक्षा ही संकल्पना मी माझ्या 'लोकबंध' या ग्रंथातील परिशिष्टात मांडली आहेच. नाशिक येथे झालेल्या लोककला साहित्य संमेलनातही 'लोकबंधात्मक समीक्षा : संकल्पना व प्रयोग' हा शोधनिबंध सादर करून ती जाहीरपणे अभ्यासकांसमोर मांडली आहे. या शोधनिबंधाचाही समावेश या ग्रंथात आहे.

मराठी संशोधन मंडळ व मुंबई विद्यापीठ यांच्या सौजन्याने 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' येथे मांडता आली, तसेच 'लोककला साहित्य संमेलन' संयोजकांच्या सौजन्याने 'लोकबंधात्मक समीक्षा : संकल्पना व प्रयोग' हा उल्लेख येथे करता आला त्याबद्दल त्या दोघांचे मनःपूर्वक आभार. या अगोदर 'लोकसाहित्य विचार' व 'लोकबंध' या दोन्ही ग्रंथांचे विविध विद्यापीठांनी, संशोधक व अभ्यासकांनी उदंड स्वागत केले. त्या प्रोत्साहनातूनच हा ग्रंथ सिद्ध होत आहे. मोठ्या निष्ठेने प्रकाशक श्री. विश्वासराव दास्ताने यांनी लोकसाहित्य क्षेत्रासाठी ग्रंथ उपलब्ध करून दिला. प्रस्तुत ग्रंथनिर्मितीच्या द्वितीय आवृत्तीची जबाबदारी 'नितीन प्रकाशन'चे नितीन गोगटे यांनी स्वीकारून माझ्यावर व लोकसाहित्य क्षेत्रावर मोठे ऋण करून ठेवले आहे. आता तृतीय आवृत्तीची

जबाबदारी चिन्मय प्रकाशनचे श्री. विश्वंभर कुलकर्णी यांनी घेतली आहे. त्यांचाही मी शतशः ऋणी आहे. 'लोकसाहित्य संशोधन पद्धती व अभ्यास' या ग्रंथाचेही सर्वत्र मोठ्या प्रमाणात स्वागत होईल असा विश्वास वाटतो. या प्रयत्नात गुरुवर्य डॉ. गंगाधर मोरजे, प्रा. वसंत दावतर यांचे मला मोठे सहाय्य झाले. त्यांच्या ऋणातच आनंद!

**अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४ ००३.

* * *



# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | लोकसाहित्य संशोधन पद्धती | १ |
| २. | मिथक | ४४ |
| ३. | लोकबंधात्मक समीक्षा : संकल्पना व प्रयोग | ९३ |

# १. लोकसाहित्य संशोधन पद्धती

**प्रास्ताविक :–**

लोकसाहित्य संशोधन पद्धतीचा विचार स्वतंत्रपणे करणे येथे अभिप्रेत आहे. 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' म्हणजे लोकसाहित्यक (लोकसाहित्य शास्त्रीय) संशोधन पद्धती होय. – 'लोकसाहित्य' व 'लोकसाहित्यशास्त्र' या दोन्ही अर्थांनी 'लोकसाहित्य' ही संज्ञा वापरण्याचा प्रघात दिसून येतो. 'लोकसाहित्यशास्त्र' अशा प्रकारचे शास्त्र अद्याप पूर्णत्वास जायचे आहे असे मानले जाते. लोकसाहित्यशास्त्रात मानवी शास्त्रातील वैशिष्ट्ये आढळतात. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध संप्रदाय व पद्धती प्रचलित आहेत. असे असले तरी लोकसाहित्याचे संशोधन, अभ्यास करण्यासाठी समग्रतेने किंवा स्वतंत्रपणे लोकसाहित्यशास्त्रीय संशोधन पद्धती अर्थात लोकसाहित्य संशोधन पद्धती मांडलेली दिसत नाही किंवा अद्याप साकारलेली नाही. हे लक्षात घेऊनच येथे 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' मांडण्याचा प्रयत्न आहे. अशी संशोधन पद्धती मांडण्यापूर्वी 'लोक' 'लोकबंध' व 'लोकसाहित्य' या संकल्पना सूत्ररूपाने समजून घेणे इष्ट होईल.

**'लोक' :–**

'लोक' म्हणजे परंपराप्रत जीवनप्रवाहात एकजीनसीपणाने, स्थल काल–सापेक्षतेने, विविधतेने आपले अस्तित्व प्रगट करीत, परिवर्तनशीलतेने जगणारा मानवी समूह होय.

'लोक' चे स्थूलमानाने तीन प्रकार जाणवतात–

(१) पारंपरिक स्थैर्य असणारा.

(२) परिवर्तन प्रक्रियेतील संक्रमणावस्था असणारा. उदा. २० व्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्रातील ग्रामीण लोक.

(३) नव्याने अस्तित्वात येत असलेला–उदयोन्मुख–उदा. अमेरिकेतील लोक,

मुंबईतील लोक इ. 'लोक' ची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसतात–

(१) समूहाने जगण्याची प्रवृत्ती.

(२) मानवी संकेतांनी परंपरेत व सहेतूक बदलाने आणि निसर्गचक्रावर विसंबून व श्रद्धांनी जगणे.

(३) मौखिक व वर्तनसिद्ध स्वरूपात प्रगट होणे.

(४) (अ) घटकलोक (समूहातील एक व्यक्ती) (ब) अंगस्वरूप लोक (एकसमूह) (क) विश्वलोक (संपूर्ण मानव जात – समूह) या त्रिविधत्वात जगणे.

**'लोकबंध' :–**

मानवी समूहाची 'लोक' अवस्थेत धारणा करणाऱ्या सर्व कल्पनासूत्रांना किंवा कल्पनाप्रवाहांना 'लोकबंध' अशी संज्ञा वापरली आहे. 'लोक' चे जगणे लोकबंधात्मक परंपरेत असते. (लोकबंध या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून 'लोकाकार' Folk Type असा शब्द देता येईल.)

**'लोकसाहित्य' :–**

लोकबंधचे मौखिक व वर्तनसिद्ध (प्रयोगसिद्ध) आविष्करण म्हणजे 'लोकसाहित्य' होय. लोकसाहित्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(१) लोकसाहित्य हे लोकजीवनाचे प्रगटीकरण असते.

(२) तो समूहाचा आविष्कार असतो.

(३) मानवाचे (लोक) भूत, वर्तमान व भविष्य या सर्वांगाने लोकसाहित्यात प्रगटीकरण होत असते.

(४) लोकजीवनाची जी म्हणून अंगे कल्पिता येतील ती सर्व लोकसाहित्याची अंगेच होतील. – कुटुंब, गाव, शहर, नगर, पंचक्रोशी, प्रदेश, देश, भूलोक, विज्ञान, कला, समाजव्यवहार, राज्यव्यवहार, सांस्कृतिक किंवा धर्मव्यवहार, इतिहासपुराणे, भाषाप्रतीके, शारीरप्रतीके, वस्तुप्रतीके, पर्यावरणप्रतीके इत्यादी.

**लोकसाहित्य संशोधन क्षेत्रे :–**

'लोक' ची व पर्यायाने लोकसाहित्याची सर्व अंगे ही लोकसाहित्याची संशोधन क्षेत्रे होत. याशिवाय लोकसाहित्याचे मौखिक (वाङ्मयीन किंवा भाषिक) आकृतिबंध–गीते, कथा, म्हणी, वाक्प्रचार, भाषासंकेत, शिव्या इ. आणि लोकसाहित्यातील शारीरप्रतीके, साहित्यप्रतीके, पर्यावरणातील प्रतीके ही स्वतंत्र संशोधन क्षेत्रे होतील.



**लोकसाहित्य संशोधन : प्रयोजन व कार्यविचार :–**

लोकसाहित्य संशोधन कोणत्या हेतूने करावयाचे या विषयीचा विचार म्हणजे लोकसाहित्य संशोधन प्रयोजन विचार होय. उदा. भाषिक अभ्यास, इतिहास संशोधन, मानवशास्त्र संशोधन, खगोल, भूगोल इ. विषयी संशोधन, त्याचप्रमाणे राज्यशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, कलाशास्त्रे इ. संदर्भात संशोधन.

वरील सर्वप्रकारच्या प्रयोजन संदर्भात संशोधनासाठी लोकसाहित्याचे प्रत्यक्ष सर्वेक्षण, संकलन, वर्गीकरण, चिकित्सा, पर्यायनिश्चिती, तुलनात्मक पाहणी, विश्लेषण, स्पष्टीकरण, वर्णन इ. गोष्टी करणे ह्या सर्व गोष्टी म्हणजे संशोधन कार्य होय.

लोकसाहित्याचा लोकसाहित्यशास्त्रीय अभ्यास करणे (उपरोक्त मार्ग हेतू / प्रयोजन व ठरविता) हे लोकसाहित्य संशोधनाचे सर्वश्रेष्ठ व अनिवार्य प्रयोजन होय. या प्रकारच्या प्रयोजनाला क्षेत्र, स्तर, भाषा यांच्या काही मर्यादा आहेत असे वाटले तरी असे संशोधन समावेशक, व्यापक व मूल्यशोधक ठरते आणि अन्य सर्व मार्गांनी करावयाच्या संशोधनास पायाभूत ठरते. यासाठी संशोधन–संकल्पना समजून घेणे इष्ट होईल.

**लोकसाहित्य संशोधन संकल्पना :–**

'रिसर्च' ह्या अर्थी संशोधन, अनुसंधान, पुनरान्वयेषण इ. शब्द वापरले जातात. अन्वेषण, गवेषण, अनुविक्षा इ. शब्दांचाही ह्याच अर्थाने उपयोग होतो. असे नमूद करून एक विशिष्ट लक्ष्य निश्चित करून त्याचा पाठपुरावा अनुसंधानात केला जातो, असे वसंत जोशी यांनी स्पष्ट केले आहे. पुढे संशोधनाचे तीन प्रकार त्यांनी नमूद केले आहेत. –

(१) विज्ञान क्षेत्रातील प्रयोगशाळेतील संशोधन (लॅबोरेटरी रिसर्च)

(२) समाजशास्त्रातील विविध क्षेत्रांत सर्वेक्षण करून आकडे गोळा करून केलेले संशोधन (फिल्ड वर्क)

(३) ग्रंथांचा अभ्यास, तुलना, संपादन याद्वारे ग्रंथालयात किंवा घरबसल्या केलेले संशोधन (डेस्क वर्क)[४].

लोकसाहित्य संशोधन पद्धतीची संकल्पना समाजशास्त्रातील क्षेत्रीय सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धतीसारखीच आहे. मात्र लोकसाहित्य संशोधनासंबंधी थोडा वेगळा विचार करावयास हवा. त्यातून संशोधन पद्धतीत वेगळेपण जाणवेल. 'लोक' च्या सर्व अंगांचे प्रगटीकरण सामूहिक व वैयक्तिक पातळीवर सुरू असतेच. तथापि हे प्रगटीकरण 'लोक' च्या बहिरंगाला व अंतरंगाला (मनोवृत्तीला) व्यापून

घडत असते. हे समूहाचे आत्मप्रकटीकरण असते. हे 'लोक' जीवनाच्या सर्व अंगांशी सापेक्षतेने अतिशय व्यामिश्र स्वरूपाचे असते. ते 'लोक' च्या त्रिविधतेशी सापेक्ष व 'लोक' च्या वर्तनात्मक, अभिनयात्मक आणि कृतिपूर्ण हालचालींच्या द्वारे, त्यांची लय घेऊन मौखिक (वाङ्मयीन किंवा भाषिक), सांकेतिक व विधियुक्त तसेच व्यावहारिकतेने आणि स्थलकाल, पर्यावरण सापेक्षेतेने घडत असते. असे आत्मप्रकटीकरण प्रसंगी 'घटक लोक'चे ही असते तसेच ते 'अंगस्वरूप लोक' चे किंवा 'विश्वात्मक लोक' चेही असते. तसेच ते अंगस्वरूप लोकचे वाटले तरी ते वैयक्तिक भावभावना प्रकट करणारे असते, हे पुढील उदाहरणांतून अधिक स्पष्ट होईल.

(१) **देवयबाई बाळवंतीन वल्या इच्या कुशी**
**जल्मला किसन देवू गोकुळ अष्टमीच्या दिशी**
**देवयबाई बळवंतीन पिवळ्या इच्या टाचा**
**इच्या भावाना पहिल्या न्हानीव जाताना**[५]

हे पाचवीची पूजा किंवा बारशाच्या प्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या गीतातील (जन्म प्रथेसंबंधी) एक गीत. बाळंतपणाला आलेल्या मुलीच्या संदर्भातील तिच्या आईच्या भावना गीतातून व्यक्त होतातच, परंतु जमलेल्या सगळ्या आयाबायांची सामूहिक भाववृत्ती यातून आत्मप्रगटीकरण स्वरूपात प्रकट होते. त्याचवेळी पूजाविधी किंवा पाळण्याजवळचा विधी, ओटीभरण आदी सुरू असते. या गीत मंत्रानेच जणू तो विधी सिद्ध होत असतो. जीवनाचे भरणपोषण भावनिक पातळीवर होत असते. माहेरी पहिले बाळंतपण केल्याचा (प्रथा) व्यवहार पाळल्याचे समाधानही प्रकट होत असते आणि बाळंतपणाच्या दिव्यातून एक स्त्री सुखरूप सुटल्याचा वैश्विक स्त्रीभावनेचा निःश्वासही या विधीतून आणि गीतातून प्रकट झालेला असतो. वर्तन, अभिनय, कृती, हालचाली यांची लय गीताला मिळालेली असते. सबंध जन्मोत्सव संस्कार घडत असतो. अशावेळी विधीसाठी वापरलेला पेहराव, वस्तू, त्या त्या स्थलकालपरिस्थिती सापेक्षतेने आलेल्या असतात.

**(२) पाऊस मागण्याचा विधी –**[६]

पाऊस मागणीसाठी गावातील मुले-मुली लिंबाचा पाला डोक्याला, कमरेला बांधून पाऊस मागणे, घागरमाळा कमरेस बांधून पाऊस मागणे, बेडूक उलटा टांगून पाऊस मागणे. नग्न मुलांनी समूहाने जाऊन डोक्यावर पाणी घालून घेऊन पाणी मागणे. पर्जन्य आवाहन ही घटकलोक, अंगस्वरूपलोक आणि विश्वलोक या सर्वांची मूलभूत गरज असते. हा विधी वरील सर्व विशेषांचे प्रदर्शन घडवितो.



(३) **नांद्या चालुंदी आऊत आऊत**[७]
**तुझ्या आऊताच्या मांग नागली चाल मूठ मूठ**
**नांद्या हो ऽ ऽ नांद्या तुह्या संग गोईंद्या**
**जोडीना जोडीना चालुंदी आऊताच्या पात्या**

श्रमगीत (भलरी गीत) औत चालवताना एकच व्यक्ती (घटकलोक) बडबडते आहे. मात्र ह्या गीताचा पर्याय डांगाण परिसरात सगळीकडेच औत हाकताना आढळतो. म्हणजेच अंगस्वरूप लोकची सामूहिक भावना त्यातून प्रगट होते. श्रम करताना, श्रम हलके करण्यासाठी आणि श्रमाचं चीज व्हावं, श्रम कारणी लागावे म्हणून जगातील सर्वच शेतकऱ्यांची भावना प्रगट होते. अशा विविध स्तरावर वरील सर्व विशेषांसह गीत म्हटले जाते आहे.

सणोत्सव प्रसंगीचे नाचगाणे, खेळ इ. च्या अनुषंगाने होणारे मौखिक आणि क्रीडात्मक प्रगटीकरण हे सणोत्सवातले आनंदोल्हासाचे केवळ प्रतिकरूप वाटले तरी त्याला विधिक्रियात्मकतेचे महत्त्व असतेच. उदा. जन्माष्टमी प्रसंगीची गाणी–

**देवयबाई बाळवंतीन गोकुळी लावा दिवा**[८]
**जलमीला किसनदेवू मामा मावशीला दावा**
**जलमीला किसनदेव दोह्या मांडीव**
**महेना कोणी इसायती पाणी कोनी न्हानी किसनाला**

त्याचप्रमाणे लग्नविधीची गाणी-बोहोले-[९]

**लहान नवरी । इची कुकाची पावुलां ।**
**गवळणीच्या माझ्या । मामा घालती बहुला ।।**
**बहुल्याची माती । वजवती बेलदार ।।**
**गौळणीच्या माझ्या । मामा इचा शिलेदार ।। इ.**

लोककथांचे निवेदन (कथन) हे अनेकदा रूपकात्मकतेने आणि निखळ मनोरंजनाच्या पातळीवर स्वीकारले जाते. दैवतकथा आणि अन्य प्रकाराचे आत्मप्रगटीकरण ते ही प्रतीकरूपच असले तरी ते प्रासंगिक परंतु पारंपरिक भावघनतेने होत असते. उदा. खंडोबा दैवताच्या कथा, लोककलांचे प्रगटीकरण, तर 'लोक' च्या सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यावहारिक जीवनाच्या अंतःप्रवाहाचे प्रगटीकरण असते. उदा. नवरात्र मोहोत्सवात ठाकर कोंबडनाच करतात. चपळाईने गिरक्या, बैठका, पळणे, उड्या या प्रकारच्या नाचात गाणी म्हटली जातात जसे-

**रंगाण रंगाण मातीच रंगाण ऽ है।**

**ये ई रं रंगणात ऽ ऽ।**

**आजूच पायी दिला ऽ ऽ हे आजूच नाच क्येला ऽ ऽ है।**

**धुळवडा उठविला ऽ ऽ हे गंगणाला ग्येला ऽ ऽ है।**

**चंद्रसूर्या झाकोळला ऽ ऽ है।** [१०]

हे गीत पृथ्वी, आकाश, चंद्र, सूर्य अशा अवघ्या पर्यावरणाला सुगी झाल्याच्या आनंदाने कृतार्थतेने वंदन करते आहे असे दिसले.

लौकिक कलांच्या सादरीकरणाचा विचार 'लोक' चे अविभाज्य अंग म्हणून करावा लागतो. त्या लोकजीवनाचा अंतःप्रवाह घेऊन प्रतीकात्मतेने व मनोरंजनाचा हेतू प्रामुख्याने बाळगून प्रकट होत असतात. शास्त्रे व कला यांना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा असतो. उदा. तमाशा, भारूड, मेळे इ. शास्त्रे व कला यांचाही लोकजीवनावर सतत परिणाम होत असतो. आत्मप्रकटीकरणातील परिवर्तने ही शास्त्रे व कला यांच्या परिणामातूनच घडत असतात. 'लोक' च्या आत्मप्रकटीकरणाचे हे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे.

'लोक'चे असे आत्मप्रकटीकरण ही संशोधनाची महत्त्वाची व पायाभूत सामग्री असते. ती गोळा करणे संशोधन पद्धतीमधील महत्त्वाचा टप्पा व दीर्घोद्योग असतो.

समाजशास्त्रातील क्षेत्रीय सर्वेक्षणातील आकडेवारी गोळा करून निष्कर्ष काढण्याच्या पद्धतीपेक्षा हे सर्वेक्षण अतिशय जिकिरीचे, जोखमीचे असते. कारण ते 'लोक' च्या निरीक्षणावर व नोंदींवरच पूर्णतः अवलंबून असते.

अभ्यासाचे विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्या संदर्भात 'लोक' च्या सर्वांगातील आत्मप्रकटीकरणाचे साक्षेपी, चिकित्सक, निरीक्षण करणे व त्या द्वारे तर्कशुद्ध पद्धतीने मूल्यांकनापर्यंत किंवा निष्कर्षापर्यंत पोहोचणे हे लोकसाहित्य संशोधनपद्धतीमध्ये अभिप्रेत असते. हे करीत असताना 'लोक' व 'लोकसाहित्य' यांचे व्यामिश्र स्वरूप नेहमी लक्षात घेणे आवश्यक असते. त्या दृष्टीने लोकसाहित्य संशोधनाची व्याप्ती लक्षात ठेवूनच संशोधन कार्याची मर्यादा ठरवावी लागते. 'लोकसाहित्य' हे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र आहे, हे डॉ. गंगाधर मोरजे यांचे म्हणणे,[११] या दृष्टीने संशोधकाला भान आणून देणारे आहे.

लोकसाहित्य संशोधनाच्या स्थूलमानाने दोन शाखा करता येतील–

(१) वाङ्मयकलानंदाच्या दृष्टीने समालोचन, लोकसाहित्याचे लोकसाहित्यशास्त्रीय समालोचन – संधोधन, लोककला व लौकिककला यांचे संशोधन.

(२) मानवीशास्त्रे व भौतिकशास्त्रे यांच्या दृष्टीने व त्यांच्या संदर्भात संशोधन.



मराठीत पहिल्या प्रकारचे संशोधन किंवा समालोचन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कारण लोकसाहित्याचा विद्यापीठीय अभ्यासक्रमात वाङ्मय शाखेतील एक विषय म्हणून अभ्यास केला जातो. मराठी प्रबंध सूची[१२] वरूनही ही गोष्ट लक्षात येते. लोकसाहित्याच्या संशोधनास किंवा अभ्यासास सुरुवात मात्र मानवीशास्त्रांच्या अनुषंगाने झाली आहे हे लक्षात येईल. असा आढावा दुर्गा भागवत यांनी घेतला आहे.[१३] जागतिक पाहणीचा निष्कर्षही तसाच निघतो असे दिसून येईल.[१४] लोकसाहित्याच्या संशोधन पद्धतीसंबंधी समग्र व सामान्य विचार मांडण्यापूर्वी लोकसाहित्याच्या अभ्यासासंदर्भात ऐतिहासिक व वर्तमानकालीन संप्रदाय व पद्धतींचा आढावा घेणे योग्य होईल.

**लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध संप्रदाय व पद्धती :–**

लोकसाहित्याच्या जागतिक अभ्यासक्षेत्राचा आढावा घेताना दुर्गा भागवत यांनी अभ्यास संप्रदायाचा आढावा घेतला आहे.[१५] डॉ. मांडे यांनी अभ्यास संप्रदाय व पद्धती यांचा आढावा घेतला आहे.[१६] आढावा घेण्याच्या या प्रयत्नानुसार भाषाशास्त्रीय, निसर्गरूपवादी किंवा रूपकवादी, भ्रांतकल्पनावादी, हेतूकथावादी किंवा स्पष्टीकरणवादी, संप्रसारणवादी, भारतमूलक सिद्धान्त मानवशास्त्रीय, अवशेषवादी, ऐतिहासिक व भौगोलिक, मानसशास्त्रीय अशा संप्रदायांचा उल्लेख आलेला दिसतो. तसेच कार्यान्वयी, ध्येयनिष्ठ, संदर्भान्वयी, रचनानुसारी, मौखिक आविष्कार सूत्र, आंतरसांस्कृतिक अशा पद्धतींचा उल्लेख केलेला आढळतो. लोकसांस्कृतिक दृष्टिकोन, लोकसाहित्यातून समुदाय संस्कृतींचा अभ्यास, रिचर्डसन यांचा दृष्टिकोन, अशा काही मार्गांचा उल्लेख केला आहे.[१७] 'लोकसाहित्याचे संकलन' या विषयी चर्चा करताना डॉ. मांडे यांनी संशोधनाच्या क्षेत्रीय व स्तरीय पद्धतींचा उल्लेख केला आहे.[१८]

वरील सर्व संप्रदाय, पद्धती, मार्ग किंवा दृष्टिकोन यांचा विचार केला तर, विविध हेतूनुसार विविध मार्ग निर्माण झालेले दिसतात. त्या त्या संप्रदायाने अभिनिवेशाने व आग्रहीपणाने लोकसाहित्याचे संकलन, संपादन, चिकित्सा, शोधन केलेले दिसते. दृष्टिकोनानुसारी पद्धती असे या सर्व मार्गांचे वर्णन करता येईल. लोकसाहित्याच्या संशोधनपद्धतीत व संशोधनात यावा तसा एकसूत्रीपणा आलेला नाही असे नमूद करावे लागते. लोकसाहित्याचा लोकसाहित्य म्हणून अभ्यास करावयास हवा तसा तो केला गेला नाही. अभ्यासामागील प्रमुख हेतू वेगळाच असावयाचा. यामुळे अभ्यासात आग्रहीपणा, भिन्नता आलेली दिसते. असे असले तरी लोकसाहित्याचे आंतर्ज्ञानविषयांचे स्वरूप (Interdisciplinary)

व एकूण व्याप्ती स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. लोकसाहित्यशास्त्राचा विकास होण्यास मदत झाली आहे. यातूनच लोकसाहित्याचे स्वतंत्रपणे संशोधन होणे व लोकसाहित्य संशोधनाची सामान्य व समग्र पद्धती मांडण्याची गरज अलीकडील विचारात प्रामुख्याने वाटू लागली आहे. 'लोकसाहित्याचे असे एक सुसंघटित शास्त्र अजूनही बनलेले नाही',[१९] हे डॉ. अशोक रानडे यांनी केलेले विधान या दृष्टीने विचार करावयास लावणारे आहे.

**लोकसाहित्य संशोधन पद्धतीची आवश्यकता :–**

वरील विचारातून लोकसाहित्य संशोधनपद्धतीची आवश्यकता आग्रहाने सूचित झाली आहे. ही आवश्यकता पुढील ठळक गोष्टींमुळे जाणवते.

(१) अशा पद्धतीमुळे लोकसाहित्याचा स्वतंत्र, ताटस्थपूर्वक अभ्यास होऊन निष्कर्षांच्या आधारे अन्य हेतूंचे किंवा प्रयोजनांचे किंवा सिद्धांतांचे पोषण होईल.

(२) अलीकडील काळात अनेक अभ्यासक कुतूहलपूर्वक लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे आकर्षित होत आहेत. त्यांना अभ्यासाची निश्चित दिशा मिळेल.

(३) विद्यापीठीय स्तरावर भाषा व साहित्यशाखांतर्गत लोकसाहित्याचे संशोधन करण्यासाठी अनेक विद्यार्थी प्रवृत्त होतात, त्यांना नेमकेपणाने मार्गदर्शन मिळू शकेल.

(४) इतिहास व अन्य मानवीशास्त्रांना अभ्यासासाठी पायाभूत साधनसामग्री पुरविण्याची क्षमता लोकसाहित्यात आहे. ही साधनसामग्री लोकसाहित्यक (लोकसाहित्यशास्त्रीय) दृष्टीने अधिकाधिक स्वच्छ, ग्राह्य व निश्चित स्वरूपात सामग्री पुरविण्याचे किंवा उपलब्ध होण्याचे कार्य सुकर होऊ शकेल.

(५) निष्कर्षांच्या आधारे लोकसाहित्यशास्त्र विकसित होण्यास मदत होईल.

या सर्व गोष्टींचा विचार करता लोकसाहित्य संशोधन पद्धती प्रयत्नपूर्वक मांडण्याचा प्रयत्न आवश्यक वाटतो.

लोकसाहित्याची लोकसाहित्यक (लोकसाहित्यशास्त्रीय) संशोधन पद्धतीविषयी म्हणजे लोकसाहित्याचे निखळ लोकसाहित्यशास्त्रीय दृष्टीने संशोधन करताना कोणती पद्धती वापरावी याची चर्चा करावयाची आहे.

**लोकसाहित्याचे लोकसाहित्यक संशोधन म्हणजे**

(१) उपलब्ध लोकसाहित्याचे लोकसाहित्यत्त्व अजमावणे किंवा तपासून पाहणे.

(२) लोकसाहित्याचे वर्गीकरण करणे.



(३) तौलनिक अभ्यास करून प्रादेशिक मानववंशशास्त्रीय, स्तरीय, जागतिक इ. दृष्टीने त्या त्या कक्षेतील लोकसाहित्याशी साम्यभेद लोकबधांच्या दृष्टीने पाहणे.

(४) लोकसाहित्यामागील लोकबंध शोधून लोकसाहित्य प्रगटीकरणामागील प्रेरणांचा अभ्यास करणे. त्या त्या 'लोक' च्या भौगोलिक व ऐतिहासिक मर्यादा स्पष्ट करणे. स्थल काल परिस्थिती सापेक्षतेने लोकबंधात होणारे बदल व त्यानुसार घडणारे प्रगटीकरण तपासून पाहणे.

(५) लोकसाहित्यातील वाचिक, कायिक, मानसिक घटक समूहमनाच्या अर्थात अंगस्वरूप लोकच्या दृष्टीने अभ्यासणे.

(६) लोकसाहित्याच्या प्रयोगात्मकतेचा, कलापणाचा व व्यवहारपणाचा अभ्यास करणे.

(७) लोकसाहित्याचे प्रकार लोकसाहित्याच्या अर्थात 'लोक' च्या विविध अंगांच्या आधारे कल्पून त्या त्या अंगाने लोकसाहित्याचा वेध घेणे.

(८) लोकसाहित्याचा ललित, विदग्ध, अभिजात वाङ्मयाशी, कलांशी व शास्त्रांशी असलेला पायाभूत, ऐतिहासिक व भौगोलिक अनुबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणे.

(९) विदग्ध साहित्य, अभिजात साहित्यशास्त्र व कला यांच्यातील घटकाचा किंवा अवशेषांचा लोकप्रियतेच्या कसोटीनुसार लौकिककलात व लोकसाहित्यात कसा अंतर्भाव झाला आहे हे पर्यायांच्या चिकित्सेतून अभ्यासण्याचा प्रयत्न करणे.

(१०) निष्कर्षाच्या आधारे लोकसाहित्याचे वर्गीकरणात्मक व्यवस्थापन करण्याचा तसेच लोकसाहित्यशास्त्र विकसित करण्याचा आणि अन्य कला व शास्त्रे यांना लोकसाहित्यक परिमाणे देण्याचा प्रयत्न करणे– अशा प्रकारचा अभ्यास करणे अभिप्रेत असते. असे संशोधन करण्यासाठी पुढील पद्धतीने संशोधन कार्य करणे लोकसाहित्यशास्त्रीय दृष्टीने योग्य होईल. –

(१) लोकसाहित्य संकलनाची पद्धती यथायोग्यपणे वापरून लोकसाहित्याचे संकलन करावे. (संकलन पद्धतीची सूत्रे या निबंधात पुढे मांडली आहेत व चर्चा केली आहे.)

(२) संकलित घटकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करणे इष्ट असते.

(अ) मौखिक परंपरातील शाब्दपदांनुसार (भाषाद्रव्याच्या रचनानुसार)

(ब) लोकबंध व सादरीकरण या नुसार वर्गीकरण. या प्रकारचे वर्गीकरण

स्वाभाविकपणे लोकमानसातील आशय घटकानुसार होते.

(३) वरीलपैकी 'ब' पद्धतीने संहिता किंवा संग्रह किंवा कोशरूप सिद्ध करून रचना प्रकाराचा त्या त्या घटकाखाली उल्लेख केल्याने वर्गीकरणातील 'अ' व 'ब' या दोन्ही बाजू साध्य होतात.

(४) व्यवहार, प्रसंग, संस्कार, विधी आदी संदर्भातील साहित्य, साहित्याचा (सामग्रीचा) मोड (मांडणी-वस्तूंची), त्यामागील लोकबंध वर्णनात्मक पद्धतीने नोंदवून 'ब' प्रकारे वर्गीकरण करावे, लोकसाहित्यात शाब्द परंपरेपेक्षाही साहित्य, मांड, कृती, हालचाली व त्या मागील लोकबंधाला अधिक महत्त्व असते. त्या दृष्टीने वर्णन तपशीलवार व साक्षेपी असावे.

(५) कोणत्याही पद्धतीने वर्गीकरण करताना पर्यायाचा तौलनिक अभ्यास करून प्रातिनिधिक पर्याय निवडावेत व त्या आधारे संहिता सिद्ध करावी. (वर्गीकरण व संपादन या विषयी स्वतंत्र चर्चा केली आहे.)

(६) पूर्वी झालेल्या तशा प्रकारच्या अभ्यासाशी शक्यतो तुलना करून संकलित लोकसाहित्याची अधिक चिकित्सा करण्याचा प्रयत्न करावा.

(७) लोकसाहित्य हा 'लोक' च्या समूहमनाचा सादर होणारा पारंपरिक आविष्कार असल्यामुळे समालोचन करताना लोकबंधाचे प्रकटीकरण कसे घडते ते सोदाहरण स्पष्ट करावे. दैवते, विधी, सामूहिकता, व्यवहार परंपरा, संस्कार, रूढी यांचे लोकजीवनातील लोकबंधात्मक महत्त्व लक्षात ठेवून लोकसाहित्यातून लोकजीवन सर्वांगाने कसे प्रकटते ते समग्र सांगावे. या समालोचनात शक्य तितका नेमकेपणा व तर्कशुद्धता असावी.

(८) संशोधनासाठी स्वीकृत क्षेत्रातील किंवा स्तरातील लोकसाहित्याचे जागतिक लोकसाहित्यातील स्थान स्पष्ट करण्यासाठी जागतिक क्षेत्रातील तत्सम लोकसाहित्यातील पर्याय साम्य पाहण्याचा प्रयत्न वर्णनात्मक पद्धतीने करावा. तुलनेसाठी कोणते लोकसाहित्य पर्याय निवडले आहेत ते स्पष्ट नोंदवावेत.

(९) लोकसाहित्याचा ऐतिहासिक व वर्तमानकालीन अनुबंध स्पष्ट करण्यासाठी लोकसाहित्याची परिवर्तने, पर्याय, विधी/कृती-सापेक्षता, आस्वाद्यता, मानसप्रकटीकरण क्षमता यांची सोदाहरण मीमांसा करावी.

(१०) लोकसाहित्य हे लोकमानसाचे लोकबंधात्मक प्रकटीकरण-जीवनव्यवहार, धर्म, कला इ. सर्व अंगांनी- करीत असल्याने व असे प्रकटीकरण 'लोक' च्या सामूहिक विधी, कृती, हालचाली इ. सह प्रकट होत असल्याने



त्यातील समग्र सामग्रीची (साहित्याची) चिकित्सा करावी.

(११) कला, शास्त्रे, वाङ्मय व मानवीशास्त्रे इ. ना संशोधनासाठी स्वीकृत लोकसाहित्यातून काय मिळते याचा विचार अनुबंधत्मक चर्चा करताना किमान प्रातिनिधिक उदाहरणे देणे आवश्यक आहे. जसे-

(अ) बोहाडा हे देवीच्या जत्रा प्रसंगी होणारे नृत्यनाट्य (लळीत) मुखवटे, प्रभावळी लावून संवाद, निवेदनासह केलेले नृत्य हे विकसित नाट्यकलेच्या मुळाशी असावे असा अनुबंध स्पष्ट करता येतो.[२०]

(ब) सर्पाचे विष उतरविण्याचा मंत्र[२१] आयुर्वेदशास्त्राच्या दृष्टीने सामग्री होईल. मंत्र पुढील प्रमाणे-

'बील का पानी बांदू, कोण बांदे, गुरु बांदे, गुरु की महावशी आणसे उतारु, लेहरी जेहरी कोण उतरे, गुरु का चेला, महादेव का चेला, भूत का चेला, डांकण का चेडा कोण उतारे?' इ. (भावानुवाद : बेलाचे पान बांधू, कोण बांधेल, गुरु बांधेल. ती महादेवाच्या शपथेने उतरु. लेहरी जहरी (विष) कोण उतरवेल? गुरूचा चेला महादेवाचा चेला, भुताचा चेला, डाकिणीचा चेडा यातून कोण उतरवेल? इ.) हा मंत्र सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीनेही उपयुक्त होईल.

(१२) लोकसाहित्याचे सामर्थ्य, परंपरागत अवशेषांचे वर्तमानाच्या संदर्भाने प्रकटण्यात असते. त्यावरूनच लोकसाहित्याची सक्षमता अजमावता येणे शक्य असते. ती सक्षमता अजमावून नव्या (बदलत्या) व ऐतिहासिक परंपरांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करावा. त्यातून लोकमानसाच्या परिवर्तनशीलतेचा अभ्यास करावा.

उदा. **गंगु तुझा नवरा दिसतोय भुंडा**
**वरून का मांगतोय लग्नाला हुंडा.**
**पायात बूट कमरला सूट**
**वरून का मांगतोय वुलनचा कोट**[२२]

या लग्नप्रसंगी म्हटल्या जाणाऱ्या गाण्याची लय आणि रचना पारंपरिक असून वर्तमानातील भावना व वस्तूंचा उल्लेख गीतात आला आहे.

(१३) पर्यायांच्या वरील प्रकाराच्या पाहणीतून अनुमाने व निष्कर्ष जास्तीतजास्त काटेकोर करण्याचा प्रयत्न करावा.

(१४) संशोधनाची लेखनपद्धती शास्त्रीय असावी.

(१५) लेखनात लोकसाहित्यशास्त्रीय परिभाषेचा उपयोग करावा.

(१६) संशोधन लेखनांती संशोधनासाठी स्वीकृत 'लोक' साहित्याचे समग्रस्वरूप

स्पष्ट व नेमकेपणाने वर्णन करून लिहावे. संशोधनासाठी स्वीकृत 'लोक'चे वेगळेपण अभ्यासाच्या आधारे स्पष्ट करून मांडावे.

(१७) अपवादात्मक घटक, विशिष्ट घटक यांची स्वतंत्र चिकित्सा करावी.

उदा. **(१)** **विणा खांडी मदी । विणा वाजत सवाई**
**तीरमक राजाचा । नील परभात जावई**
**निंगाली गंगुबाई । झाड उंबराच्या खोडी**
**परगंधा झाली । कुशावर्ता थोडी थोडी**[२३]

हे गोदावरीचे वर्णन जात्यावरच्या ओव्यांच्या स्वरूपात त्र्यंबक परिसरात व त्याच्या अनुबंधाने अकोले तालुक्याच्या उत्तर भागातच आढळते हा त्या परिसरातील स्थानमहात्म्याचा परिणाम व क्षेत्रीय दैवत प्रसिद्धीचा परिणाम म्हणता येईल.

(२) तातोबाच्या मठाची आख्यायिका केवळ रंधा व कोंदणी या दोन सान्निध्यातील गावातच सांगितली आहे. तेथे तातोबा म्हणजे वाल्मिकी आणि त्याच्या मठात लवकुश कसे राहत असत हे स्पष्ट केले आहे. प्रवरेच्या तीरावर सीता-पावले देखील दाखविली जातात. तातोबाचा मठ अन्यत्र नाही. यातून त्या परिसराची प्राचीन ऐतिहासिक माहिती मिळविण्याची प्रेरणा मिळते.[२४]

(१८) वर्गीकरणानुसार लोकबंधांची सूची करावी व त्याबरोबर लोकबंधन प्रकट करणाऱ्या पर्यायांची संख्या पुढे लिहावी.

(१९) संशोधनासाठी स्वीकृत लोकसाहित्य, पारंपरिक स्थैर्य जाणवणारा लोक, परिवर्तन संक्रमण अवस्थेतील लोक व उदयोन्मुख लोक या पैकी कोणत्या प्रकारातील 'लोक' चे आहे ते स्पष्ट करावे.

(२०) संशोधनासाठी स्वीकृत लोकसाहित्याचे लोककला रूप स्वतंत्रपणे स्पष्ट करावे. त्या आधारे त्या 'लोक' च्या पारंपरिक अस्तित्वाचा ऐतिहासिकतेच्या दृष्टीने वेध घेण्याचा प्रयत्न करावा. उदा. उपरोक्त तातोबाच्या मठाची आख्यायिका जात्यावरल्या ओव्यांच्या स्वरूपात व भारूडगीतांच्या स्वरूपात रंधा, वाकी, कोंदणी, शेल विहिरे इ. चाळीसगाव डांगाणातील गावात सापडते. ओवी आणि भारूडगीत भारूडात सादर केले जाते. येथील कोळी आपण वाल्याचे वंशज असल्याचे सांगतात अशी नोंद (माहिती) 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास' या प्रबंधात दिली आहे.[२५]

लोकसाहित्य संशोधन पद्धतीची ही सामान्य मार्गदर्शक तत्त्वे म्हणता येतील.



अभ्यासाच्या अधिकाधिक प्रगती आणि विकासाबरोबर त्यात भर घालता येईल. लोकसाहित्याच्या संशोधनात लोककलांच्या अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्या दृष्टीने लोककलांच्या संशोधन पद्धती संदर्भात काही मार्गदर्शक सूत्रे ठरविता येतील.

**'लोक'– कला संशोधन पद्धती :–**

विविध कलाप्रकारांची 'गंगोत्री' आणि 'प्रयोगसिद्ध' कला अशा दृष्टिकोनातून डॉ. मांडे यांनी लोककला आणि लौकिक कलांचा विचार मांडला आहे. 'लौकिक गीतांचा' स्वतंत्र विचारही केला आहे. लोकगीते आणि लौकिकगीते यातील भेद, साम्य व अनुबंध स्पष्ट केला आहे.[२६] 'लोकसाहित्याचे कलास्वरूप' या 'लोकसाहित्य– एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र' पुस्तकातील स्वतंत्र प्रकरणात 'प्रयोगसिद्ध वाङ्मयकला' या दृष्टीने डॉ. मोरजे यांनी 'लोक-कला' संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.[२७] प्रस्तुत निबंध लेखकाने 'लोकसाहित्यविचार' या पुस्तकात 'लोकसाहित्याचा कलात्मक आविष्कार' आणि 'वनवासींच्या लोककला' या प्रकरणांमध्ये लोककला व लौकिककला संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.[२८] लोकधाटी कलावंत अभिव्यक्तीच्या बाबतीत अधिक मौलिक, अधिक मुक्त व अधिक स्वायत्त होऊ शकतो! नागर कलावंताप्रमाणे शास्त्रघाटी 'शास्त्रीय' परंपरेच्या नेमनियमांचे बंधन त्याला नसते. तंत्राच्या बाबतीत तो मुळीच उदासीन असल्यामुळे तंत्रनिष्ठ सौष्ठवाचा विचारही त्याच्या मनात डोकावत नाही, त्याची सारी बांधिलकी आविष्काराच्या आशयाशी असते.[२९] असे नमूद करून द. ग. गोडसे यांनी लोककला आणि त्यांच्या सादरीकरणासंदर्भात मूलभूतता आणि स्वाभाविकता स्पष्ट केली आहे. कोणताही लोककलाविष्कार स्वाभाविक असतो. अभ्यासकांनी उपरोक्त अभ्यासकांची पुस्तके मुळातून वाचणे सोयीचे होईल. येथे थोडक्यात 'लोककला' व 'लौकिककला' यांची संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे. संशोधन पद्धती समजून घेण्यासाठी ते उपयुक्त होईल.

लोककला या 'लोक'च्या नित्य व नैमित्तिक सांस्कृतिक, सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक व्यवहारात, व्यवहाराचे अर्थात वर्तनाचे एक अंग किंवा क्रियेचे एक अंग म्हणून परंपरेने, कौशल्यात्मकतेने व कौशल्याच्या नाविन्यपूर्णतेने स्वाभाविकपणे प्रगट होत असतात. हे सर्व प्रयोगच वाटले तरी त्यात कला सादरीकरणाचा हेतू नसतो. जीवन व्यतीत करताना जगण्यातल्या सुखकारक व कष्टकारक प्रसंगी क्रियेला शक्यतो आनंदपर्यवसायी स्वरूप देण्याची एक मनःप्रवृत्ती यात अंतर्भूत असते. वाङ्मयरूप (मौखिकरूप) हे अशा कलांचे एक

अंग बनून आलेले दिसते. या कलांना कृती किंवा वर्तनाची स्वाभाविक लय असते. त्या त्या स्थल-काल-प्रसंगानुरूप प्राप्त झालेली भावनात्मकता असते. परंपरेतून प्राप्त झालेले वर्तमानाशी जुळणारे बाह्य दर्शन असते. वर्तमान संदर्भात बदलण्याची सहजता व लवचिकता असते. जीवनव्यवहारातील अनेकानेक भूमिका 'घटकलोक' 'अंगस्वरूप लोक' च्या भावनात्मकतेने वठवित असतो. ह्या कला आहेत असे लौकिकतः प्रसंगी वाटतही नाही. कार्यकौशल्य व क्रियात्मकता अशी नावे या लोककलांना देता येतील. उदा. शेती, सुतारकाम, लोहारकाम, बांधकाम, सोनारकाम, स्वयंपाक कार्य, बाजारहाट इ. प्रकारात कौशल्य प्रकटताना दिसते. त्याचवेळी नाविन्यही असते. देवधर्म, जत्रायात्रा, जन्म, लग्न, मर्तिक- उत्सव, विविध सणोत्सव, गप्पा इ. सांस्कृतिक व सामाजिक व्यवहार प्रकट करताना घडणारी क्रियात्मक कौशल्ये ह्या लोककलाच होत. या सर्व व्यवहारांना नेमके असे वाङ्मयीन, ऐतिहासिक, पारंपरिक अंग असते व ते व्यवहार वर्तमानातील संदर्भात स्थलकाल पर्यावरण सापेक्षतेने प्रकट होत असते. वाक्प्रचार, म्हणी विशिष्ट शब्दरूप प्रतीके, लयबद्ध वाक्ये, उखाणे, कोडी, शिव्या, सांकेतिक शब्दप्रयोग, प्राकःकथा, लोकगीते, विशिष्ट उद्गार असे हे वाङ्मयीन घटक वर उल्लेखिलेल्या क्रियेची, कौशल्याची, क्रियात्मकतेची लय घेऊन, भावनात्मक अभिनिवेशाने प्रकट होत असतात. त्यामुळे त्यांना नित्य वर्तमानाचे नावीन्य प्राप्त झालेले असते. सामूहिक व वैयक्तिक आत्मलीनतेने त्या प्रकट होत असतात. श्रमपरिहाराचे, भावनात्मक भरण पोषणाचे अर्थात जीवनानंदाचे सामर्थ्य त्यात प्रकटते. सणोत्सवप्रसंगी उत्स्फूर्तपणे उभी होणारी लोकनृत्ये ही याच क्रियात्मकतेचे एक अंग असते. म्हणूनच संपूर्ण लोकसाहित्य ही लोककला असते व ती सादरीकरण कला असते.

लोकसाहित्याचे कलारूप सूक्ष्मतेने अभ्यासून त्या मागील प्रेरणांचा, लयबद्धतेचा, भाषिक भारलेपणाचा, पारंपरिकतेचा, सादरीकरणाचा व आस्वाद प्रक्रियेचा वेध घेणे व त्याचे कलात्मक रूप उलगडणे म्हणजे लोककलांचा अभ्यास होय. विविध अभिजात कला, शास्त्रे यांचा परिणाम होऊन लोककलांमध्ये वर्तमानात झालेली परिवर्तने शोधणे व त्यांचा अभिजात कला व शास्त्रे यांच्याशी अनुबंध स्पष्ट करणे हा अभ्यासही लोककलांच्या अभ्यासाचे महत्त्वाचे अंग असते.

लोकजीवनातील धर्मश्रद्धांचा, सांस्कृतिक व्यवहारातील लोकप्रिय पारंपरिक कृतींचा, प्रतीकांचा, प्राकःकथांचा उपयोग करून 'लोक' साठी धर्मश्रद्धा जागविणारे सांस्कृतिक, धार्मिक श्रद्धापूर्ण व्यवहार करणाऱ्या पुरोहितांचा किंवा भिक्षुकांचा एक वर्ग तयार झालेला दिसतो. या पुरोहितांना डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'लोकसंस्कृतीचे



उपासक' असे नाव दिले आहे. या पुरोहित संस्था विधिनाट्याच्या स्वरूपात लोकमानसातील सांस्कृतिक, धार्मिक, पारंपरिक कुलधर्मांचे जागरण करीत असतात. या संस्थांमध्ये अशा विधिनाट्याच्या वाङ्मयीन व विधी विधानांविषयीच्या संहिता तयार झालेल्या असतात. त्यांचे मूळ वर उल्लेखिल्याप्रमाणे त्यांच्या सबंध विधिनाट्यात्मकतेला, त्याच्या सादरीकरणाला मिळालेल्या लोकप्रियतेच्या कसोटीत असते. या सर्व विधिनाट्यांच्या सादरीकरणामागे निश्चित हेतूपूर्वकता असते. त्याचबरोबर या संस्था 'लोक'चे उपयुक्त, अविभाज्य, व्यावसायिक परंतु श्रद्धात्मक अंग बनलेल्या असतात व यांच्या प्रयोगांमध्ये 'लोक' यजमान किंवा प्रेक्षक स्वरूपात सहभागी होतात. या अर्थाने या सर्व कला अखेर खरेतर लौकिककला स्वरूपात प्रगटलेल्या असूनही लोककलांच्या स्वरूपात म्हणजे 'लोक'च्या क्रियात्मक आत्मलीनतेच्या स्वरूपातही आविष्कृत होतात. मनोरंजनात्मकता, प्रेक्षकसापेक्ष प्रयोगसिद्धता, साभिनयात्मकता, कलावंताला स्वप्रतिभेने नावीन्य आणण्यास वाव या सर्व गोष्टींबरोबरच लोकप्रिय भावना व कृतींच्या लयीला आलेले महत्त्व या दृष्टीने या सर्व कला लौकिककलाच असतात तरी त्यांचे स्थान लोकजीवनात लोककलांसारखेच असते. म्हणजे या कला लोककला व लौकिककला यांच्या सीमारेषेवरील कला होत असे म्हणता येईल. या कलांत गोंधळी, वाघे, कडकलक्ष्मी, दशावतारी व जोगतीण इ. संस्था येतील.

'लोक' जीवनातील व लोककलांमधील परंपरा, हालचाली, नृत्य, क्रिया, विधी, विविध अंगातील विषय, लोककथा, लोकप्रिय लोकगीते, लय, चाली, प्राकःकथा लोकप्रिय वाद्ये, नृत्ये यांचा रंजनात्मक दृष्टीने कलात्मक सौंदर्यदृष्टीने व स्वप्रतिभेने उपयोग करून लोकरंजन, उद्बोधन स्वरूपात पारंपरिक संकेतानुसार सादर होणाऱ्या कला, अशा कलांना लौकिककला असे म्हणता येईल. यात कीर्तन, तमाशा, भारूड, कठपुतली, चित्रकथी अशा कलांबरोबरच माकडवाले, उंटवाले, कोल्हाटी, जादूगार, गारूडी, दरवेशी यांचाही समावेश होईल. आधुनिक मेळे व कलापथके यांचाही यात समावेश करता येईल. या सर्व कलांमधून लोकजीवनातील कलात्मक अंग प्रकटते व स्वतंत्र सादरीकरणाने उठून दिसते. लौकिककलांमधून निर्माण झालेल्या कलाशास्त्रांच्या आधारे विदग्धकला जन्माला येतात तर विदग्धकलांच्या लोकप्रिय अंगांचा, आकारांचा स्वीकार सहजतेने लौकिकलांत व नंतर लोककलातही झालेला आढळतो.

हा अनुबंध 'लोकसाहित्याचा कलात्मक आविष्कार' या शीर्षकाखाली प्रस्तुत ग्रंथ लेखकाने 'लोकबंध' या ग्रंथात आकृतीसह स्पष्ट केला आहे.[३०]

तो मूळातून पहावा.

येथे आपणास लोककला संशोधन पद्धतीचा विचार करावयाचा आहे. लोककलांच्या संशोधनाची निश्चित व सामान्य अशी संशोधनपद्धती तयार करण्याचे कार्य अजून पूर्णत्वास जायचे आहे. संगीताच्या अंगाने लोकसंगीताचा काही अभ्यास झालेला आपणास पाहावयास मिळतो. चित्रकलेच्या संदर्भाने काही पावले पुढे टाकली गेली आहेत. यात द. ग. गोडसे यांचा उल्लेख करता येईल. कलांच्या दृष्टीने काही सामान्य संशोधन पद्धती किंवा मार्गदर्शक सूत्रे मांडता येतील काय; याचा विचार येथे करावयाचा आहे. ही सूत्रे पुढीलप्रमाणे मांडता येतील–

**लोककला संशोधन पद्धती : काही मार्गदर्शक सूत्रे :–**

(१) लोकसाहित्य संशोधन पद्धतीचा अवलंब करून लोककला व लौकिककला यांचा लोकसाहित्य या दृष्टीने अभ्यास करणे आवश्यक असते.

(२) कला संदर्भात प्रयोगात्मकतेचा विचार महत्त्वाचा असतो त्या दृष्टीने
(i) प्रयोगांचे पर्याय शोधणे. (ii) प्रातिनिधिक पर्याय निवडणे.
(iii) प्रयोगातील घटकांची छाननी करणे.
हे घटक पुढीलप्रमाणे ठरविता येतील.
(अ) प्रयोगात समाविष्ट होणारे घटक – लोक घटक सादरीकरण करणारा घटक, सादरीकरणात कृतीतून व भावनात्मकतेने सहभागी होणारा घटक, प्रेक्षक. (ब) सामग्रीरूप (साहित्य). घटक. (क) वाङ्मयरूप घटक (भाषाद्रव्य).

(३) लोककला प्रयोगातील मांडणीचा (मांड, रचना इ.) स्वतंत्र विचार करावा

(४) लोककलांचे लोकव्यवहारात जे स्वभावतः – व्यवसायानिमित्ताने, कार्ये करताना, दैनंदिन वर्तनात प्रयोग होतात, त्यातील मांडणीचा विचार तारतम्याने करावा. उदा. भलरी, काबाडकष्ट, स्वयंपाक, सुतारकाम, लोहारकाम इ. भरतकाम, चित्रकला, रांगोळी इ. मध्ये मांडणी अनिश्चित असते.

(५) मात्र लोककला आणि लौकिककला यांच्या सीमारेषेवर लोककला विधिनाट्याच्या स्वरूपात असतात. त्यात मांड, विधी यांना अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यातील मांडणी व विधिनिषेध परंपरांची चिकित्सापूर्वक पाहणी करावी.

(६) प्रत्येक कलेतील ताल, सूर, लय यांचा स्वतंत्र विचार करावा, त्याचबरोबर वाद्ये आकार व घडणीचे स्वरूप, गरज, परंपरा यांचा अभ्यास करावा.



त्यातील वाङ्मयरूप व ताल, सूर, लय यांचा संबंध, हालचाली, नृत्य या संदर्भाने स्पष्ट करावा.

(७) कलांची वैशिष्ट्ये शोधन करताना पर्यावरण व स्थलकालसापेक्षता यांचा अनुबंध व त्यामागील लोकबंध यांचा संबंध चिकित्सापूर्वक पहावा.

(८) संशोधनासाठी स्वीकृत कलाप्रकारसदृश कलांमध्ये तौलनिक पाहणी स्वरूप, परंपरा व कलात्मकता या संदर्भात चिकित्सा करण्याचा प्रयत्न करून कलाप्रकाराची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करण्याचा प्रयत्न करावा.

(९) कलाप्रकारांमध्ये अभिसरणाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर जाणवते. ही अभिसरणाची प्रक्रिया दोन प्रकारांनी अभ्यासणे श्रेयस्कर असते.–
(अ) कलाप्रकार म्हणून अभिसरण. (ब) सांस्कृतिक, वाङ्मयीन, ऐतिहासिक, आर्थिक इ. दृष्टीने अभिसरण.

(१०) कलांच्या नेमक्या स्वरूप स्पष्टीकरणासाठी व्हिडीओ फिल्मचा उपयोग करणे योग्य ठरते. जेथे हे साधन उपलब्ध नसेल तेथे फोटोग्राफ्स, चित्रकला व वर्णनात्मक नोंदी यावर अवलंबून राहणे श्रेयस्कर होय. या दोन्ही मार्गांनी जात असताना त्या त्या कलेतील पारंपरिक पारिभाषिक शब्दांचा, सूत्रांचा शोध घेऊन मांडणी करणे आवश्यक असते.

(११) कलांचे वर्गीकरण सांस्कृतिक प्रवाह, सादरीकरणाचा प्रकार, परंपरा, प्रदेश यानुसार करता येणे शक्य आहे.

(१२) लोककलांचा अभ्यास करताना लोककला, लौकिककला व अभिजातकला यांचा विकासक्रमाने व अभिसरण प्रक्रियेनुसार अनुबंध स्पष्ट करणे श्रेयस्कर असते. कला क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने हे उपयुक्त ठरते.

(१३) कलांचे स्वरूप स्पष्ट करताना ऐतिहासिक वर्णनात्मक पद्धतींचा अवलंब करावा.

(१४) कलाघटक म्हणून वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक वाद्याचा ऐतिहासिक, तौलनिक व वर्णनात्मक अभ्यास; वाद्याचे नेमके स्वरूप स्पष्ट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

(१५) कलांची चिकित्सा करताना त्यातून आस्वाद प्रक्रिया कशी घडते हे सहभागी सर्व लोकघटकांच्या दृष्टीने तपासावे लागते.

(१६) लोककलांचे सांस्कृतिक, सामाजिक महत्त्व स्पष्ट करताना कलांचा प्रसारमाध्यमे म्हणून कोणत्या प्रकारे उपयोग होतो हे स्पष्ट करावे.

(१७) कलाशास्त्रांच्या दृष्टीने तांत्रिक स्वरूपाचे आणि रंजन व उपयुक्ततेच्या दृष्टीने

तसेच प्रयोगाच्या दृष्टीने वर्णनात्मक स्वरूपाचे विवेचन करणे आवश्यक असते.

(१८) लोककलांचे संशोधन करताना लोककला संस्थांचा सामाजिक, आर्थिक, प्रापंचिक पार्श्वभूमीचा विचार करणे, सादरीकरणाचे संदर्भ तपासताना उपयुक्त ठरते.

**लोकसाहित्य संशोधन पद्धतीतील महत्त्वाची कार्ये :–**

संशोधन पद्धतीतील सामान्यतः मार्गदर्शक तत्त्वांचा येथवर विचार करून संशोधन पद्धतीचे स्वरूप मांडण्याचा प्रयत्न केला. पद्धती अधिक स्पष्ट होण्याच्या दृष्टीने पद्धतीतील महत्त्वाच्या कार्यांचा विचार व पद्धती समजावून घेणे इष्ट होईल. येथे आपण संकलन, संपादन, वर्गीकरण, चिकित्सा, अनुमान चिकित्सा–पडताळा, लोकसाहित्य संहिता, अनुमानांचे निष्कर्षांत रूपांतर इ. गोष्टींचा विचार करणार आहोत.

**(अ) संकलन**


लोकसाहित्याचे संकलन ही लोकसाहित्य संशोधन क्षेत्रातील सर्वात महत्त्वाची व अत्यंत जिकिरीची गोष्ट होय. दुर्गा भागवत यांनी संकलकांना महत्त्वाचा इशारा दिलेला आहे.[३१] 'लोकसाहित्याचे संकलन' या नावाचे स्वतंत्र प्रकरण लिहून डॉ.मांडे यांनी भारतातील व महाराष्ट्रातील संकलन कार्याचा आढावा थोडक्यात घेतला आहे व संकलनाच्या 'क्षेत्रीय पद्धती' आणि 'स्तरीय पद्धती' याचा विचार मांडला आहे. त्याचबरोबर संकलनातील अडचणींचा विचार केला आहे.[३२] अभ्यासकांनी ते लेखन मूळातून वाचणे इष्ट होय. 'लोकसाहित्याचे वर्गीकरण' या प्रकरणात डॉ. मांडे यांनी श्रीमती बर्न यांच्या 'Handbook of Folklore' या ग्रंथाच्या आधारे लोकसाहित्याचे वर्गीकरण दिले आहे, ते संकलनाच्या सोयीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.[३३] हे वर्गीकरण, तीन भाग करून त्यातील घटकांची सूची दिली आहे. हे पुढील प्रमाणे–


(i) – लोकविश्वास, लोकभ्रम, समजुती वगैरे (सर्वसाधारणपणे या समजुती पुढील बाबींशी संबंधित असतात) – (१) पृथ्वी, आकाश, पाताळ; (२) वनस्पती, वृक्ष, डोंगर, नद्या; (३) प्राणी; (४) मानव; (५) मानवनिर्मित वस्तू; (६) आत्मा, परलोक, स्वर्ग–नरक इत्यादी; (७) अतिमानवी शक्ती ज्यात राक्षस, भूत, देवदेवता आणि या स्वरूपाच्या इतर व्यक्ती; (८) शकुनापशकून, भविष्यवाणी, आकाशवाणी, साक्षात्कार, दृष्टांत इ. (९) यातु, मंत्र, यंत्र, तोडगे इ.; (१०) बाघ दृष्टी, रोगांवरील पारंपरिक उपाय.



(ii) – रीतिरिवाज, रूढी, विधी इत्यादी– (१) सामाजिक, धार्मिक किंवा राजनैतिक संस्थांशी संबंधित; (२) व्यक्तिगत जीवनासंबंधी जसे संस्कार, नवस इत्यादी; (३) व्यवसाय, उद्योग यांशी संबंधित; (४) व्रत, सण, उत्सव; (५) नृत्य. – खेळ, क्रीडा, मनोरंजनात्मक.

(iii) – लोककथा, लोकगीत, म्हणी इत्यादी – (१) लोककथा – १. अशा कथा ज्या खऱ्या समजल्या जातात. २. अशा कथा ज्या केवळ मनोरंजन करण्यासाठी सांगितल्या आणि ऐकल्या जातात. (२) सर्व प्रकारची लोकगीते; (३) म्हणी, उखाणे; (४) पद्यबद्ध म्हणी आणि स्थानिक स्वरूपाचे वाक्प्रचार.






या वर्गीकरणावरून लोकसाहित्याचे संकलन करावयाचे म्हणजे नेमके कोणत्या गोष्टींचे संकलन करावयाचे याची स्थूलमानाने माहिती होईल. येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे, की 'लोक' ची जी म्हणून विविध अंगे करता येतील त्या सर्व अंगांच्या संबंधाने होणारे सर्व प्रकारचे प्रकटीकरण हे लोकसाहित्यच असते. त्यामुळे लोकसाहित्याचे अनेक भाग कल्पिता येतील, गट करता येतील. 'लोक'च्या अस्तित्त्वातील समग्र दर्शन घडविणारे सर्व घटक संकलन कक्षेत आलेच पाहिजेत. यातही तीन प्रकारे लोकसाहित्य संकलित करता येईल – (१) पारंपरिक स्वरूपातील, (२) परिवर्तनाच्या संक्रमण अवस्थेतील, (३) नव्याने उदित होणारे.


डॉ. मोरजे यांनी लोकसाहित्य संकलनाविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले आहे.[३४] तेही मूळातून वाचणे इष्ट होईल.



**संकलनाची पद्धती पुढील सूत्रांत मांडता येईल**

(१) संकलनासाठी निवडलेल्या क्षेत्राची व्याप्ती व सीमा निश्चित करावी. ही निश्चिती विषय निवडीनुसार भौगोलिक, ऐतिहासिक व लोकव्यवहार यांचा विचार करून करावी. येथे इतिहास, भूगोल किंवा शासकीय सेन्सस बुक पेक्षा संशोधन क्षेत्र वेगळेपणाने लक्षात घ्यावे लागेल. त्या नुसार क्षेत्राचा संकलन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथ लेखकाने केलेला आहे. 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन भाषिक अभ्यास' असा विषय होता. त्यासाठी चाळीसगाव डांगाण परिसराचा नकाशा तयार करण्याचा प्रयत्न केला[३५] – (प्रत्यक्ष नकाशा सोबत स्वतंत्र पानावर दिला आहे.)

(२) क्षेत्राचा व्याप पाहून दिशा, लोकसंख्या, लोकव्यवहाराच्या दृष्टीने (बाजारहाट) पाहून उपक्षेत्रे तयार करावीत. त्या उपक्षेत्रांमध्ये तारतम्याने लोकसंख्या व लोकव्यवहार लक्षात घेऊन प्रातिनिधिक संशोधन केंद्रे निवडावीत, त्या प्रातिनिधिक केंद्राच्या जोडीला लोकसाहित्य पाहणीच्या विशेष शक्यतेनुसार विशिष्ट केंद्रे निवडावीत. या संदर्भात पुढील आकृतीवरून क्षेत्रकल्पना स्पष्ट होईल.



(३) सर्व प्रकारच्या ऋतुत, जत्रायात्रा, सणोत्सव, पारंपरिक उत्सव इ. गोष्टी लक्षात घेऊन, व्यवसायाच्या दृष्टीने विशेष कालावधी व कौटुंबिक, सामाजिक लोकरूढी लक्षात घेऊन क्षेत्रातील प्रवास व निवासाची आखणी करावी.

(४) प्रवाससाधनांचा तारतम्याने वापर करावा. शक्यतो पायी किंवा दुचाकी वाहनाने, क्षेत्राचा दूर पाहून प्रवास करावा. निवासाची व्यवस्था जमेल तशी परंतु त्या त्या क्षेत्रातील कुटुंबांमध्येच करावी.

(५) क्षेत्रात प्रवास, निवास करताना ओळखपत्र जवळ असावेच. क्षेत्रीय स्तरावरील विविध शासकीय अधिकारी, लोकनेते यांच्याशी पत्राद्वारे स्वतंत्र संपर्क साधावा. संशोधन कार्य सुरू आहे हे या लोकांना माहीत असावे. म्हणजे संकलनात अडचणी येत नाहीत. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीनेही ते उपयुक्त ठरते. मात्र सर्वेक्षण, पाहणी करताना संकलनासाठी त्यांच्या माध्यमांचा उपयोग करू नये. (उदा. वाहने, सरकारी कार्यालये, शाळा, कर्मचारी इ.) सर्वसाधारण लोकात निवास करावा. (राजकीय क्षेत्रातील लोकसाहित्याचा अभ्यास करावयाचा असेल तर-राज्यशास्त्रीयदृष्ट्या - यात अपवाद होईल.)

(६) टेपरेकॉर्डर, व्हिडिओ कॅमेरा या सारख्या साधनांबरोबरच नोंदीसाठी पुष्ठिका तयार असाव्यात. पुष्ठिकेवर (कार्ड)-क्षेत्र, उपक्षेत्र, केंद्र, ग्रामनाम /शहर/ विभाग, लोकसाहित्य प्रकार, व्यक्तिनावे, सादरीकरणाची वेळ, ऋतू, महिना, तिथी, वार, नक्षत्र, दिनांक, वेळ इ. संदर्भ-विधी, प्रसंग, रूढी इ. अशी नोंद करणे आवश्यक असते. सादरीकरणातील समूहभावना अशीही स्वतंत्र नोंद करता येईल.

(७) मिळतील त्या, मिळतील तेवढ्या सर्वप्रकारच्या नोंदी करणे आवश्यक असते. संकलन करताना तोच तोपणा वाटला तरी त्या सर्व नोंदी स्थानिक पाठांसह घेणे आवश्यक आहे. मात्र असे करताना सवंगतेपासून सावध राहिले पाहिजे. उदा. आपली काही नोंद होते आहे, गाणे टेप केले जाते आहे म्हणून व्यक्ती पुढे येतात. संशोधकाने, खुबीने आवश्यक तेवढ्याच नोंदी घ्यावात. काही व्यक्ती मुद्दाम पाठात बदल करून काही म्हणून दाखवतात. कथा किंवा आख्यायिका सांगताना किंवा स्थानमाहात्म्य सांगताना विशेषतः हे घडते, मात्र निरीक्षणातून बारीकसारीक गोष्टीही सुटता कामा नयेत. पारंपरिकता, परिवर्तन यांच्या नोंदी महत्त्वाच्या



असतात. उदा. सत्यनारायण पूजेचा पोथीतील पारंपरिक मांड आणि प्रत्यक्ष परिवर्तन, लग्नप्रसंगीची गाणी यांतील परंपरा आणि परिवर्तन इ. नोंदी घेताना प्रत्येक काळातील व स्तरातील अधिकाधिक नोंदी घ्याव्यात. जत्रायात्रा, उत्सव या संदर्भातील नोंदी एकाच घटकाविषयी अनेकांकडून घ्याव्यात. उदा. निघोज येथे देवीच्या जत्रेप्रसंगी कुंडातून पाण्याने भरलेली घागर आपोआप वर येते; ही अद्भूत घटना; या संदर्भातील समजुती, कथा यांच्या नोंदी अनेकांकडून घेणे आवश्यक आहे.

(८) व्हिडिओ फिल्म, कॅमेरा या द्वारे घेतलेल्या नोंदी लिखित रूपात पुष्ठिकांवर (कार्ड) घेतल्या पाहिजेत. या नोंदी, नोंदी घेतल्या दिवशीच वा अगदी वेळ न घालवता परंतु एकांतात निवांतपणाने, वर्णनात्मक तऱ्हेने केल्या जाव्यात. या प्रकारच्या नोंदींनाही क्रमांक व पुष्ठिकांवरील सर्व प्रकारचे संदर्भ देणे आवश्यक असते.

(९) नोंदी घेत असताना लोकाविष्काराला बाधा येणार नाही किंवा नोंद घेतली जात असल्याची जाणीव 'लोक' ला झाल्यामुळे कृत्रिमपणा येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असते. संशोधनाचे विशेष अवधान असता कामा नये. शक्यतो नोंदी नकळत करणे इष्ट असते. नोंदी करताना निरीक्षण आणि स्मरण यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र निरीक्षणाचे लेखन केल्यानंतर पडताळून पाहणे आवश्यक असते.

(१०) नोंदी जमा करीत असतानाच नोंदींची यादी तयार होत जाणे आवश्यक असते. ही यादी करताना दिनांक, केंद्र, नोंदींचा संदर्भप्रकार यादीत समाविष्ट असावा.

(११) नोंदी घेण्यासाठी प्रयोगांची तारतम्याने निवड करावी.

अशाप्रकारे संकलन करताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते म्हणून अशा अडचणींची माहिती असणे उपयुक्त होय. डॉ. मांडे यांनी संकलनातील अडचणींचा पुढीलप्रमाणे आढावा घेतला आहे.[३६] - (१) समूहांतर्गत लोकसाहित्याच्या घटकांची संकेतांमुळे अनुपलब्धी. (२) संकलनाचे सामग्री देण्याच्या दृष्टीने महत्त्व नसणे. (३) संकलनाच्या हेतूविषयी शंका. (४) सामग्री देणाऱ्याची शारीरिक किंवा मानसिक अनुकूलता नसणे. (५) विशिष्ट विधीच्या प्रसंगीच म्हणावयाची गाणी किंवा पाळावयाच्या रूढी, त्यामुळे अडचणी. त्या संबंधाचे काही संकेत. (६) संकलनाच्या मर्यादा- (अ) शारीर मर्यादा (आ) बोली माहीत नसणे (इ) तेथील संस्कृती व रितीरिवाजाविषयीचे अज्ञान (७) स्त्रियांचे सहकार्य न मिळणे.

डॉ. मोरजे यांनी प्रयोगसिद्ध वाङ्मयकलेच्या दृष्टीने नोंदी घेताना प्रयोगसाधनांमुळे (संगीताच्या अंगाने) येणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला आहे.[३७] प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने लोकसाहित्य संपादनातील गैरसमजांचा आढावा घेतला आहे.[३८] तो या संदर्भात महत्त्वाचा आहे. – (१) ग्रामीण भागातील स्त्रीगीते म्हणजेच लोकसाहित्य (२) लोकसाहित्य म्हणजे जुन्यात जुने, ते केवळ वृद्धांनाच ज्ञात असते. (३) भरमसाट पर्याय आढळून होणारा गोंधळ. (४) लोकसाहित्य, गाणी व कथा एवढ्या मर्यादित अर्थानेच गोळा करणे. (५) चांगल्या (सृष्ट) गोष्टींचेंच संकलन करावे. (६) 'लोक' कल्पनेच्या संकोचाने होणारा गैरसमज – लोक म्हणजे ग्रामीण मागासलेले इ. अशा अडचणींमुळे लोकसाहित्याच्या वर्तमानकालीन रूपांकडे दुर्लक्ष होते. काही पर्याय दुर्लक्षित राहतात.

'बोलीभाषांचा अभ्यास' या लेखात 'संकलनातील विधिनिषेधांचा विचार' डॉ. सु. बा. कुलकर्णी यांनी केला आहे. त्यातील पुढील भाग हा सर्वच क्षेत्रात विचारात घेतला पाहिजे.– ''साहित्य संकलनास लागणारा कालावधी नियोजित संशोधनप्रकार व संरचनेची गुंतागुंत या दोन्हीवर अवलंबून असल्याने संकलनास किती काळ लागावा हे निश्चितपणे सांगता येत नाही. संशोधकापाशी उपलब्ध असणारी सवड, त्याप्रमाणे रोज किती तास काम होत आहे यावरही हा कालावधी अवलंबून असतो.''[३९] शिवाय संकलकाची क्षमताही कालावधी निश्चित होण्यास कारणीभूत होते.

संकलनाचे काम जोखमीचे व जिकिरीचे आहे. ज्ञानेंद्रिये हे संकलनाचे सर्वात महत्त्वाचे व प्रमुख साधन आहे. त्याचबरोबर तारतम्य, विवेक यांनाही महत्त्व आहे. संकलनातील अडचणींवर संकलकाची वर्तणूक, विवेक आणि जिद्दच मात करू शकेल हे लक्षात ठेवले पाहिजे.

**(ब) लोकसाहित्याचे संपादन :–**

संकलनाची पुढची पायरी म्हणजे केलेल्या संकलनाचे संपादन करणे होय. संपादन म्हणजेच संकलनाचे संशोधनकार्याच्या दृष्टीने व्यवस्थापन होय. या संपादनात लोकसाहित्याच्या संकलित नोंदीत किंवा पाठात कोणतेही शाब्दिक किंवा रचनात्मक अथवा जुळणीच्या दृष्टीने फेरफार चालत नाहीत. ह्या दृष्टीने प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने पुढील मार्गदर्शक तत्त्वे (सूत्रे) दिली आहेत. –

(१) अनेक पर्यायातून एक पर्याय निवडणे महत्त्वाचे. अशी निवड करताना भाषा, नैसर्गिक (सहजता) रचना या दृष्टीने सर्व पर्यायांचे जास्तीत जास्त प्रातिनिधित्व त्या पर्यायाने करावे. ठरविलेल्या परिसरातील केंद्राच्या ठिकाणी



असलेला पर्याय या दृष्टीने महत्त्वाचा असतो. त्याचा विचार करावा. (२) संग्रहण करताना घेतलेल्या नोंदींची नीट मांडणी करावी. (३) जास्तीत जास्त वर्गीकरण करून संपादन करण्याचा प्रयत्न करावा. (४) संपादन करताना कोणतेही फेरफार संपादकाने करू नयेत. या दृष्टीने लोकसाहित्याचे संपादन नेहमीच्या संपादनापेक्षा भिन्न प्रकारचे असते हे लक्षात येऊ शकेल. (५) ज्या प्रकारच्या शास्त्रीय पद्धतीने लोकसाहित्याचा अभ्यास करावयाचा असेल त्या दृष्टीने शक्यतो, लोकसाहित्याची संहिता तयार करण्याचा प्रयत्न करावा. (६) आवश्यक तेथे लगेचच स्पष्टीकरण करणे सोयीचे असते. (७) एकाचवेळी अनेक प्रकारांमध्ये मोडणारे पर्याय संकीर्णमध्ये मांडावेत. (८) एखाद्या लोकसाहित्य वस्तूचे पर्याय आढळलेच नाहीत तर त्याची निराळी नोंद करावी. (९) पर्याय निवडल्यानंतर आपल्या अवलोकनातील पर्यायांची संख्या खाली दिल्यास अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल.[४०]

वरील मार्गदर्शक तत्त्वांची क्रमवार उदाहरणे घेतल्यास ही मार्गदर्शक तत्त्वे अधिक स्पष्ट होतील.

उदा. (१) (अ) 'गारुळा' – माशी किंवा कीडा चावल्यानंतर येणारी गाठ. चाळीसगाव डागाण परिसरात क्षेत्रीय अभ्यास करताना पंचवीस उपकेंद्रांवर नोंदी करण्याचा प्रयत्न झाला. यात एकूण शंभर गावे समाविष्ट झाली. पंचवीस उपकेंद्रांपैकी सोळा उपकेंद्रांवर 'गारुळा' हा शब्द विशेषतः मधमाशी चावल्यामुळे येणारी गांधी किंवा गाठ या अर्थाने मोठ्या प्रमाणावर वापरला जातांना दिसला. दोन केंद्रांवर कोणी 'गारुळा' तर कोणी गाठ म्हणताना आढळले तर एका केंद्रावर पुटकुळी असा वापरलेला आढळला तर गारुळा शब्द काहींनी वापरला. सहा केंद्रांवर गाठ हा शब्द मोठ्या प्रमाणावर तर गारुळा हा शब्द काहींनी वापरला. लोककथेमध्ये 'गारुळा' हाच शब्द मोठ्या प्रमाणात आढळला. त्यामुळे 'गारुळा' हाच पर्याय निवडला.[४१]

(ब) इहीर तू उकारली म्हणून काय पानी तू आनला? या म्हणीवर आधारित 'शेतकऱ्याची फजिती' ही संकीर्ण विभागाला दिलेली लोककथा पंचवीस उपकेंद्रांपैकी जवळ जवळ एकोणीस केंद्रांवर व परिसरात आढळली. या कथेत 'पाखरू पाणी प्यायला आले' या घटनेला पर्याय मिळाले. साप पाणी प्यायला आला हे पर्याय चार उपकेंद्र परिसरात मिळाले तर दोन उपकेंद्र परिसरात गाय असा पर्याय आढळला. विहिरीतील पाणी पिण्यास येणारे प्राणी विचारात घेतले तर पाखरू आणि साप यांचा विचार करणे

आवश्यक होते. शेतकरी पाखराला सरकारात नेतो असा उल्लेख अधिक स्वाभाविक वाटला म्हणून तो पर्याय निवडून प्रबंधात संग्रहात संपादित केला. हा पर्याय मधुकर रामभाऊ थिगळे या कथानिवेदकाकडे संग्रहित असल्याचे नोंदविले कारण त्याचे कथानिवेदन स्वाभाविक, प्रभावी व नाट्यमय वाटले.[४२]

(२)

**नामदेव मुसाळ धरी**
**जनाबाई साळी साडी**
**''नामदेवा मुसाळ सोड**
**हाता येतील तुह्या फोड''**
**''फोड आले तर येऊ द्या**
**साळी कांडून घेऊ द्या''**
**साळी कांडऊन केली रास**
**नामदेव भरीतोय पोत**

वत्सलाबाई तुकाराम मुठे मु. शेलविहीरे यांच्या कडील मौखिक परंपरेतील संग्रहात मिळाले. पंचवीस उपकेंद्रांपैकी सुमारे एकवीस उपकेंद्रांवर हे गीत साळी सडतानाचे श्रमगीत म्हणून आढळले. त्याची गाव, दिनांक, वेळ, प्रसंग इ. सहा पर्यायांची निवड करून गीत संपादित केले.[४३]

(३) 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधात भाग २ मध्ये परिसरातील संकलित लोकसाहित्याची निवडपूर्वक संपादित संहिता केली आहे. त्यात जास्तीत जास्त विशेषांचा विचार करून वर्गीकरण केले आहे.

यात – परिसरातील लोकगीते – (१) जात्यावरच्या ओव्या (२) नवरात्रीतील गाणी (३) सण–उत्सवांची गाणी (४) दैवतांविषयीची गाणी (५) पांडुरंगाची भक्ती व संत संदर्भ (६) लग्न, पाचवी, बारसे इ. विधीसंबंधी गीते (७) भलरीगीते (श्रमगीते) (८) संकीर्ण – (अ) गावांविषयी गाणी (ब) भारूडातील गाणी (क) तमाशातील गाणी – परिसरातील लोककथा (१) अद्भूत कथा (२) प्राणीकथा (३) आख्यायिका (४) दैवतकथा (५) हास्यकथा (६) संकीर्ण– परिसराची नाम व चतु:सीमा निश्चिती विषयी नोंदी – कागदपत्रे इ. गावगन्ना पाटील व तक्षीमा इ.– शब्दकोश–वाक्प्रचार (भाग १ मध्ये पृ. ३३१) – म्हणी (भाग १ मध्ये पृ. ३३३) – अशा तऱ्हेने जास्तीत जास्त विशेषांची दखल घेऊन संपादन केले



आहे.

(४) वरील उदाहरणांत कोणतेही फेरफार केलेले नाहीत.

(५) स्वीकृत प्रबंधात सांस्कृतिक व वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यासाचा दृष्टिकोन स्वीकारला होता त्या दृष्टिकोनास अनुसरून संहिता तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

(६) 'चाळीसगाव डांगाण परिसर' या प्रबंधात आख्यायिकांना व अन्य आवश्यक ठिकाणी खाली स्पष्टीकरण केले आहे. उदा. आख्यायिका क्र. ९ – ''हरिश्चंद्र पान्याचा रांजन.''

''ह्या हरिशचंदराचा डोंगर हाये आन त्येची रानी तारामती. त्यो लांब हाये त्यो पोऱ्या रोहिदास. ह्या डोंगरामंदी सात रांजन अस. ह्या त्येली भराया सांगातलं असं, त्या राजानाली खालून को भोक असं त्या मंदुन पानी वाहाताय पर हरिशचंदर काय थकला नाही. तो मातेर पानी भरत रयला. तवा त्यातून यक नदी निंगाली. तिचा मूळ या राजनात हाये. तवा तिला मूळा म्हनत्यात. आज पोहत राजा हरिशचंदर पानी भरतां. आन त्ये सारखाच वाहयतोय. रोहिदासाला सर्प डसला आन तो का अजून यंठ हिंडतो. आज हरिशचंदाराच्या पाया पडाया येतो. आज हरिशचंदाराचा राखन कराया रोज रोज वाघ येत्यात. त्ये का बराबर रातच बारा वाजेला येत्यात.''

**संदर्भ :** हरिश्चंद्र नावाचा गड आहे. तेथे तीन डोंगर, (शिखरे), हरिश्चंद्र तारामती आणि रोहिदास या नावाने दाखावितात. येथून मुळा नदीचा उगम आहे. बाबू महादु हिले, साकिरवाडी याने ही आख्यायिका सांगितली. ही आख्यायिका सोमलवाडी, तळे, विहिर, कोथळे, आंबित, पाचनाई या गावातील सर्वच लोक सांगतात. वाटाडेही हीच आख्यायिका सांगतात.[४५]

(७) **घुटे वाडी ग पेढ्याचा डावा**
**मधी सोमठाना कशाला हवा**
**आंब्येची फुलती लागन ती खावा**
**पाचपट्याच्या रानीना रातवा घ्यावा**
**येंची बोंब तिरड्याला न्येवा**
**तिरड्याच्या पाटलानं पैसं खावा–**

हे लोकगीत राजाराम सखाराम गोडे याच्या मौखिक संग्रहातून घेतलेले आहे. गावांची नावे, व्यभिचारी वृत्ती सांगणारे गीत होळीवर (परिसरात) गातांना ही आढळली. या गीताला परिसरामधील वृत्तीप्रवृत्तींचा परिवर्तनाचा अर्थही आहे.

भौगोलिक, सामाजिक आणि सणोत्सव या सर्व विशेषांचे एकत्रीकरण येथे झालेले आहे. म्हणून ते संकीर्णमध्ये घातले आहे.[४६]

(८) (i) **गुजरातून आला वाणी कळेना बोली**
**मानीक चौकात दुकान मांडी**
**नार गेली दुकानावरी बसना खाली**
**नाकी सरजेची नथ झुरक मारी**
**दंडी कुसुबी येला वरवर सारी**
**जरीचा रुमाल वारा घाली**
**वाण्याला मुरसड आली पडला खाली**
**जी ऽ गऽ जी**[४७]

भागा शंकर घाणे–वारणघुशी, याने हे परिसरातील तमाशातील गाणे म्हणून दिले परंतु त्याचे पर्याय अन्य अन्य मंडळांमध्ये आढळले नाहीत. दोन तीन गावातील हौशी पोरे हे गीत म्हणताना मात्र आढळले.

(ii) सीताची गोष्ट– नावाची एक रामकथा कोदनी येथील रामदास संतु बांबेरे याने संपूर्ण रामायण एक लोककथा म्हणून ऐकवले. असे कोदन, शेलविहिरे व रंधा या गावातच म्हणजे उपरोक्त 'तातोंबाचा मठ' भोवतीच्या गावातच ऐकविले जाते. म्हणून त्याची स्वतंत्र नोंद केली आहे.[४८]

(९) पर्यायांच्या नोंदी (संख्या) संकलनात दिलेल्या आहेत. त्या प्रबंधात दिल्या असत्या तर अधिक शास्त्रशुद्ध झाले असते. येथे उदाहरणे देताना त्या देण्याचा प्रयत्न केला आहे.

(उपरोक्त सर्व उदाहरणे प्रस्तुत शोधनिबंध लेखकाच्या ''चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास'' या टंकलिखित प्रबंधातील असून १९७६ ते १९७७ या दोन वर्षात केलेल्या क्षेत्रीय अभ्यासाच्या आधाराने प्रबंधासाठी तयार केलेल्या संहितेतून दिलेली आहेत. ऑक्टोबर १९७९ या वर्षी या प्रबंधास पुणे विद्यापीठाने मान्यता देऊन पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे.)

लोकसाहित्याच्या संकलन आणि संपादनावेळी अभ्यासाचा किंवा संशोधनाचा हेतू किंवा विषय व दृष्टिकोन संकल्पित अथवा निश्चित असेल तर संपादनाला नेमकी दिशा प्राप्त होते. मात्र हेतू साध्य करण्यासाठी किंवा दृष्टिकोनानुसारी पर्यायांची निवड, वर्गवारी, स्पष्टीकरण, निरीक्षण नोंदींची जुळणी ओढून ताणून करता कामा नये. संपादन अत्यंत तटस्थपूर्वक, विवेकाने व जास्तीतजास्त सूक्ष्म वर्गीकरणावर आधारित असणे अभिप्रेत असते.



**(क) लोकसाहित्याचे वर्गीकरण :–**

संपादनाच्या व मुख्यतः संशोधनाच्या किंवा अभ्यासाच्या दृष्टीने वर्गीकरणाला विशेष महत्त्व आहे. साधारणतः दोन प्रकाराने वर्गीकरण करणे शक्य आहे. आकृतिबंध किंवा रचनाबंध (मौखिक, परंपरेतील, वाङ्मयीन घटकातील, आशय द्रव्याची मांडणी) आणि लोकसाहित्यातून कोणता आशय प्रगट करावयाचा आहे. (विषय आणि त्याचा अनेकविध अंगांनी विस्तार). परंतु वर्गीकरणाला मौखिक किंवा भाषिक मर्यादा पडतात कारण लोकसाहित्य हे 'लोक' चे लोकबंधात्मकतेने समग्र प्रकटीकरण असते त्यामुळे केवळ शब्दरूपांकडे किंवा शब्दमांडणीकडे लक्ष देऊनच भागत नाही. लोकसाहित्याचे व्यामिश्ररूप लक्षात घेऊनच वर्गीकरणाचा प्रयत्न करावा लागतो. उदा.–

**सीताला सासुरवास । आडवा लई लोट ।**
**सीतालाना बोलतो । पाप्या दारातून उठ ।।**
**सीताला सासुरवास । केला कस केशी ।**
**वाटून काय दिला । सगळा देशो देशी ।।**[४९]

रचनाबंधांच्या दृष्टीने या चार चरणी ओव्या आहेत परंतु त्यांना जात्याची, खुरपण्याची, कांडणाची किंवा पाणी वाहण्याची लय प्राप्त होताना दिसते. त्या त्या वेळी सादरीकरणात फरक पडतो. शब्द तेच, मांडणी तीच, ठेका बदलला. ही एक बाजू. दुसरी बाजू समाजशास्त्राच्यादृष्टीने सासूरवासाची प्रथा उलगडून दाखववी लागेल तर ऐतिहासिकतेच्या अंगाने सीता ही स्त्रीजीवनाची पुराण प्रतिमा बनते. आशयाच्या अंगाने विचार करतानाही असा फरक पडत असतो. त्यामुळे वर्गीकरण करतांना रचनाबंधाच्या अंगाने किंवा आशयसूत्राच्या अंगाने वेगवेगळे वर्गीकरण होऊ शकेल. त्याचबरोबर कृतीशी हे सादरीकरण निगडित आहे. त्याचा वर्गीकरण करताना विचार करावा लागतो. त्यामुळे वरील गीताचे रचनेच्या दृष्टीने 'ओव्या' तर कृती किंवा सादरीकरणाच्या अंगाने श्रमगीते (भलरी गीते) आणि केवळ आशयाच्या अंगाने स्त्रीगीते असे वर्गीकरण होऊ शकेल.

हेतू किंवा प्रयोजन किंवा संशोधन ध्येय व दृष्टिकोन यांचे वरील स्पष्टीकरणाप्रमाणे जेवढे शक्य घटक मानता येतील त्या त्या शक्य घटकांनुसार वर्गीकरण करणे संशोधन कार्याच्या स्वीकृत उद्देशानुसार अनुमाने काढण्यास उपयुक्त होते. असे स्वीकृत हेतूनुसार लोकसाहित्याचे वर्गीकरण करणे, स्वीकृत संशोधन कार्यात सुलभ व उपयुक्त ठरते. तरीसुद्धा शास्त्रीय वर्गीकरण पद्धतीविषयी संदिग्धता राहतेच. वर्गीकरणाचे अनेक प्रयत्न करूनही लोकसाहित्य विशारद नेमक्या एकमेव

व अंतिम वर्गीकरण पद्धतीपर्यंत पोहचू शकलेले नाहीत. आंतरज्ञानविषयासंबंधाने स्वतंत्र पायाभूत असे अस्तित्त्व हे लोकसाहित्याचे स्वरूप लक्षात घेतले तर अंतिम वर्गीकरणपद्धतीपर्यंत न पोहोचता येणेच स्वाभाविक म्हणावे लागते. प्रस्तुत शोधनिबंधात श्रीमती बर्न यांनी केलेले वर्गीकरण संकलनाच्या सोयीच्या दृष्टीने विचारात घेतले आहेच. परंतु असे वर्गीकरण लोकसाहित्य संशोधनपद्धतीच्या दृष्टीने विविध परंपरांना किंवा उपयोजित दृष्टिकोनांना कितपत उपयोगी पडेल या विषयी संदिग्धताच राहते.

लोकसाहित्याच्या अनेकविध वर्गीकरणांचा उल्लेख डॉ. सरोजिनी बाबर व डॉ. प्रभाकर मांडे यांनी आपापल्या ग्रंथांतून केला आहेच तो अभ्यासकांनी मूळातून पाहावा.

लोकगीत व लोककथा यांचे वर्गीकरण अभिव्यक्ती, आशय व रचनाबंध यादृष्टीने मराठीत बहुतेक अभ्यासकांनी केलेले दिसते. उदा. डॉ. सरोजिनी बाबर यांनी संपादिलेले, 'लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र'ची ग्रंथमाला पाहावी.[५०] प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखकाने अशा प्रकारे वर्गीकरण करून आपल्या 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधाची संहिता तयार केली आहे.[५१] त्याचे उदाहरण या आगोदर आले आहेच.

उदाहरणासाठी एक विषय निवडून लोकसाहित्याचे वर्गीकरण करता येऊ शकेल. उदा. 'नाशिक परिसरातील आदिवासींच्या लोकसाहित्याचा सांस्कृतिक अभ्यास' असा विषय समजा आपण निवडला तर पुढील प्रकारे वर्गीकरण करता येईल. -(१) देवाधर्मासंबंधी (२) सणोत्सवासंबंधी (३) लोकसंस्कारासंबंधी- जन्म, विवाह, मर्तिक इ. (४) कलासंबंधी वाङ्मय, नृत्य, नाट्य, मनोरंजन, खेळ इ. संबंधी (५) सामाजिक व्यवहार (६) सांस्कृतिक अंगाने भाषिक अभिव्यक्ती. वर्गीकरण हे अभ्यासाचे साधन आहे, साध्य नव्हे हे सतत लक्षात ठेवले पाहिजे. वर्गीकरण म्हणजे संशोधन किंवा अभ्यास नव्हे. मात्र वर्गीकरणासाठी निश्चित विचार - दिशा असणे आवश्यक असते. वर्गीकरणामुळे लोकसाहित्याची चिकित्सा सुलभ होण्यास मदत होते. त्यादृष्टीने वर्गीकरण अधिकाधिक सूक्ष्म घटकांपर्यंत होणे आवश्यक ठरते.

वर्गीकरणाच्या सूत्रानुसार वर्गीकरण शक्य असते म्हणून सूत्र स्पष्ट हवे व त्याची स्वतंत्र नोंद असावी.

संशोधकांनी आपल्या उद्दिष्टानुसार वर्गीकरण करतानाही कोणत्याही एका सूत्रानुसार वर्गीकरण करून संकलित लोकसाहित्याला क्रमांक द्यावेत व या



क्रमांकानुसार विविध घटकानुसार वर्गीकरण हे केवळ सांकेतिक स्वरूपात करावेत म्हणजे वर्गीकरणाचा पसारा वाढत तर नाहीच परंतु व्यामिश्रतेची जाण येते व गोंधळ टळतो. अनेक संशोधक वर्गीकरणप्रसंगी गोंधळात पडतात. उदा. उपरोक्त 'सीताला सासुरवास' हे गीत वर्गीकरणात कोठे टाकायचे याची निश्चिती करणे. अशावेळी वर्गीकरणाचे शक्य घटक मानून १, २, ३, ४ असे क्रमांक दिले तर गीत त्यापैकी कोणकोणत्या घटकात मोडते ते देता येईल. रचनेनुसार 'ओव्या' असे म्हणून सामाजिक आशयानुसार म्हणताना पुढे नुसते क्र. ३ व श्रमगीते म्हणून क्र. २ या प्रमाणे जसे क्रमांक ठरविले असतील तसे दिल्यास पर्यायातील व्यामिश्रता स्पष्ट होऊन स्वीकृत हेतूनुसार वर्गीकरणही होईल. अर्थात केवळ रचनांनुसारी वर्गीकरण करणे एवढाच हेतू असेल तर तेवढेच वर्गीकरण करून थांबता येऊ शकेल.

वर्गीकरण करताना निरर्थक वाटणाऱ्या बडबडगीतांचा, पालुपदांचा किंवा निरर्थक वाटणाऱ्या कृती इ. ची मोठीच अडचण होते. ही अडचण दूर करण्यासाठी संकीर्ण असे स्वतंत्र दालन करावे. उदा. अगोदर उल्लेख केलेल्या 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधाच्या संहितेत असे दालन केले आहे. येथेच एक इशारा देऊन ठेवला पाहिजे. बडबडगीते किंवा निरर्थक वाटणाऱ्या गोष्टी ह्याही परंपरांचे किंवा विशेष घटकांचे लोकमानसातील अवशेष असतात. उदा. दिवाळीच्या[५२] गाण्यात चावडीत ती निळी घोडी यातील 'निळी घोडी' हा उल्लेख निरर्थक नसून ती गावपंचायतीची म्हणजे शिवतत्त्वाची प्रतिमा आहे. चावडीत पाचामुखी परमेश्वर व त्याचे अमर्याद अधिकार म्हणूनच-

**त्याल नही चावडीत जाय**
**चावडीत व्हती निळी घोडी**
**लाथा मारी फडफडी ।।**

असा उल्लेख येतो. महादेव कोळ्यांच्या या दिवाळी विषयीच्या गीतातील हा उल्लेख थेट शिवतत्त्वाशी जोडता येतो. त्यातील रंग प्रतिमा परमेश्वरविषयक तर घोडी ही प्रतिमा अधिकारविषयक आहे. त्यातून गावपंचायतीचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते. वरवर पाहाता मात्र गीतातील उल्लेख अगदीच निरर्थक वाटतो.

**(ड) लोकसाहित्याची चिकित्सा :-**

लोकसाहित्याच्या संकलित पाठांची चिकित्सा संशोधनाच्या अनुमान प्रक्रियेत महत्त्वाची असते. चिकित्सा म्हटले की निश्चित परिमाणे आलीच. चिकित्सेसाठीची कोणती परिमाणे वापरावीत याबद्दल विचार झालेला दिसतो.

उदा. डॉ. मांडे यांनी लोकसाहित्याची वैशिष्ट्ये दिली आहेत.[५३] चिकित्साकार्यात सर्वाधिक महत्त्व संकलित लोकसाहित्याचे लोकसाहित्यपण तपासणे याला आहे. मारिआ लीच यांनी तयार केलेली 'स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोअर, लिजन्ड ॲण्ड मायथॉलॉजी' पाहणे या दृष्टीने सोयीचे होईल.[५४] त्यात दिलेल्या लोकसाहित्याच्या विविध व्याख्या वस्तुतः लोकसाहित्याचे लोकसाहित्यत्त्व स्पष्ट करणारी परिमाणेच आहेत असे म्हणता येईल. दुर्गा भागवत यांनी या संबंधी विचार मांडले आहेत.[५५] डॉ. गंगाधर मोरजे यांनी[५६] आणि प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखक यांनी[५७] लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करताना विचार मांडले आहेत. वरील सर्वांचा एकत्रित विचार करता पुढील प्रमाणे सूत्रे मांडता येतील.

(१) लोकसाहित्य मौखिक परंपरेत आढळते. परंपरेची निश्चिती क्षेत्रीय अभ्यासातील पाहणीत आढळलेल्या पर्यायबाहुल्यातून करता येते. (२) ते 'लोक'चे असते. लोकमानसाचा आविष्कार करते. (३) लौकिक (लोकप्रिय, सर्वप्रिय किंवा बहुप्रिय) ज्ञान असते. (४) ते पूर्वकालीन संस्कृतीच्या अवशेषरूपाने समाजजीवनात प्रचलित असले तरी ते मृत अवशेष नसतात. वर्तमानकालीन संदर्भात त्यांना अर्थपूर्णता असते, त्यामुळे ते सजीव व नित्य वर्तमान असते. (५) कर्ता किंवा निर्माता अज्ञात असतो.

लोकसाहित्यातील पर्यायांच्या चिकित्सेला वेगळे महत्त्व आहे. या चिकित्सेतून प्रातिनिधिक पर्याय निवडले जातात. ती संशोधनाची ग्राह्य सामग्री असते. ही चिकित्सा पुढील सूत्रांच्या आधारे शक्य होईल. (१) एका विशिष्टाचे अधिकाधिक पर्याय अभ्यासावेत. (२) जास्तीतजास्त समान वाटणारा पर्याय प्रातिनिधिक पर्याय म्हणून निवडावा. (३) साम्य घटक मौखिक, वस्तुरूप, हालचालीयुक्त, कृतियुक्त इ. स्वरूपाचे असतात. (४) त्यात मौखिक व हालचाली यांना अधिक महत्त्व आहे. (५) मौखिक पर्यायात विषयबीज, कल्पनाबंधांसाठी वापरलेल्या मौखिक प्रतिमा यांच्या साम्यावर भर द्यावा. (६) हालचालीतील साम्य हे कृती, विधी, व्यवहार यांच्याशी निगडित असते, त्याकडे तारतम्याने लक्ष द्यावे. (७) प्रातिनिधिक घटक एकाच घटक प्रकारात असू शकतील. परंतु ही संख्या कमीतकमी करण्यासाठी गणितातील म.सा.वि.(महत्तम साधारण विभाजक) सारख्या पद्धतीचा वापर करावा.

वर्गीकरणानुसार स्वतंत्रपणे लोकसाहित्याची चिकित्सा करता येते. अनुमान प्रक्रियेच्या दृष्टीने ती महत्त्वाची असते. अशा चिकित्सेकरिता पुढील सूत्रे वापरता येतील. – (१) स्वीकृत उद्दिष्टानुसारी विशेषांची पाहणी करावी (२) विषय



आणि आशय या दृष्टीने समक्ष पर्याय प्रातिनिधिक स्वरूपात निवडावेत. (३) विधी, व्यवहार, कृती, हालचाली यातील संदर्भात; साम्य लक्षात घ्यावे. त्या नुसार उपयुक्त पर्याय निवडावेत (४) केवळ वाङ्मयीन पाहणी करीत असताना अभिव्यक्ती व रचना यांना विशेष महत्त्व द्यावे. (५) दृष्टिकोनानुसार तौलनिक पाहणी करण्यासाठी समान संशोधित अभ्यास किंवा लोकसाहित्य पाहणी केल्यास अधिक प्रमाणित चिकित्सा होऊ शकते (६) वर्गीकरणाच्या सूक्ष्मतेनुसार चिकित्सा करावी: येथे वर्गीकरणाची सूक्ष्मघटककल्पना चिकित्सेचे परिणाम झालेले असते. उदा. लग्नविधी संदर्भात लोकसाहित्य असेल त्यात 'हळदविधीचे लोकसाहित्य आणखी वेगळे काढता येईल.' (७) अपवादात्मक घटाकांची स्वतंत्र नोंद करून त्याची कारणपरंपरा शोधण्याचा प्रयत्न करावा.

**(इ) संशोधन अनुमान प्रक्रिया :–**

चिकित्सेनंतरची अनुमाने करणे ही संशोधनातली महत्त्वाची पायरी असते. ही अनुमाने प्रत्येक घटकानुसार स्वतंत्रपणे केली जावीत हे गृहीत आहे. लोकसाहित्याचा विचार करता अनुमान करण्यासाठी उपयुक्त साधने पुढील प्रमाणे मांडता येतील (१) लोकसाहित्य प्रगटीकरणाची वेळ (२) प्रगटीकरण करणारा 'लोक' 'घटक लोक' / 'अंगस्वरूप लोक' (३) सादरीकरणातील संदर्भ (४) सादरीकरणातील मानसिक धारणा.

अशा काही घटकांसंबंधी अनुमाने सर्वसाधारण असली तरी काही अनुमाने विशिष्ट स्वीकृत दृष्टिकोन व विशिष्ट अभ्यास विषय यांना अनुसरून करावयाची असतात. उदा. सांस्कृतिक दृष्टीने लोकसाहित्याचा अभ्यास करताना सांस्कृतिक प्रतीके, बीजे, सांस्कृतिक अवशेष उदा. देवता कोणत्या? त्यातील क्षेत्रीय व स्थानिक यातील अनुबंध कोणता? सणउत्सवांमागील प्रेरणा कोणत्या? इ. यावर लक्ष केंद्रित करून पर्यायांविषयीच्या अभ्यासाविषयी अनुमाने करावे लागेल. लोकसाहित्याच्या चिकित्सेतून केलेली अनुमाने स्वीकृत किंवा संकल्पित हेतू, लक्ष्य, दृष्टिकोन यांना पूरक किंवा व्याघाती असू शकतील. अर्थातच पूरक आणि व्याघाती अनुमाने यांची वर्गवारी करणे आवश्यक ठरेल. अशी वर्गवारी संशोधनाच्या अंतिम निष्कर्षासाठी आवश्यक असते. दोन्ही प्रकारच्या अनुमानांमध्ये विषयाच्या दृष्टीने अतिमहत्त्वाची, स्वीकार्य व दुर्लक्ष करण्यासारखी अनुमाने असणे शक्य असते. त्यांचाही विचार संशोधकाने करून त्या त्या घटकातील अनुमान प्रक्रियेनंतर त्याची नोंद अनुमानांच्या खाली करून ठेवणे श्रेयस्कर ठरले.

अनुमाने करताना व त्यांची वर्गवारी करताना निरीक्षणातील पर्यायसंख्येला व

क्षेत्रातील व्याप्तीला महत्त्व देणे आवश्यक ठरते. तसे न केल्यास मुळातच अनुमान तर्कशुद्ध होणार नाही व संशोधन प्रक्रिया फोल ठरेल.

सर्व संकलनानंतर केलेल्या अनुमानप्रक्रियेमधून निष्पन्न अनुमानांचा क्षेत्रीय पडताळा घेण्याला विशेष महत्त्व असते. लोकसाहित्याच्या घटकनिहाय पर्यायांच्या चिकित्सेतून प्राप्त झालेली अनुमाने ही प्रयोगशाळेतील किंवा कार्यालयीन प्रक्रिया असते. संशोधकाने त्यावर शंभर टक्के अवलंबून राहणे योग्य होणार नाही. त्या अनुमानप्रक्रियेनंतर अनुमाने समोर ठेवून क्षेत्रीय निरीक्षण करणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे अनुमानांची सत्यता कसोटीला उतरते. संशोधनास बळकटी येते. अनुमानाचा उपयोग समग्र विषय/दृष्टिकोन या दृष्टीने निष्कर्ष काढताना करावयाचा असतो. त्या वेळी लोक-संदर्भ वर्णन करून लिहिणे आवश्यक असते.

पडताळा पाहण्यासाठी संकलन प्रक्रियेतील प्रवासाएवढा प्रवास व निवास आवश्यक नसतो. प्रातिनिधिक स्वरूपातील फेरफटका यासाठी पुरेसा होतो. मात्र संशोधकाचे स्वतःचे मन निःशंक होईल एवढे निरीक्षण येथे अभिप्रेत असते. एखाद्या संदर्भात शंका आली तर शक्यतो नियोजित केंद्राऐवजी पडताळ्यासाठी नजीकचे अन्य केंद्र निवडणे शक्य असते. मात्र नजीकचे केंद्र याचा अर्थ प्रातिनिधिक केंद्राला पर्याय होऊ शकेल असे लोकवस्तीचे केंद्र होय.

**(फ) लोकसाहित्याची संहिता किंवा संकलित लोकसाहित्याचे प्रातिनिधिक संग्रहरूप :-**

कोणत्याही परंपरेने किंवा दृष्टिकोनानुसार अभ्यास करीत असताना संशोधकाने आपले संशोधन निष्कर्षाप्रत नेतांना व लिखितरूपात मांडताना त्या निष्कर्षाला लोकसाहित्याचा संदर्भ (आधार) स्पष्ट व ठोस स्वरूपात देणे आवश्यक असते. त्यासाठी संहिता किंवा संग्रह स्वरूपात संकलित सामग्री मांडताना पुढीलप्रमाणे व्यवस्था स्वीकारल्यास सोयीचे ठरेल. - (१) संहिता/संग्रह तयार करण्यासाठी स्वीकृत दृष्टिकोन विषय किंवा हेतू स्पष्ट लिहावा. उदा. 'लोकसाहित्याचा मानसशास्त्रीय अभ्यास', 'लोकसाहित्याचा लोकसाहित्य शास्त्रीय अभ्यास' या प्रमाणे. (२) संहिता किंवा संग्रह करताना वर्गीकरणाची कोणती पद्धती स्वीकारली आहे ती स्पष्टपणे वर्णन करून सांगावी. उदा. सांस्कृतिक आशयनिष्ठ पद्धती असेल तर धर्मकल्पना, सणोत्सव, विधिविधाने, कला, संस्कार, विविध शास्त्रे असे घटक होतील. त्यानुसार ढोबळपणे वर्गीकरण करून त्या प्रत्येक घटकात लोकसाहित्याचे प्रकारानुसार (रचना प्रकारानुसार) वर्गीकरण करता येईल. उदा. गीते, कथा, वाक्प्रचार, म्हणी, शब्दसंकेत, मंत्र, तंत्र, मांडणी वस्तू इ. (३) अशा



वर्गीकरणाबरोबरच संग्राहक, स्थल, काल, प्रसंग, मनोवृत्ती, सहभागी लोक, केंद्र इ. गोष्टी खाली स्पष्टपणाने नमूद कराव्यात. (४) अभ्यासात क्षेत्रीय केंद्रे, घटक यांना सांकेतिक चिन्हे किंवा क्रमांकही देता येतील त्यामुळे संहितेतील किंवा संग्रहातील पसारा वाढणार नाही व अधिक सुटसुटीतपणा येण्यास मदत होईल. (५) प्रातिनिधिक नोंदीबरोबरच पर्यायसंख्या देणे महत्त्वाचे असते. या पर्यायांमध्ये जर विशिष्ट अपवादात्मक (एकमेव) पाठ आढळला तर त्यांच्या नोंदी खाली स्पष्टपणे करणे अगत्याचे असते. (६) तुलनात्मक अभ्यासासाठी अशाच प्रकारची अन्य क्षेत्रातील कोश, संग्रह, संहिता वापरावयाची असेल तर त्याची नोंद स्वतंत्रपणे केलेली असावी. त्या संहिता संकलनाचा काल इ. नोंदी देणे आवश्यक असते. (७) अशी संहिता/संग्रह स्वतंत्रपणे सादर करता येण्यासारखे साधन म्हणून उपयोगात येणार असल्याने त्यांच्या काटेकोरपणाला, नेटकेपणाला विशेष महत्त्व द्यायला हवे. (८) निष्कर्षानुसार शोधनिबंध, प्रबंध लेखनकार्य सुरू करण्यापूर्वी ही संहिता किंवा संग्रह तयार होणे गरजेचे असते. संहिता/संग्रह हाच त्या निष्कर्षांना आधार होय. लोकसाहित्याचे संपादन या मथळ्याखाली चर्चा करताना प्रस्तुत शोधनिबंध लेखकाच्या 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' या प्रबंधाला जोडलेल्या संहितेचा उल्लेख व तीतील उदाहरणे आली आहेतच.

**(म) निष्कर्ष प्रक्रिया :-**

अनुमानांचे निष्कर्षांत रूपांतर होत असते. अनेक अनुमाने, एखादा निष्कर्ष काढण्यासाठी एकत्रितपणे मदत करू शकतात. उदा. वारली ही आदिम जमात हिंदू-धर्मीय आहे, असा निष्कर्ष काढला असेल तर सांस्कृतिक घटाकांमधील सर्व घटकांसंबंधाने काढलेली अनुमाने एकत्रितपणे कार्यान्वित झालेली असतात. किंवा - बडबडगीतांना मात्रावर्तनी सामान्य ठेका असतो असा निष्कर्ष काढला असेल तर विविध प्रकारची, विषयाची व प्रसंगीची बडबडगीते व त्यावरून काढलेली अनुमाने एकत्रितपणे उपयुक्त ठरू शकतील. अनुमानाचे निष्कर्षात रूपांतर करताना पुढील गोष्टींचा विचार करणे आवश्यक वाटते. - (१) अनुमानित विशेष नेमकेपणाने व सुस्पष्टपणाने निष्कर्षात आले पाहिजेत. (२) विषय, हेतू व दृष्टिकोन यांचा साकल्याने विचार करून निष्कर्ष काढताना लोकसाहित्याचा संदर्भ येथेच देता आला तर अधिक उपयुक्त होते. (३) निष्कर्षाबरोबर तेथेच अपवादात्मक विशेष किंवा घटक मांडणे आवश्यक असते. (४) विषय/हेतू व दृष्टिकोन यांच्या अंगानुसारी किंवा घटकानुसारी निष्कर्षांचा क्रम असावा. (५)

अनुमाने ज्या पर्याय संख्येवरून काढली आहेत त्या पर्याय संख्यांचा उल्लेख शक्यतो निष्कर्ष मांडताना करावा. (६) तौलनिक पद्धतीने अभ्यास केला असेल, तर ज्या घटकांची तुलना करून अनुमाने काढली आहेत त्या त्या घटकांच्या संहितेचा उल्लेख ससंदर्भ करावा.

**(भ) संशोधन विषयाची निवड :–**

संशोधन विषयाची निवड करण्यापूर्वी कोणत्या ज्ञानशाखेच्या किंवा विषयाच्या अंगाने किंवा गाभ्याने संशोधन करावयाचे आहे ते नक्की करून पुढील गोष्टी कराव्यात – (१) संशोधनासाठी नेमके क्षेत्र, स्तर, प्रकार, वर्ग, कालावधी या गोष्टी नेमकेपणाने निश्चित कराव्या लागतात. (२) संशोधनाचा नेमका दृष्टिकोन कोणता हे ठरविणे आवश्यक असते. (३) संकल्पित कालावधी व संशोधन कार्य यांचा आराखडा तयार करणे आवश्यक असते. याला संशोधनाचे अंदाजपत्रक असे म्हणता येईल. (४) अंदाजपत्रकात संदर्भसाधने, तंत्र किंवा कार्यसाधने यांचीही निश्चिती करावी. या गोष्टी लक्षात घेऊन विषयाचे नेमकेपण ठरवावे. यात क्षेत्र आणि दृष्टिकोन यांना विषयाच्या नेमकेपणाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व असते.

संशोधनासाठी विषयांचे गट करता येतील (१) वाङ्मय व सौंदर्यशास्त्र तथा कला (२) भाषाशास्त्र (३) इतिहास, मानसशास्त्र, मानवशास्त्र, समाजशास्त्र, संस्कृती, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, न्यायशास्त्र इ. शास्त्रे (४) लोकसाहित्य शास्त्रीय, जागतिक लोकसाहित्य–तौलनिक, लोकसाहित्य सिद्धान्त संशोधन (५) वैद्यक, रसायन, भूगोल, खगोल, भविष्य, पर्यावरण, भौतिकविज्ञान इ. शास्त्रे.

'भाषिक वा मौखिक परंपरा', 'जीवन वर्तनपद्धती', 'निसर्ग आणि व्यवहार' यांच्याशी निगडित लोकसंबंधातून 'लोक' चे आत्मप्रकटीकरण (प्रयोगसिद्ध व वाङ्मयसिद्ध) हेच वरील सर्व संशोधन विषय गटांची समान अशी संशोधन सामग्री असते. या सामग्रीत आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत व्यामिश्रता असल्याने वरीलपैकी एकाच गटांत किंवा अनेक गटात एकत्रितपणे संशोधन विषयाची निवड करता येईल. या बाबत लोकसाहित्य क्षेत्र हे आंतरज्ञानविषयांचे (Interdisciplinary) क्षेत्र असल्याचे भान विषय निवडीत सतत असले पाहिजे. उदा. 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' हा प्रस्तुत शोधनिबंध लेखकाचा प्रबंध आंतरज्ञानविषयांचे स्वरूपाचा आहे.[५८] किंवा 'लोकसाहित्याची रुपरेखा' हा दुर्गा भागवत यांचा ग्रंथ लोकसाहित्य संशोधन स्वरूपाचा आहे.[५९] निवड करताना संकल्पित विषयांत ज्या क्षेत्राचे



सर्वेक्षण करावयाचे आहे त्या क्षेत्राची प्राथमिक पाहणी करणे आवश्यक असते. उदा. मावळमधील लोकसाहित्याचा अभ्यास करावयाचा आहे, त्यामागील प्रेरणा कोणती हे लक्षात घेऊन प्राथमिक चाचणीसाठी प्रवास करावा. ह्या प्रवासामुळे क्षेत्राची एकूण माहिती घेण्यास मदत होऊन विषय निवडीच्या संदर्भात अधिक नेमकेपणा व बळकटी येते.

**(न) लोकसाहित्य शोधनिबंधाचे लेखन :–**

सामान्यतः शोधनिबंधाची लेखनरीती म्हणून सार्वत्रिक मान्यता असलेली लेखनरीतीच लोकसाहित्य क्षेत्रातील शोधनिबंध / प्रबंध / संशोधन ग्रंथ यांच्या लेखनास वापरावी. तरीसुद्धा लोकसाहित्यातील शोधनिबंध लिहिताना काही ठळक मार्गदर्शक सूत्रे सांगता येतील – (१) शोधनिबंधाचे नाव / शीर्षक हे हेतू व दृष्टिकोन स्पष्टपणे सांगणारे, नेमके व अल्पशब्दात असावे. उदा. 'नवापूर तालुक्यातील लोकसाहित्याचा भाषिक अभ्यास', 'मुंबईतील दर्यावर्दीच्या लोकसाहित्याचा लोकसाहित्यशास्त्रीय अभ्यास', 'डांग जिल्ह्यातील लोकसाहित्याचा भाषाशास्त्रीय दृष्टीने अभ्यास', 'बाजारातील लोकसाहित्याचा, सामाजिक व आर्थिक अभ्यास, 'अष्टविनायक विषयक दैवतकथांचा महाराष्ट्र संस्कृती संदर्भात अभ्यास' गाव पंचायत संदर्भातील लोकसाहित्याची सांस्कृतिक व न्यायशास्त्रीय चिकित्सा इ. (२) हेतू व दृष्टिकोन प्रास्ताविकात सुस्पष्ट करावेत. त्याचबरोबर विषयाच्या व संशोधनाच्या मर्यादा, त्यांची साधने, पूर्वसूरींचे कार्य, तुलनेसाठी घेतलेली उदाहरणे, भाषा, लोक यांचा स्पष्ट निर्देश करावा. (३) लोकसाहित्य संशोधन हे प्रामुख्याने क्षेत्रीय व स्तरीय अभ्यासावरच आधारलेले असते. दृष्टिकोन व हेतू कोणताही असला तरी ज्या 'लोक'चे 'लोकसाहित्य' अभ्यासासाठी स्वीकृत केले आहे त्या 'लोक'च्या भौगोलिक व ऐतिहासिक मर्यादा स्पष्ट कराव्यात. (४) शोधनिबंध लेखनाला शेवटी संकलनातून तयार झालेल्या लोकसाहित्य संहितेचा आधार द्यावा. (५) अनुमानात्मक किंवा निष्कर्षात्मक निवेदन संहितेतील लोकबंध संदर्भाशिवाय लिहू नये. त्या संदर्भाचा उल्लेख करताना तळटीपेमध्ये संहिता घटक / प्रकार/लोकसाहित्य प्रकार इ. गोष्टींचा निर्देश करावा. संहिता न जोडता संदर्भ द्यावयाचा असेल तर संहितेत केलेल्या सर्व नोंदी तळटीपेत येणे आवश्यक होय. प्रसंगी संहितेतील अवतरणे, लेखन करताना देणे आवश्यक असते. संहिता जोडून लेखन करताना अशा अवतरणांचा उपयोग केला नाही तरी चालू शकतो. (६) संहितेच्या अखेरीस व संहिता नसेल तर संशोधन लेखनाच्या अखेरीस टेप, कॅसेट, व्हिडिओ कॅसेट यांच्या उपलब्धीचा, संग्रहाचा स्पष्ट उल्लेख सूचीच्या स्वरूपात करणे

आवश्यक असते. (७) आवश्यक असेल तर परिशिष्टे जोडून त्यात अपवादात्मक लोकसाहित्याची नोंद करणेच इष्ट असते. आवश्यक त्या टीपा, फोटोग्राफ्स, आवश्यक त्या विशेष प्रसंगांची वर्णने जोडणे आवश्यक आहे.

**(य) संशोधक : तयारी आणि व्यक्तिमत्त्व :–**

लोकसाहित्याच्या संशोधन कार्यासाठी संशोधकाची विशेष तयारी असणे व त्याचे व्यक्तिमत्त्व अभ्यासकाचे व लोकांत मिसळून 'घटकलोक' बनणारे असावे अशी अपेक्षा असते. त्या दृष्टीने काही मार्गदर्शक सूत्राचा उल्लेख इष्ट होईल–

(१) त्याला लोकसाहित्य म्हणजे काय याची जाण असली पहिजे. त्याचबरोबर संबंधित विविध शास्त्रांची तोंडओळख असणे तसेच वाङ्मय व इतर कला यांचा किमान परिचय असणे. (२) चिकाटीने व जागरूकतेने नोंदी घ्याव्यात. (३) क्षेत्रीय अभ्यास करण्याइतपत स्वभाव मोकळा असावा. भाषाज्ञान, व्यवहारज्ञान, वर्तनसभ्यतेची जाण त्याला असावी. शारीरिक क्षमताही असावी. (४) नकाशा वाचणे, पायी प्रवासाची सवय असणे, वाहने चालविण्याची माहिती असणे, दिशांचे व ऋतूंचे ज्ञान असणे आवश्यक असते. (५) दृक्‌श्राव्य साधने सहज हाताळता आली पाहिजेत. (६) क्षेत्रीय अभ्यासासाठी आवश्यक अर्थसहाय्य उभे करण्याची क्षमता संपादन करता आली पाहिजे. (७) क्षेत्रीय अभ्यासाची पद्धती माहिती असली पाहिजे. वैयक्तिक किंवा दोन, तीन, पाच, जणांच्या समूहाने संकलन कसे करावे किंवा संशोधन कार्यासाठी सहाय्यक निवडून त्यांच्याकडून संकलन कार्य कसे करून घ्यावे यासाठी आवश्यक ते कौशल्य त्यांच्याजवळ असले पाहिजे. (८) संशोधन कार्याचे नियोजन त्यास करता आले पाहिजे. (९) संशोधन क्षेत्राची (लोकसाहित्याची) परिभाषा, लोकसाहित्याचे जागतिक अभ्यासक्षेत्र याची माहिती त्याला असली पाहिजे. (१०) 'लोक' च्या पारंपरिक, परिवर्तनात्मक आणि नव्याने अस्तित्वात येत असलेल्या 'लोक' अवस्था त्याला ओळखता आल्या पाहिजेत.

संशोधकाची तयारी करून घेण्याच्या दृष्टीने पुढील योजना करता येतील– (१) विद्यापीठीय पातळीवर लोकसाहित्याचा अभ्यास स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून –विभागाचा विकास. (२) प्रशिक्षण कार्यशाळा (३) अधिकारी व्यक्तींचे मार्गदर्शन (४) क्षेत्रीय संशोधनाची पाहणी / प्रयोग करावेत. (५) संशोधन सहाय्यक म्हणून कार्याचा अनुभव. व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच प्रत्यक्ष संशोधन कार्यात काही पथ्ये पाळली जाणे आवश्यक वाटते.



**(र) संशोधन कार्यातील पथ्ये :–**

(१) लोकसाहित्य व लौकिकसाहित्य यातील भेदाचे सतत भान असावे. (२) केवळ अनुकरण न करता, स्वतः स्वीकृत केलेल्या विषय/हेतू व दृष्टिकोन यानुसार वर्गीकरणाची पद्धती ठरवावी. तसे शक्य नसेल तर रचना प्रकारानुसार वर्गीकरण करून आशय कृती संदर्भात वर्णनात्मकता टाळून संदर्भ लिहिण्याची सावधगिरी बाळगावी. (३) वर्गीकरण करताना त्या घटकातील सर्व लोकबंधांचे आढळलेले जास्तीतजास्त पर्याय घेऊन, त्यांची तौलानिक पाहणी करून जास्तीतजास्त साम्यदर्शक पर्याय ठरविण्याचे भान असले पाहिजे. (४) नोंदी करताना अनिरीक्षण, अपनिरीक्षण असे दोष घडले नसल्याची खात्री करूनच वर्गीकरणासाठी नोंदी स्वीकारण्याची सावधगिरी बाळगावी. (५) लोकबंध व्यामिश्रतेने प्रकटलेले असतात, त्यामुळे ज्या विशिष्ट घटक प्रकारात वर्गीकरण किंवा चिकित्सा करीत आहोत, प्राधान्याने त्या घटकातील लोकबंध प्रकटला आहे का याचे भान ठेवले पाहिजे. (६) लोकसाहित्य प्रयोगांच्या नोंदी करताना आणि वर्गीकरण करताना बारीकसारिक गोष्टीही सुटता कामा नयेत या विषयी सावध असावे.

कोणत्याही प्रकारच्या संशोधन कार्यात ताटस्थ्य, सतर्कता, हेतूशुद्धता व निश्चितता, दृष्टिकोनाची निश्चितता व काटेकोरपणा या विषयी सावधानता असणे आवश्यकच असते. लोकसाहित्याच्या, विशेषतः क्षेत्रीय अभ्यासात तारतम्याला सर्वाधिक महत्त्व असते. तारतम्य नसेल तर लोकसाहित्य व लौकिक साहित्य या विषयीचा संभ्रम, पर्याय निवडीच्या बाबतीत संभ्रम, अनुमाने काढण्याच्या बाबतीत चुका संभवतात उदा. –

**''डोंगरी शेत माझं ग**
**मी बेणु किती?**
**आलं वरिस राबून**
**मी मरू किती?''**[६०]

वस्तुतः कवी नारायण सुर्वे यांनी लिहिलेलं गीत धुळ्याच्या परिसरात लोकगीतासारखे परिचित, प्रचलित असल्याचे आढळले. महाराष्ट्रात नगर जिल्ह्यातही संगमनेर, अकोले तालुक्यांच्या परिसरात भलरी म्हणताना गाताना आढळले. शोध घेता कामगार चळवळीत चाळीस हजार महिलांनी सामूहिकपणे हे गीत धुळ्यात म्हटले. शाहीर अमरशेख यांच्या कलापथकात हे गीत म्हटले जात असे. गीत लौकिकगीत कसे होते आणि त्याचे लोकगीतात रूपांतर होण्याची प्रक्रिया कशी घडते याचे उदाहरण म्हणून ते लक्षात घेता येईल. परंतु धुळे

परिसरातील बोली आणि खानदेशी लोकगीते यांच्याशी तुलना करण्याचा प्रयत्न केला गेला नाही. म्हणजे लोकगीते आणि लौकिकगीत यांचे तारतम्य नसले की गफलत होण्याची शक्यता आहे. तमाशातील गाणी, संतांची गीते यांचे या सारखेच घडलेले आढळेल. अशी सर्व प्रकारची उदारहणे देता येतील. पर्याय निवडीसंदर्भात कसा संभ्रम निर्माण होतो याचे उदाहरण या पूर्वी आले आहेच. विस्तार भयास्तव आणखी उदाहरणे देणे योग्य होणार नाही.

**समारोप :–**

लोकसाहित्य संशोधन म्हणजे 'लोक' अंतर्बाह्य समजावून घेण्याची प्रक्रिया होय. 'लोक' चा प्रवाह मानवी जीवनाच्या आरंभबिंदूपासून अव्याहतपणे इतिहासाला नित्य वर्तमानात जगवीत परिवर्तनशीलतेने सेंद्रिय स्वरूपात सुरू आहे. लोकसाहित्य संशोधन हे या प्रवाहाचे स्वरूप समजावून घेणे असते. त्या प्रवाहाचे आकलन करणे असते. मानवाचा अभ्यास करताना 'लोक' प्रवाहाचा अभ्यास पायाभूत असणे अगदी स्वाभाविक असते. असे असूनही लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे संशोधकांचे उशिरा लक्ष गेले आहे. आपण जगतो तेच लोकसाहित्यात! त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास हा 'तुझे आहे तुजपाशी' चा अभ्यास असतो. प्रत्येकजण 'घटकलोक'च असतो. म्हणूनच लोकसाहित्याचा अभ्यास हा आपल्यालाच समजावून घेण्यासारखा असतो. म्हणूनच लोकसाहित्याचा अभ्यास करताना संभ्रम निर्माण होतो.

लोकसाहित्याचे संशोधन लोकसाहित्यशास्त्रीय पद्धतीने व्हावे व असे करताना अन्य ज्ञानविषयांच्या (discipline) दृष्टिकोनाचा अवलंब करूनही व्हावे अशी अपेक्षा असते. लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या उपयोजित पद्धतीच मोठ्या प्रमाणावर प्रचलित दिसतात. त्यामुळे लोकसाहित्याच्या संशोधनाला यावा तसा नेमकेपणा व सशास्त्रता आलेली नाही हे आपण पाहिलेच. नेमक्या त्याच दृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आपण 'लोकसाहित्य संशोधन पद्धती' स्वतंत्रपणे व समग्रतेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या पद्धतीला लोकसाहित्य संशोधनाची सामान्य (सर्वसाधारण–जनरल) पद्धती असे म्हणता येईल. प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने यथाशक्ती, प्रयत्नपूर्वक, ही पद्धती मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पूर्वसूरींनी केलेल्या चर्चेच्या आधारावर आणि स्वानुभवाच्या बळावर हा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न पूर्ण आहे असा दावा नाही; मात्र या दृष्टीने संशोधन पद्धतीचा विचार करण्यास सुरुवात व्हावी अशी अपेक्षा ठेवणे अस्थायी होणार नाही. या अपेक्षेनेच प्रस्तुत लोकसाहित्य संशोधन पद्धतीचे सादरीकरण!



**संदर्भसूची :–**

१) सहस्रबुद्धे (डॉ) अनिल : **'लोकबंध'**, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे– ३० लोकबंध प्र.आ.जाने. १९९५.
२) जोशी (डॉ) वसंत स. (संपा.) **'भाषा व साहित्य संशोधन'**, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे–३०, प्र. आ. १९८१ नोव्हें. 'विषय परिचय' पृ. १ व २.
३) तत्रैव.
४) तत्रैव.
५) उनि., सहस्रबुद्धे पृ. १७३.
६) तत्रैव, पृ. १६०.
७) तत्रैव, पृ. १६५.
८) बाबर (डॉ) सरोजिनी (संपा.) : **'आदिवासींचे सणोत्सव'–'चाळीसगाव डांगाण सण–उत्सव प्रसंगीची गाणी' – 'कृष्ण जन्मकथा'** पृ.१३० व १३१– ले. डॉ. अनिल सहस्रबुद्धे.
९) उनि., सहस्रबुद्धे पृ. १७१.
१०) तत्रैव, पृ. १६९.
११) मोरजे (डॉ) गंगाधर : **'लोकसाहित्य– एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र'**, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे–३० आ. प. जाने. १९८५.
१२) कुलकर्णी (डॉ) वसंत विष्णु (संकलक) : **'मराठी प्रबंध सूची'**, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर प्र. आ. १९९१.
१३) भागवत दुर्गा : **'लोकसाहित्यची रूपरेखा'**, वरदा बुक्स, पुणे १६ (सुधारून वाढविलेली आवृत्ती) ऑक्टो. १९७७ 'पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाचा पाया'.
१४) तत्रैव, प्रकरण पहिले.
१५) तत्रैव, सिद्धान्त परिपोष.
१६) मांडे (डॉ.) प्रभाकर : **'लोकसाहित्याचे स्वरूप'**, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७८.
१७) तत्रैव, 'लोकसाहित्याचे संकलन' प्रकरण ८ वे.
१८) तत्रैव, लोकसाहित्याचे वर्गीकरण प्रकरण ९ वे.
१९) रानडे (डॉ) अशोक : 'लोकसाहित्य संशोधन : एक उलट तपासणी' 'मराठी संशोधन पत्रिका' ऑक्टो. नोव्हें. डिसें. १९८२ मराठी संशोधन मंडळ, मुंबई.

२०) बाबर (डॉ) सरोजिनी (संपा.) : **'सण उत्सव' – 'बोहाडा',** डॉ. अनिल सहस्रबुद्धे, पृ.५७१. महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला पुष्प २७ वे. महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातर्फे प्रकाशित जाने. १९८८.

२१) उनि., सहस्रबुद्धे, 'लोकबंध' पृ. १६१.

२२) तत्रैव, पृ. १६४.

२३) सहस्रबुद्धे (डॉ) अनिल : **'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' 'टंकलिखित प्रबंध'** भाग दोन – कथा – आख्यायिका – पुणे विद्यापीठ पुणे १९७९

२४) तत्रैव, 'लोकगीते' व 'ऐतिहासिक डांगाण'.

२५) उनि., मांडे, प्रकरण ३, ४ व १३.

२६) उनि., मोरजे प्रकरण २.

२७) सहस्रबुद्धे (डॉ) अनिल : **'लोकसाहित्यविचार'** सविता प्रकाशन, औरंगाबाद १९९०

२८) गोडसे द. ग.: **'तुझे आहे तुजपाशी' 'आकंठ'** दिवाळी १९८८ लोकसाहित्य विशेषांक पृ. २९. ('लोकधाटी', 'पोत', 'गतिमानी' ही द. ग. गोडसे यांची पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत)

२९) उनि., सहस्रबुद्धे, 'लोकबंध' पृ. १२६ ते १२८.

३०) उनि., भागवत दुर्गा, प्रस्तावना.

३१) उनि., मांडे, प्रकरण ८ वे.

३२) तत्रैव, 'लोकसाहित्याचे वर्गीकरण', प्रकरण ९ वे.

३३) उनि., मोरजे, प्रकरण चार.

३४) उनि., सहस्रबुद्धे, 'चाळीसगाव डांगाण परिसर'.

३५) उनि., मांडे, प्रकरण ८ 'संकलनातील अडचणी'.

३६) उनि., मोरजे, प्रकरण चार.

३७) उनि., सहस्रबुद्धे, 'लोकसाहित्यविचार', 'लोकसाहित्य : संग्रहण-संपादन'

३८) कुलकर्णी सु. बा. : **'बोली भाषांचा अभ्यास'** हा लेख पृ. ६९ ते १२३ : **'भाषा व साहित्य संशोधन',** (संपा.) जोशी (डॉ) वसंत स., महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, नोव्हें. १९८१.

३९) उनि., सहस्रबुद्धे, 'लोकसाहित्य विचार'.

४०) उनि., सहस्रबुद्धे, 'चाळीसगाव डांगाण परिसर' भाग २, पृ. २४२.



४१) तत्रैव., पृ. २२५ व २२६.

४२) तत्रैव., पृ. १०८.

४३) तत्रैव., पृ. भाग २ पृष्ठ १ ते २५३.

४४) तत्रैव., पृ. भाग २ पृष्ठ १९२.

४५) तत्रैव., पृ. ११६.

४६) तत्रैव., पृ. १४०.

४७) तत्रैव, पृ. २२७ जक २३३.

४८) उनि., सहस्रबुद्धे, लोकबंध पृ. १६५.

४९) बाबर (डॉ.) सरोजिनी (संपा.) : लोकसाहित्य समिती महाराष्ट्र राज्य प्रकाशने.

५०) उनि., सहस्रबुद्धे, 'चाळीसगाव डांगाण परिसर'.

५१) उनि., सणोत्सवाची गाणी 'दिवाळी'.

५२) उनि., मांडे, 'लोकसाहित्याचे स्वरूप'. 'लोकसाहित्याची लक्षणे' प्रकरण२

५३) Leach Maria (Editor) : Standard Dictionary of Folklore, Mythology and Legend First Edn. Harper Row Paperback, Edition Published in 1984.

५४) उनि., भागवत, पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

५५) उनि., मोरजे, प्रकरण ६.

५६) उनि., सहस्रबुद्धे, लोकसाहित्य विचार, प्रकरण १ ले.

५७) उनि., सहस्रबुद्धे, 'चाळीसगाव डांगाण परिसर'.

५८) उनि., भागवत दुर्गा.

५९) सुर्वे नारायण, 'नारायण सुर्वे यांची कविता', 'डोंगरी शेत माझं गं'.

✦✦✦

# २. मिथक

या प्रकरणात आपल्याला दैवतकथा (मिथक) विषयी विचार करावयाचा आहे. मानवी जीवनाच्या आदिम बिंदूपासून माणसाच्या सामूहिक जीवनाचा म्हणजे 'लोक' चा प्रवास 'लोकबंधां' च्या माध्यमातून चाललेला आहे आणि तो अनंत काळ चालणार आहे. या लोकबंधात फार मोठा व्यापार लोककथांनी प्रवाहित झालेला आहे असे आपणास आढळते. विश्वमानवाच्या प्रगाढ जीवनाशयावर अनंतकाल, अनंत तरंग उठत असतात. अथक, अनिरुद्ध, अनिर्बंधपणाने; ते लोककथांमुळे! त्यातून जीवनाशय प्रकट होतच असतो. स्थल-काल-परिस्थिती सापेक्षतेने लोककथाही नवी नवी रूपे, वळणे घेऊन स्थल, काल परिस्थिती सापेक्षतेने निर्माण होतच असतात. कधी पर्याय स्वरूपात तर कधी पूर्णतः नावीन्यपूर्णतेने. या त्यांच्या प्रकटण्यातून मानवी जीवनाचा अंतःस्रोत अप्रतिहतपणे वाहत असतो असे जाणवते.

लोककथांचा अभ्यास करताना 'मिथक' चा विशेषत्त्वाने अभ्यास केला पाहिजे असे वाटते. लोकजीवनात व्यक्ती आणि लोक यांच्या आहार, निद्रा, भय आणि मैथून यांचे व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर ताकदीने प्रकटीकरण, उन्नयन आणि समाधान करून लोकजीवनाला सुसंस्कारित आकार आणि प्रवाह निर्माण करण्याचे सामर्थ्य या मिथकांमध्ये असते. आधुनिक समीक्षेत 'दिव्यकथा' ही एक परवलीची संज्ञा होऊन बसली आहे व ज्या अर्थव्यक्तीच्या क्षेत्रात धर्म, लोकसाहित्य, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र व ललितकथा यांचा अंतर्भाव होतो, त्या महत्त्वाच्या क्षेत्राच्या दिशेने ती अंगुलिनिर्देश करते व त्या क्षेत्रावर घिरट्या घालीत असते.[१] या दृष्टीनेही 'मिथक' चा विशेष विचार करावयास हवा असे वाटते.

**मिथक (Myth) :-**

मिथ या मूळ इंग्रजी शब्दाला दैवतकथा, पुराकथा, पुराणकथा, दिव्यकथा



असे पर्यायी शब्द आलेले आढळतात. आपापल्या परीने प्रत्येकाने आपण वापरतो तोच शब्द योग्य व व्यापक वाटतो व तो रूढ व्हावा असे म्हटले आहे. उदा. ''या ना त्या कारणाने पर्यायी शब्द योग्य वाटत नसल्याने अनेक शब्द आले. इंग्रजी Myth या संज्ञेसाठी तीच संज्ञा वापरण्याकडे अभ्यासकाची प्रवृत्ती आहे. मात्र त्या ऐवजी 'दैवतकथा' हीच संज्ञा वापरून या संज्ञेला जाणीवपूर्वक आपणास अभिप्रेत असलेला अर्थ प्राप्त करून द्यावा असे वाटते.[२] श्रीमती दुर्गा भागवत यांनी 'दैवतकथा' संदर्भात स्वतंत्र चर्चा केली आहे.[३] प्रस्तुत लेखकाने देखील 'दैवतकथा' हा शब्द वापरूनच लोकसाहित्यातील धर्मश्रद्धांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.[४] 'भारतीय मिथक कोश' ची भूमिका स्पष्ट करताना ''मिथक शब्द के मूलमें अंग्रेजी का 'मिथ' शब्द ही था किंतू हिंदीमे प्रयुक्त होकर इस शब्दने नया कलेवर धारण कर लिया है। अब इस शब्द की अर्थछबि में नविनता का समावेश हो गया है । साहित्य सृजनके क्षेत्रमें मिथक अब एक ऐसा तत्त्व है जो भाषा के व्यापक आयाम देकर रहस्यात्मकता, लाक्षणिकता और विलक्षणता प्रदान करनें में समर्थ है । यह कोई नवीन तत्त्व नहीं है किंतु संज्ञा-अभिधान के कारण इसे नय ढंग से प्रस्तुत किया जा रहा है । मिथक के विस्तृत परिदृश्य में केवल पुराणकथा ही नही, वरना लोककथा, निजंधारी कथा तथा आख्यानात्मक कथाओं का भी समावेश होता है। प्राचीन साहित्य में उपलब्ध देवता, राक्षस, गंधर्व, यक्ष, किन्नर आदिके संदर्भ मिथक के अंग बन गये है । इस प्रकार 'मिथक' का क्षेत्र बहूत विस्तृत हो गया है। और उसके अंग-उपदान असीम हो गये है।''[५]

"Myth deal with Customs especially religious customs; with ritual phenomena. They are of the most varied kind, form. They are about the creation of the world to the shape of a rock and with the supposed character and activities of whatever Gods or other supernatural beings are worshiped"[६] असे मायथॉलॉजीविषयी टीपा देताना एन्सायक्लोपीडियामध्ये नमूद केले असून, "Myth is a true story because it is a sacred story, not a true story because content but because of the concrete sacred forces which it sets to work. The recital myths of the begenings of things is part and parcle of cult, because it is cult itself and helps to gain the ends for which cult is carried on namely, the preservation and increase of life" (R.P. ttazzoni, Mitie leggend Vol, i, p. x.)[७] असे अवतरण देऊन मिथकचा अर्थ, व्याप्ती अधिक स्पष्ट

केली आहे. 'परिकथा' या मूळच्या दैवतकथाच होत्या हे अनेक लोकसाहित्य विषारदांनी मान्य केले आहे असे डॉ. प्रभाकर मांडे यांनी सूचित केले आहे.

मिथ (Myth) या मूळ इंग्रजी शब्दाने ज्या अर्थच्छटा व्यक्त होतात त्यातून परतत्त्वाच्या अनुभूतीची भावना, श्रद्धा व्यक्त होते. 'मिथ' शब्दाला मराठीत किंवा भारतीय भाषेत वापरलेले शब्द उपरोक्त अनुभूतीची भावछटा प्रकट करतात त्या दृष्टीने पुराकथा, पुराणकथा, धर्मकथा, दिव्यकथा, दैवतकथा हे शब्दही रूढ व्हायला हरकत नाही; परंतु 'लोकबंध' ही संकल्पना मुळातच मानवाची विश्वात्मक सामाजिकतेची चर्चा करणारी आहे. मानवाच्या लोकबंधात्मक जीवनप्रवासाचा, लोकसाहित्याचा, ललितकलांचा, ललित साहित्याचा मानववंशशास्त्र व मानवीशास्त्रे तसेच भाषाशास्त्रांचा सखोल अभ्यास करण्यासाठी 'मिथ' हा शब्द पारिभाषिक शब्द तसाच वापरण्याची जी वृत्ती लोकसाहित्य विशारदात दिसते ती योग्य आहे असेच म्हणावे लागेल. हिंदीमध्ये किंवा भारतीय भाषांमध्ये 'मिथ' चा 'मिथक' असा जो पर्याय निर्माण झाला आहे तो स्वीकारण्यास हरकत नाही. या पुस्तकातील चर्चेत म्हणून 'मिथक' हा शब्द स्वीकारला आहे. तो मराठीत रूढ करण्यास हरकत नाही असेच यातून सूचित करावयाचे आहे. 'मिथक' या शब्दाला अधिकाधिक व्यापक अर्थच्छटा प्राप्त होत आहे. त्यामुळे 'मिथक' कथामागील निर्मितीविषयक कारणमीमांसा सखोलपणे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे वाटते.

**मिथक निर्मिती–मानवी प्रवृत्ती :–**

मिथक निर्मिती कशी झाली असावी; हा सर्वांनाच कुतूहलाचा विषय आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की जीवनाचा बहुतेक भाग या दैवतकथांनी (मिथक) व्यापून टाकला आहे. प्रतिमा, प्रतीके, रूपके, दृष्टांत, श्रद्धाविषय अशा अनेक प्रकाराने एवढेच नव्हे तर विशेषनामे आणि विशेषणे यांच्या स्वरूपातही आपणास 'मिथक' चा प्रभाव जाणवतो आहे.

मिथकाची निर्मिती कशी झाली असावी याचा जेव्हा आपण विचार करू लागतो तेव्हा स्वाभाविकपणे आपले मन मानवी जीवनाच्या आदिम बिंदूजवळ जाण्याचा प्रयत्न करते. परंतु तो आदिम बिंदू खरोखरीच आपणाला सापडला का? जेव्हा केव्हा माणूस कुतूहलाने स्वजीवनाच्या मुळाचा शोध घेऊ लागला असेल तेव्हाही कदाचित तो असाच गोंधळात पडला असेल का? उत्पत्ती विषयीचे जे तर्क आज मानवी स्त्री–पुरुष संबंध व जननप्रक्रिया यांच्या अनुभवातून केले जातात, ते तर्क, प्रयत्न व विज्ञानाच्या अंतिम सत्यापर्यंत पोहचू शकतील का? उदा. डार्विनचा उत्क्रांती सिद्धान्त अंतिम सत्याच्या कसोटीवर कितपत उतरू



शकला? भौतिकशास्त्राच्या, खगोलशास्त्राच्या सिद्धान्ताची सुद्धा परिस्थिती काही प्रमाणात अशीच आहे हे आपणास अनंत विश्वाचा वेध घेताना सातत्याने ध्यानात येते. तरी देखील माणूस आपल्या प्रतिमेवर विसंबून सातत्याने विश्वाच्या अंतिम सत्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीतच असतो. संशोधन कधी संपत नसते असे म्हटले जाते ते याच अर्थाने होय. ही सगळी चर्चा याचसाठी आहे; की मानवाने 'मिथक' निर्मिती का केली असावी किंवा त्याच्याकडून ती का झाली असावी या प्रश्नांची उकल करता येईल का? लोकसाहित्याचे जागतिक अभ्यासक्षेत्र या प्रकरणातील सिद्धान्त परिपोष या चर्चेत दुर्गाबाईंनी चेंबर्स एनसायक्लोपीडिया (१९०४) IV Folklore pp. 710 नुसार दैवतकथेची व्याख्या दिली आहे. ''मानवी स्वरूपातील अमानवी किंवा दैवी कृतीचे आदिमानवाला झालेले जे दर्शन त्या दर्शनाचे प्रतीक म्हणजेच दैवतकथा'', लोकसाहित्याच्या अभ्यासासंदर्भातील जागतिक पातळीवरील विचारवंतांच्या सिद्धान्ताचा परामर्ष दुर्गाबाईंनी घेतला आहे.[१] त्यात भाषाशास्त्रीय संप्रदाय (Philological School), निसर्गरूपकवादी संप्रदाय (The Nature-Symbolists), भ्रांतकल्पनावादी (Euhemerist School), स्पष्टीकरणवादी संप्रदाय (etiological School), मानवशास्त्रीय संप्रदाय (The Anthropological School), उत्तरजीवित्त्ववादी संप्रदाय (Survival Theory), वितरणवादी संप्रदाय (Distributionist School), प्रसारणवादी संप्रदाय (Diffusionist Theory), ऐतिहासिक- भौगोलिक संप्रदाय (Historical and Georaphical School), मानवशास्त्रीय अमेरिकन संप्रदाय (The American Anthrological School), मानसशास्त्रवादी संप्रदाय (Psychological School), कार्यान्वयी संप्रदाय (Functional School) या सर्व सिद्धान्तानी 'Myth' चा विचार केला व आपापल्या परीने मिथ निर्मितीचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु कोणत्याही एका सिद्धान्ताने अंतिम सत्यापर्यंत पोहोच केली आहे का, हा चिंतनाचा विषय आहे. भारत हा तर कथाप्रिय देश आहे. भारतीय परंपरा अतिप्राचीन असून त्यातही दैवतनिर्मितीचा वेध घेतला आहेच, एवढे असूनही आपले समाधान होत नाही आणि तसे होणे शक्यही नाही. वास्तविक उपरोक्त सिद्धान्ताचा एकत्रित विचार करू लागलो की आपण पुन्हा पोहोचतो ते मानवी जीवनाच्या आदिम बिंदूपाशीच अर्थातच तेथूनच आपणास विचार करावयास हवा. एक खरे की उपरोक्त सर्व सिद्धान्तांनी हे पुन्हा पुन्हा सिद्ध केले आहे की 'मिथक' अतिप्राचीन असे असले पाहिजे. या कथांवरून दैवतकथाशास्त्र (Mythology) अस्तित्वात आले आहे. परंतु मानवी जीवनाचा विचार करताना

केवळ (Myth) मिथकाचा विचार करून चालत नाही हेही ध्यानात घेतले पाहिजे. मिथक निर्मितीचा विचार करताना येथेच आपण 'लोक'च्या निर्मिती जवळ येतो. 'लोकबंध' ची चर्चा करताना आपणच 'लोक' ही संकल्पना स्पष्ट केली आहेच. लोक म्हणजे एकत्रितपणे जास्तीतजास्त सुखकर जीवन जगण्यासाठी एकत्र आलेला माणसांचा समुदाय, हा समुदाय समान मनस्क असतो अशी प्रस्तुत लेखकाने मांडलेली 'लोक'ची संकल्पना आली आहे. एकत्रितपणे याचा अर्थ व्यक्ती व समष्टी दोन्ही स्तरावर होय. येथेच 'मिथक' निर्मिती प्रवृत्तीचे मर्म दडलेले आहे असे म्हणता येईल. माणसाचे अन्य प्राण्यांपासूनचे वेगळेपण लक्षात घेतले की त्यातूनच मानवाची प्रकृती, संस्कृती व विकृती स्वरूपात कशी साकारते हेही स्पष्ट होते. ही प्रक्रिया लक्षात घेतली तर स्वास्थ्य आणि सुरक्षितता म्हणजेच समाधान आणि संरक्षण ह्या गोष्टीसाठी मानवाचे शोधन सुरू असते असे म्हणता येईल. हे शोधन 'लोक' संस्थेमध्ये व्यक्ती आणि समष्टी या दोन्ही स्तरावर असते. हे शोधन भयापासून मुक्तता आणि भूक, काम यांचे शमन आणि विश्रांतीची हमी ह्यासाठी सुरू असते. ह्या गोष्टीसंबंधी साशंकता व हमी ज्या ज्या चर आणि अचरात मानव पाहतो, अनुभवाचे सातत्य अनुभवतो तेथे तो लीन होतो, शरण जातो, अभय वाटले की तो निवांत होतो. अर्थातच ही विकारांच्या संदर्भात सर्वच प्राण्यात आढळणारी प्रवृत्ती आहे. उदा. मांजर, कुत्रा, इ. प्राण्यांना मनुष्य प्राण्याचे प्रथमतः भय वाटते परंतु आपण त्याला खाऊ घातले, हाकलले नाही व या आपल्या वर्तनाचे सातत्य त्याला अनुभवाला आले की ही जनावरे माणसावर भरवसा ठेवून निवांत होतात. केवढा विश्वास माणासाबद्दल त्यांच्या मनात निर्माण होतो! हे जर असंस्कृत प्राण्यामध्येही पाहावयास मिळते तर मन असलेला, बुद्धी असलेला, विचार करणारा, भूत, वर्तमान, भविष्य यांचेच नव्हे तर युगांचे भान असणारा, प्राप्त प्रकृतीस आकार देऊन उपयुक्त बनविणारा माणूस, त्याची या संदर्भातील प्रतिक्रिया कोणत्या स्वरूपाची असेल? मानवाची ही समाधानाश्रयी प्रवृत्ती त्याच्या मनात मिथक भावना जागृत करते असे म्हणता येईल. सूर्य, चंद्र, तारे (तेज), जल, पृथ्वी (माती), वायू (वारा) आणि सूर्यचंद्रतारे, जल वायू यांना पृथ्वीपर्यंत घेऊन येणारे आकाश ह्या पंचमहाभूतांपासून मिळणारे स्वास्थ्य त्याने सातत्याने अनुभवले, त्यांचा प्रलयंकारी क्रोधही त्याने अनुभवला आणि या पंचशक्तींना तो शरण गेला, त्यांवर प्रेम करू लागला. त्यांवर विसंबू लागला, त्यांची वाट पाहू लागला, त्यांच्या विषयी श्रद्धा त्याच्या मनात जागृत झाली आणि त्याच्या अंतःकरणात मिथक भावना जागृत झाली. त्यांचा उपयोग, त्यांच्यापासून



संरक्षण, त्यांची प्रसन्नता ह्यासाठी विनम्र भावाने तो प्रयत्नशील झाला. विनम्रपणे श्रद्धेने परंतु स्वबुद्धीने तो त्यांचे निरीक्षण करू लागला. त्याच्यातून उद्‌भवलेल्या प्राणी, वनस्पती, जल, उष्णता, वायू यांचा तो स्व स्वास्थ्यासाठी व आपल्या 'लोक' स्वास्थ्यासाठी उपयोग करू लागला. स्व सकट 'लोक'ला सर्वतोपरी सांभाळण्याची ताकद आणि विनाश घडविण्याची ताकद त्याने त्यात पाहिली. स्वशरीरातही ह्याच पंचमहाअस्तित्त्वांचा अनुभव त्याने घेतला आणि यातूनच या पंचमहाअस्तित्त्वाविषयी लोकमनात मिथ तयार झाले. पंचमहाअस्तित्त्वाच्या आश्रयाने संपूर्ण विश्व साकारले आहे हे त्यास जाणवले. त्या शक्तींचे आकलन होत असतानाच त्या शक्तींच्या उपयोजनांचा ध्यास त्याला लागला. सृष्टीतील सजीवनिर्जीवांचे स्व-लोक जीवनासाठी उपायोजन करण्याचा ध्यास त्याला लागला. आणि त्याच्या संस्कृतीची चक्रे फिरू लागली. (अथवा विकृतीची चक्रे फिरू लागली) त्यात जेथे जेथे म्हणून मिथक-भावना जागृत झाली तेथे तेथे त्याची समाधानाश्रयी प्रवृत्ती जागृत झाली व त्यातून मिथकांचा जन्म झाला असे म्हणता येईल. परंतु एवढ्याने संपूर्ण मिथक निर्मितीचे स्पष्टीकरण होणार नाही यासाठी आणखी काही मानवी जीवनाश्रीत गोष्टींचा विचार करावा लागेल.

माणूस आहार, निद्रा, भय आणि मैथून एवढ्या गोष्टींच्या समाधानाने संतुष्ट होत नाही. त्याला आणखी एक बुद्धिजन्य सहजप्रवृत्ती आहे. तो स्व ला आणि सृष्टीला; अनुभवास येणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल सतत प्रश्न विचारतो. का? आणि कसे? हीच त्याची जिज्ञासा प्रवृत्ती होय. प्रश्न विचारून तो थांबत नाही तर 'आपुलाच वाद आपणाशी' अशा तऱ्हेने त्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर शोधतो. पूर्वसूरींनी शोधलेली उत्तरे स्वीकारतो, जाणून घेतो, ताडून पाहतो. हे काम तो एकटा करतो असे नाही तर समानमनस्क असलेल्या 'लोक' चेच हे मंथन चाललेले असते. यामुळेच तर मानवी संस्कृतीचा स्रोत अप्रतित वाहतो आहे. जेथे त्याची निर्णयशक्ती (बुद्धी) वा संपूर्ण समूहमनाची निर्णयशक्ती (बुद्धी) थक्क होते, कुंठीत होते तेथेही त्याच्या मनःशक्ती थांबत नाहीत. कल्पनाशक्ती, प्रतिभाबलाने काही निर्णयशक्ती पलीकडील संगीत, कार्यकारणभाव जोडते. 'लोक' मधील घटक, प्रतिभावंत धुरीण व्यक्तित्व हे कार्य करते पण हा त्याला आलेला अनुभव त्याच्या एकट्याचा नसतो तर समानमनस्क समूहाचा असतो. तो समूहाच्या आत्मप्रकटीकरण स्वरूपात व्यक्त झालेला असतो. म्हणजे व्यक्तीच्या अनुभवाला समूहाची आत्मानुभूतिपूर्वक मान्यता असते. ही लावलेली संगती सत्य असते असे म्हणता आले नाही तरी ती अंतिम सत्याच्या जवळचे पाऊल असते. निदान तशी 'लोक' ची श्रद्धा असते

आणि ती श्रद्धा लोकजीवनास प्रवाहित होते. ही संगती पूर्णतः नवीन असते का? ती अपूर्वमात्र असते हे खास! म्हणजे येथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की समाधानाश्रयी प्रवृत्तीबरोबरच माणसाची ही अस्तित्त्वसंगती प्रवृत्तीही कार्यरत झालेली असते. येथेच मिथ तयार होतात. म्हणजे मिथक प्रवृत्तीचे अस्तित्त्वसंगती प्रवृत्ती हे एक अंग आहे. येथे ही गोष्ट आणखी स्पष्ट केली पाहिजे की, मानवी जीवन प्रवाहाबरोबर, त्याच्या काल, परिस्थिती, स्थल सापेक्षतेबरोबरच त्याच्या या 'श्रद्धांना' नवी रूपे नवे संदर्भ प्राप्त होत जातात, परंतु मूळ श्रद्धाबिंदू ह्या ना त्या प्रकारे युगे स्थिर असतो. भारतीय देवतांची संख्या आणि विविध रूपे हे त्याचे उत्तम उदारहण आहे असे म्हणता येईल.

अस्तित्त्वसंगती प्रवृत्तीबरोबरच माणसाजवळ शरण प्रवृत्तीही दिसून येते. अद्‌भूत, अतींद्रिय, दिव्य अशा अनुभूती हे मानवी जीवनाचे खास वैशिष्ट्य म्हणता येईल. या अनुभूतीतून त्याला सतत जडचेतनात, विश्वात व विश्वाबाहेर स्थिती, गती, निर्मिती, चैतन्य निर्माण करणाऱ्या आगळ्या शक्तीची जाणीव सातत्याने झाली आहे. त्यामुळे तोच आपला व संपूर्ण विश्वाचा मूळ स्रोत, आरंभबिंदू आहे असे त्याला जाणवत आले आहे. या मूळ शक्तीला त्याने परतत्त्व, चैतन्य या सारखी नावे दिली आहेत. या शक्तीचा अनुभव त्याने अणुअणुंत घेतला आहे. त्या शक्तीचा अनुभव त्याला जेथे जेथे घडतो तेथे तेथे तो त्या शक्तीला शरण जातो. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, त्याची अनुभूती त्याच्या समाधानाश्रयी प्रवृत्तीला आणि अस्तित्त्व संगती प्रवृत्तीलाही व्यापून उरते. त्याच वेळी ही अनुभूती व्यक्ती आणि समष्टीच्या जीवनाचा एक भाग होते. भोवतालच्या विश्वातून काल परिस्थिती सापेक्ष संदर्भ तिला येऊन चिकटतात. यातूनच नव्यानव्या मिथक तयार होत राहतात. म्हणजे मिथक-प्रवृत्तीचे ही शरण-प्रवृत्ती एक अंग बनत असते. आणि ते अविभाज्य अंग आहे असे म्हणता येईल.

समाधानाश्रयी प्रवृत्ती, अस्तित्त्व संगतीप्रवृत्ती व शरणप्रवृत्ती ह्या एक प्रकारे सापेक्ष प्रवृत्ती आहेत असे म्हणता येईल. अर्थातच या प्रवृत्ती व्यक्ती आणि 'लोक' या दोन्ही स्तरावर आणि मुख्यत्वेकरून 'लोक' स्तरावर सापेक्ष वाटणाऱ्या आहेत. या तीनही ठिकाणी त्याच्या विकारांचे वा त्याच्या मनाचे सापेक्ष समाधान झालेले असते. त्याच्या जीवनाची संगती आणि प्रवाह त्यातून सिद्ध होत गेलेला असतो परंतु आणखी एक प्रवृत्ती यापेक्षा वेगळ्या तऱ्हेने अनुभवास येते ती म्हणजे निरपेक्ष आनंद प्रवृत्ती. मानवीजीवन, सृष्टी यांच्या अखंड क्रियेकडे निरपेक्षतेने पाहण्याची प्रवृत्ती. यातूनच सृष्टीतील रंग, रूप, रेखा, नाद, स्थिती, गती यांची



नित्य नाविन्यपूर्ण अनुभूती येते. निरपेक्षपणाने चाललेला हा विश्वाचा स्रोत त्याला एक 'केवलक्रीडा' म्हणून अनुभवाला येतो आणि येथे त्याला या संपूर्ण विश्वाच्या मूल कारणाची निर्गुण, निराकार अशा निरपेक्ष चैतन्यतत्त्वाची साक्ष पटते, तेच त्याला 'स्व', 'लोक', 'विश्व' याचे खरे स्वरूप आहे असे वाटते. तेथे त्याची सापेक्षता गळून पडते, त्याचे अस्तित्व हरवते, अंतिम समाधान गवसले वाटते. हा अनुभव मानवाला क्षणाचा आणि चिरकालाचा येतो. या अनुभवानेच जीवनाला गूढ, गाढ, चैतन्यमय अशी आशयघनता लाभते. मानवाला जीवनाचे अंतिम ध्येय दर्शविणारी ही प्रवृत्ती असते. येथेच 'लोक' च्या प्रवाहाला धर्माचे अधिष्ठान प्राप्त होते आणि ह्या 'लोक' प्रवाहाला मूल विश्वकारणापासून वर्तमानच नव्हे तर भविष्यकालाचेही आशयघन संदर्भ लाभतात. मिथक प्रवृत्ती निर्माण होऊन कार्यान्वयित झालेली असते.

परंतु एवढ्याने मिथकांची निर्मिती झाली आणि ह्या मिथकांचे अस्तित्व अनादी अनंत टिकून राहिले असे नव्हे. हे खरे की जेथे 'लोक' तेथे अशी मिथके वरील प्रवृत्तीतूनच निर्माण झाली आहेत असे तार्किकतेने मांडता येईल परंतु त्यांचा प्रवाह अप्रतिहतपणे वाहत राहिला तो भाषेच्या माध्यमातून. या मिथकांना विधिकथा, प्रतिमा, प्रतिके, रूपके, नामे, विशेषणे, वाक्‌प्रचार, म्हणींचे, दृष्टांतांचे स्वरूप प्राप्त झाले, ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले ते मात्र मानवी भाषेमुळे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. भाषा हे 'लोक' चे खास वैशिष्ट्य आहे. 'लोक' चे अस्तित्त्वच मुळी भाषेवर व तिच्या पारंपरिक अनुसरणावर अवलंबून आहे असे म्हणता येईल. मानवाला येणाऱ्या अनुभूतींचे प्रकटीकरण तो भाषेच्या माध्यमातूनच करू शकतो. मानवी जीवनाला भाषेनेच अर्थ भरला आणि प्रवाहित केले आहे, त्यामुळे ह्या सर्व प्रवृत्ती भाषेमुळेच 'लोक' मध्ये प्रकट होऊ शकतात. भाषा ही समूहाची म्हणजे 'लोक' ची असते म्हणूनच वरील प्रवृत्तीतून घडलेले मिथकांच्या स्वरूपातील आत्मप्रकटीकरण हे 'लोक' चे आत्मप्रकटीकरण असते. येथे हे लक्षात घ्यावयाचे की मिथकांच्या निर्मितीत वरील मिथक प्रवृत्तीत अंगीभूत असलेल्या प्रवृत्तीबरोबरच भाषा हे महत्त्वाचे नव्हे तर पायाभूत अंग आहे.

मिथक-प्रवृत्तींबरोबरच विचार केला की निरनिराळ्या संप्रदायांनी विशिष्ट दृष्टिकोनातून मिथकांचा कसा विचार केला असेल हे सहज ध्यानात येते. येथे आपणास मिथक निर्मितीमागील मूलभूत प्रवृत्तींचा शोध घेण्याचा प्रयत्न करावयाचा होता.

**मिथकांचा प्रवास :–**

**(अ) मौखिक परंपरा –** 'लोक' मध्ये मिथक निर्मिती कशी होऊ शकेल हे पाहण्याचा प्रयत्न केल्यानंतर ह्या मिथकांचा मानवी जीवनातील प्रवास नेमका कसा होत आहे हे पाहणे मोठे रोचक होईल. 'लोक' च्या आत्मप्रकटीकरणाचे, व्यवहाराचे, अस्तित्व संगती मांडण्याचे 'लोक' ला स्थैर्य प्राप्त करूनही जीवनप्रवाह अप्रतिहत वाहविण्याचे कार्य भाषेने केले आहे हे खरे परंतु, लिखित रूप जोपर्यंत गवसले नव्हते तोपर्यंत अर्थातच मौखिक परंपरेनेच ही मिथके लोकमानसात वाहत राहिली. जीवनव्यवहारातून, गुरुकुलातून त्यांना सतत उजाळा प्राप्त होत गेला. मिथकांना ऐतिहासिक आणि श्रद्धेच्या दृष्टीने महत्त्व असल्याने लोकजीवनाला व्यष्टी आणि समष्टी दोन्ही पातळीवर अंतिम सत्यापर्यंत पोहोचविण्याचे, व्यवहार आणि भावना यांना श्रद्धापूर्ण अधिष्ठान देण्याचे सामर्थ्य 'लोक'नेच आत्मप्रकटीकरणातून दिलेले असल्याने लोकधारणेचे ते अविभाज्य अंग बनले. धर्माचे ते अधिष्ठान बनले. मिथकांना मंत्रसामर्थ्य प्राप्त होत राहिले. आणि त्यामुळे मिथकांचा मौखिक प्रवास जाणीवपूर्वक, श्रद्धेने, दृढतेने, नवे संदर्भ, नवी संगती बहाल करीत होत राहिला. भारतीय वेदवाङ्मय हे त्याचे उत्तम उदाहरण आहे असे म्हणता येईल. ही मौखिक परंपरा भाषेला लिखितरूप प्राप्त झाल्याने थांबली असे मात्र मुळीच नाही. मिथक हा श्रद्धेचा विषय असल्याने श्रद्धाबळाने मानवाला मिथकांचा त्याच्या नित्य जीवनात नवा व स्थलकाल परिस्थितीसापेक्ष अनुभव येत आहे. या अनुभूतींची संख्या असंख्य असते. लोकमानसातील सर्वच अनुभूती लिखित स्वरूपात उतरलेल्या नसतात. त्यामुळे मिथकांची मौखिक परंपरा सुरूच असल्याचे आपणास जाणवते.

मौखिक परंपरेमुळे लोकजीवनात निर्माण झालेल्या मिथकांना निरनिराळ्या 'लोक' चा संपर्क, संघर्ष, स्वीकार, संकर झाल्याने जागतिक पातळीवर प्रवास आणि स्वीकार झालेला दिसतो. विविध सांस्कृतिक जीवनात, धर्मात समान मिथक सापडतात असे दिसून येते. दुर्गाबाईंनी अशी उदाहरणेही आपल्या चर्चेतून दिली आहेत.[१०]

लोकजीवनात या मिथक प्रतिमा, रूपके, दृष्टान्त, नामे, विशेषनामे याही स्वरूपात मौखिक परंपरेने वाहत असतात. उदा. राम व रावण, सूर्य, चंद्र, गंगा इ. यांच्या मिथकांना असे रूप प्राप्त झाले. लोकजीवनात मिथकांचा हा प्रवास जीवनाला प्रगाढ अर्थ देणारा असतो असे दिसून येते.

**(ब) लिखित परंपरा :** भाषेचे लिखित स्वरूप निर्माण होताच या मिथकांना



ग्रंथरूप मिळाले व हे ग्रंथ लोकांची श्रद्धास्थाने झाली. भारतीय परंपरेतील वेद, दर्शने, उपनिषदे, देविभागवत, पुराणे, रामायण, महाभारत या ग्रंथांना धर्मग्रंथांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. हीच गोष्ट धर्मग्रंथांच्या संदर्भात घडली आहे. मिथकांना प्रामाण्य प्राप्त झाले, त्यांना मानवाचा प्राचीन इतिहास मानले जाऊ लागले याचे फार मोठे श्रेय लिखित परंपरेला द्यावे लागेल. मौखिक परंपरेत मिथकांना प्रामाण्य नव्हते असा याचा अर्थ नव्हे. संहितानिष्ठ प्रामाण्य असा याचा अर्थ होय. लोकबंधाचे प्रामाण्य हे लोकमानसाचे फलित असते त्यामुळे कोणत्याही मौखिक परंपरांना लिखित परंपरेने त्यांना बाधा येत नाही.

भाषेच्या लिखित स्वरूपातून ललित साहित्याचा उदय झाला. धर्म, नीती, तत्त्वज्ञान व अन्य शास्त्रे यांचा जन्म झाला आणि त्यात मिथकांचा प्रवास खूपच महत्त्वपूर्ण ठरल्याचे अनुभवास येते.

**मिथकांची निर्मितीप्रक्रिया :–**

मिथकनिर्मिती ही एक मानीव प्रवृत्ती आहे हे आपण पाहिले. ह्या प्रवृत्तीची प्रक्रिया नेमकी कशी घडते व मिथक कसे अस्तित्वात येते हे पाहण्याचा प्रयत्न करूया. कासिरेर यांची या संबंधित भूमिका दि. के. बेडेकर यांनी दिली आहे. ''दिव्यकथा हा मानवी मनाचा भ्रम नसतो, मानवी मनाला भावलेले वास्तव आणि मन यांची एकात्मता जेव्हा दिव्यात्म जाणिवेत साधली जाते तेव्हा दिव्यकथा जन्मते व तीच वास्तव म्हणून नांदते.''[११] यातून मानवी मन आणि भोवतालच्या विश्वाचे वास्तव ज्ञान यांचा संयोग दाखविला आहे. सत्यज्ञानाची जाणीव ही ज्ञान अणि मन यांच्या संयोगातूनच घडते मग ती जाणीव मानसिक, सांस्कृतिक संकल्पना संदर्भात असो, की विश्वातील शक्तींविषयी असो वा निरपेक्ष परतत्त्वाची असो. आणि ही जाणीव प्रतिभास्पर्शाने कथात्मरूप धारण करून अवतरते. अर्थात मिथकाच्याच बाबतीत हे घडते असे नाही एकूणच मानवी प्रकटीकरणाच्या मुळाशी ही प्रक्रिया असते. भारतीय मिथक कोशात म्हटले आहे ''श्रीमती लेंगर ने प्राकृतिक शक्तियों के उत्पात और अतिमानवीय शक्तियों से दबी हुई मानव इच्छाओंके संघर्ष को मिथक तत्त्व का मूल कारण माना है। मिथक इसलिये मिथ्या कल्पना या युटोपिया न होकर सत्य के मूल तक पहुंचने का एक नैतिक उपक्रम है।''[१२] म्हणजे प्रकृतीतील वास्तविक शक्ती आणि मानवी मन यांचा मानवी जीवनातील उपरोक्त प्रवृत्तींमुळे संघर्ष चाललेला असतो आणि त्यातून मिथक निर्मिती घडते. ''जब मानव अपने चारो ओर फैले जडचेतन जगतको देखता है तब वह सर्वव्यापी होकर सब कुछ नहीं देख पाता। परोक्ष की कल्पना करता है। मिथक के माध्यमसे

अनदेखे और अनचिन्हे जगत में प्रवेश करता है। मिथक के प्रयोग का यह क्रम आदिम मनुष्य से लेकर आजतक बुद्धिविकास की प्रक्रिया के साथ चला आ रहा है और अनंत काल तक चलता रहे''[१३] याचाच अर्थ जिज्ञासापूर्तीच्या ध्यासाने पछाडलेला माणूस आपल्या प्रतिभाशक्ती बळाने मिथक निर्मिती करीत असतो. अर्थातच सामूहिक मनात घडणारी ही प्रक्रिया असते असे म्हणता येईल. मिथक निर्मिती संबंधी १८९५ मध्ये Science of Mythology हा ग्रंथ लिहिणाऱ्या मॅक्स म्युलरच्या सिद्धान्ताकडे लक्ष वेधले तर मात्र एक धक्का बसल्याशिवाय राहत नाही. त्याच्या मते दैवतकथा या अशुद्ध व विकृत व्युत्पत्तीतून जन्मलेल्या असून त्यांना भाषेला आलेली सूज किंवा 'भाषेला जडलेला रोग' (diseases of the language) म्हणायला हरकत नाही. या भाषारोगाची मीमांसा म्हणजेच दैवतकथा शास्त्र (Mythology is the pathalogy of language)[१४] (The Antropological Religion Modern Mythology reply to professor या दोन ग्रंथांतून अँड्यू लँगने त्याच्या सिद्धांताला चोख उत्तर दिले.) त्यांचा हा सिद्धान्त म्हणजे मिथक निर्मिती प्रक्रियेकडे विक्षिप्तपणे पाहणे होय असेच म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर प्राचीन व थोर संस्कृतीचा वारसा जो अप्रतिहत वाहतो आहे आणि विशेषतः भारतीयांना लाभलेला आहे त्याला एक प्रकारे विकृती समजण्यासारखे आहे. मॅक्स म्युलरचे विचारवंत म्हणून मोठेपण मान्य करूनही त्याच्या ह्या सिद्धान्तविषयी सावधगिरीच बाळगली पाहिजे. याचकरिता अगोदर मिथक प्रवृत्तीचा आपण विस्ताराने विचार केला. डब्लू. के. सी. गर्थी (W.K.C. Gurthie) यांनी ग्रीकांच्या देवतांवरील आपल्या पुस्तकात मिथक प्रवृत्तीचा व अन्य प्रेरणांचा विचार करून आधुनिक काळास अनुसरून श्रद्धेतून (धर्मभावनांतून) मिथकचा जन्म कसा झाला असावा या विषयी चर्चा केलेली दिसते.[१५] ''गाथाओंका उद्‌भव विज्ञानशून्य आदि-काल मे उत्पन्न हुए मानवके उन् प्रयासों में निहित है जो उसने अपने संमुख प्रवर्तमान प्राकृतिक शक्तियों एव दृश्योंकी व्याख्या के रूप में किये थे।''[१६] असे मत डॉ. सूर्यकांत यांनी नोंदविले आहे.

विश्वनाथ खैरे यांनी मिथक निर्मिती प्रक्रिया 'गोष्टींच्या गोधडीची गोष्ट' पृ. १६ ते २५ या कथेच्या आधाराने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी या प्रक्रियेची केलेली मांडणी ''मिथककथेची आपल्याला उमजलेली तंत्रे वापरून 'भीमाचे कवच' ही गोष्ट लिहिली ती जितकी संचित मिथककथेसारखी वाटेल तितका आपला मागोवा योग्य मार्गाने चालला असल्याचे पटेल. 'रामायणा'त




हनुमानाच्या मिथ्याचे मूळ धूमकेतूमधून निघते. कावळा, झाडे, तारे, धूमकेतू, गाणे ही मिथकांची मूळ कारणे म्हणजे 'इंद्रियांना प्रतीत होणारी' विश्वातील 'गोचरे', त्या गोचरांचे काही ना काही विशेष आहेत त्यामुळे त्यांची मिथ्यवर्णने कवींना करावी वाटली.''[१७]

''गोचराच्या जाणिवेतून मिथ्य, त्याच्या शब्दरूप कथनवर्णनातून मिथ्यकथा या शब्दरूपाचा अर्थ काढून त्यावरून आणखी काही अर्थ काढला तर नवे मिथ्यच 'श्लोकातून' श्लोकाचा जन्म हे असे मिथ्य त्यातल्या मिथ्याचा मागोवा रामायणातून घेतला. त्यात क्रौंच म्हणजे सारस हेही उघड झाले. या सारसांचा आणि कुश-लवांचा मिथुन राशीशी संबंध दिसला. हे सारे 'क्रौंच मिथुन' या लेखात आले आहे.''

''विश्वातले काही गोचर त्याच्या विशेषत्वाने माणसाच्या मनाला जाणवले तर जे 'वाटणे' उद्‌भवते त्याच्या प्रभावाखाली त्या गोचराचे शब्दरूप त्याच्या उपमानाने केले तर मिथ्य जन्माला येते. मिथ्याचे विशेष कथारूपात आले की मिथ्यकथा याच प्रक्रियेतून प्रतिमा, आद्य साहित्य मिथ्यकथांचे असल्यामुळे या मागोव्याने साहित्य निर्मितीच्या एका उगमाकडे आपण जातो.'' अशाप्रकारे मिथक निर्मिती प्रक्रिया त्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. विश्वनाथ खैऱ्यांनी मिथक प्रक्रियेमागील मानसिकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु त्यांनी 'मिथ' चे मराठी रूप 'मिथ्य' असे वापरले. यामुळे 'मिथ्य' या शब्दामागील संस्कृत व मराठीतील अर्थवलय निर्माण होण्याची शक्यता तसेच 'मौज' दिवाळी १९८४ च्या संपादकीयांनी 'भारतीय संस्कृतिकथा' या वरील अभिप्रायात रामकथा, कृष्णकथा, अवतारकथा, ऋषीकथा इ. मिथकांमधून इतिहास सिद्ध होऊ शकत नाही असे प्रतिपादन श्री. खैरे यांनी केले असे म्हटले आहे. ह्या दोन्ही गोष्टींचा विचार करताना सावधपणे विचार करावयास हवा असे वाटते.


मिथक प्रवृत्तीचा विचार आपण वर केला आहे. मिथक निर्मितीप्रक्रियेविषयी आपण निरनिराळी मते पाहण्याचा प्रयत्न करता पुन्हा पुन्हा आपण मिथक प्रवृत्तीकडेच येऊ असे वाटते. मिथक निर्मितीची प्रक्रिया अधिक स्पष्टपणे व अधिक काटेकोरपणे मांडता येईल. त्यासाठी आणखी एका गोष्टीचे भान मात्र ठेवले पाहिजे ते म्हणजे 'लोक' चे परंपराप्रिय मन वर उल्लेखिलेल्या प्रवृत्तीबरोबरच हे परंपराप्रिय मन कार्यान्वित होते आणि मिथक सत्य स्वरूपात अनंतकाल मानवी जीवन व्यापून टाकते. यातूनच 'लोक' ची धार्मिकता, पाप, पुण्य, अद्‌भूत श्रद्धा (अंधश्रद्धा देखील) निर्माण होतात. नव्या संदर्भात नव्या मिथक निर्माण होतात.

त्यांच्या परंपरा निर्माण होतात परंतु आदिमबिंदूशी असलेल्या 'लोक' मनाचा धागा सुटतच नाही. त्यामुळे मानवी जीवनाला धार्मिकतेची, पावित्र्याची एक अनिर्बंध बंदिश लाभते हे काहीसे अतर्क्य वाटते त्यातच आधुनिक वैज्ञानिक दृष्टीने पाहणाऱ्यांना तर हा शुद्ध भंपकपणा वाटण्याचीही शक्यता आहे.




परंतु येथेच आणखी एक गोष्ट नमूद करणे सोयीचे होऊ शकेल. मानवी जीवनाचा अंतस्रोत आत्म्याचा अनंत प्रवास, त्याचे अविनाशित्व आणि आदिम बिंदूपासून अनंतापर्यंत जन्मानुजन्माचे, अगणित योनी रूपांतराची दिव्य जाणीव व मानवी मनाची याविषयी सत्य निष्ठा ह्या सर्व विचारात घेतल्या की मिथकांची आदिम परंपरा आणि नवता आणि मिथकनिर्मिती प्रक्रिया जाणवू शकेल.





मिथक प्रवृत्ती आणि मिथक निर्मिती प्रक्रिया यांचे स्पष्टीकरण 'पुरुषोत्तम' या मिथकाच्या आधारे उत्तम प्रकारे होऊ शकेल. पुरुषोत्तम मिथक म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील पुरुषोत्तम योग वाद किंवा उर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं वाद होय. हा पुरुषोत्तम योग असा ''श्रीभगवान म्हणाले, हा सर्व दृश्य पसारा हा एक पिंपळाचा वृक्ष आहे. याचे मूळ (ब्रह्म) वर आहे. आणि शाखा खाली आहेत. वेद ही याची पाने आहेत. हा वृक्ष अविनाशी आहे हे ज्याला समजले तोच वेदवेत्ता म्हणावयाचा. सत्त्व, रज, तम या गुणांनी ह्या शाखा वृद्धि पावून खाली-वर पसरलेल्या आहेत. शब्दादि विषय हे या शाखांचे पल्लव होत. कर्मफलापासून उत्पन्न होणाऱ्या वासना हीच या वृक्षाची (उप) मुळे खाली मनुष्य लोकांमध्ये पसरली आहेत. या संसारवृक्षाचे स्वरूप आता वर्णन केल्याप्रमाणे मनुष्यलोकात दिसणे अशक्य आहे. कारण, त्याला आदि, मध्य व अंत काहीच नाही. याची मुळे फारच खोल रुजलेली आहेत. असंगरूप (पुत्रेषणा, वित्तेषणा व लोकेषणा यांपासून निवृत्ती) शस्त्राने या वृक्षाचा छेद करून मग ज्यापासून ही प्राचीन संसारप्रवृत्ति विस्तार पावली, त्या आदिपुरुषाला शरण जावे. येथे गेल्यानंतर पुनः माघारी फिरावे लागत नाही. म्हणून याच स्थानाचा शोध करावा. ज्यांनी मान व मोह सोडलेला आहे, आसक्ति व दोष यांस जिंकिले आहे, जे सतत परमेश्वरज्ञानात निमग्न, ज्यांच्या सर्व इच्छा तृप्त झालेल्या, जे सुःख-दुख, शीत-उष्ण इत्यादी पासून मुक्त तेच सुज्ञ जन या अव्यय स्थानाला प्राप्त होतात. ज्ञाते जन माझे स्थान होय. सूर्य, चंद्र किंवा अग्नी यांस ते प्रकाशित करिता येत नाही (ते स्वयंप्रकाशितच असते) मनुष्यलोकात माझाच सनातन अंश जीवरूपाने राहून, प्रकृती वास करणाऱ्या श्रवणादि पंच सूक्ष्मेंद्रियास व मनास आपणाकडे आकर्षित करून घेत असतो. जीवरूप ईश्वर शरीराशी संयोग पावतो आणि तेथून निघून जातो, तेव्हा पाच इंद्रिये व मन यांसही बरोबर नेतो. वारा ज्याप्रमाणे पुष्पादिकांपासून गंध नेतो त्याप्रमाणे हे घडते. श्रवण, नेत्र, जिव्हा, त्वचा आणि नासिका ही पंचेंद्रिये आणि मन यांचा आश्रय करून हा जीव विषयांचा उपभोग घेता असतो. गुणांनी युक्त असा हा जीव देहाचा त्याग करितांना, शरीरात वास करीत असताना, विषयांचा उपभोग घेत असतांना मूर्ख लोकांना दिसत नसतो. पण ज्ञानचक्षूने पाहणारे लोक त्यास ओळखतात. प्रयत्न करणारे योगीजन स्वतःचे ठिकाणी वास करणाऱ्या ह्या आत्म्याला जाणीतात. परंतु अशुद्ध अंतःकरणाने मूढ जन प्रयत्न करूनही ह्यास जाणत नाहीत. अखिल विश्वाला प्रकाशित करणारे जे तेज सूर्याच्या ठिकाणी आहे, जे चंद्रामध्येही वास करते व जे अग्नीमध्येही दिसून येते, ते माझेच आहे असे जाण. पृथ्वीच्या ठिकाणी



प्रवेश करून स्वतःच्या सामर्थ्याने मी प्राणिमात्रांचे रक्षण करतो. आणि रसरूप चंद्र बनून सर्व वनस्पतींचे पोषण करीत असतो. वैश्वानर म्हणजे जठराग्नि होऊन मी प्राण्यांच्या देहाचा आश्रय घेतला आहे आणि उद्दीपक वायु जे प्राण अपान यांनी युक्त होऊन (भक्ष्य, पेय, चोष्य व लेह्य) चारही प्रकारचे अन्न पचवितो. प्रत्येकाच्या हृदयात माझे अधिष्ठान असते. स्मृति, ज्ञान, विस्मरण ही मजपासून उद्‌भवतात. सर्व वेदांनी जाणण्यासारखे आहे ते मीच आणि वेदान्त करणारा व वेद जाणणाराही मीच आहे. क्षर आणि अक्षर असे दोन पुरुष या जगामध्ये आहेत. अखिल नाशवंत भूतांना क्षर अशी संज्ञा आहे आणि मायादिकांनी व्याप्त असलेला पुरुष म्हणजे अक्षर होय. उत्तम पुरुष मात्र या दोहोंहूनही वेगळाच आहे. त्यालाच परमात्मा असे म्हणतात. हा अव्यव पुरुष तीनही लोकांत प्रवेश करून त्यांचे धारण करतो. मी क्षरांचेही अतिक्रमण केले आहे आणि अक्षरांपेक्षाही उत्तम आहे. म्हणून मी लोकांत व वेदांतही पुरुषोत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. हे भारता! मोह दूर करून जो पुरुष या प्रमाणे मज पुरुषोत्तमाला जाणतो तोच सर्व जाणणारा होय. तोच योग्य रीतीने मला भजतो. हे निष्पापा! हे भारता! या प्रमाणे हे अत्यंत गूढ शास्त्र मी तुला सांगितलेले आहे हे समजावून घेऊन मनुष्य प्रबुद्ध व कृतकृत्य होईल.''[१८]

दिलेल्या आराखड्यावरून मिथक निर्मितीप्रक्रिया थोडक्यात स्पष्ट करता येईल. पृथ्वीवरील मानव 'स्व' व 'लोक' या दोन्ही स्तरावर व मुळात 'लोक' स्तरावर संपूर्ण विश्वाचा अनुभव घेत असतो. कळप करून राहण्याच्या प्रवृत्तीमुळे आहार, निद्रा, भय आणि मैथून या चारही विकारांचे सामूहिक भान मानवाला असते. त्याचा जीवनार्थ कलह हा 'स्व' आणि 'लोक' या दोन्ही पातळ्यावर सुरूच असतो. 'लोक' मध्ये सर्वांचे समाधान अपेक्षित असते त्यामुळे सामूहिक जाणिवेला महत्त्व प्राप्त झालेले असते. जीवनासाठीच्या घडपडीत मानवाजवळ असलेल्या प्रवृत्ती सामूहिक पातळीवर अनुभवास येतात. त्या प्रवृत्तीनुसार त्यांचे पंचज्ञानेंद्रिये व मन यांच्या सहाय्याने जगणे सुरू असते. मानवी शक्तींमुळे त्याच्या समूह व व्यक्तिजीवनाला एक अर्थ प्राप्त होत जातो. विकार आणि शक्ती यातून त्याच्या प्रवृत्ती व जाणिवा निर्माण होतात. विश्वानुभूती घेण्यासाठी त्याच्या समाधानाश्रयी प्रवृत्ती, अस्तित्त्वसंगती प्रवृत्ती, शरण प्रवृत्ती, सापेक्ष प्रवृत्ती, स्थिरसमाज जीवन प्रवृत्ती, निरपेक्ष आनंद प्रवृत्ती व आत्मप्रकटीकरण प्रवृत्ती निर्माण होतात त्याचबरोबर निसर्गशक्तींची जाणीव, चैतन्यस्फुरण, सौंदर्य व स्थितीगतीची लय यांची जाणीव, सृजन प्रक्रियेची जाणीव, जन्मानुजन्मातील अनंतयोनी रूपांतरे किंवा पुनर्जन्म या मधून आत्म्याचा प्रवास, सामूहिक एकात्म मन यांची जाणीव,

व विश्वाचे मूलकारण परतत्त्वाची जाणीव अशा काही जाणिवा मानवी व्यक्ती व समूह मनाला होत जातात. या प्रवृत्ती व जाणिवाच्या संगती किंवा संयोगातूनच व्यक्ती व सामूहिक मनात मिथक प्रवृत्ती, धर्मप्रवृत्ती, सांस्कृतिक जीवन प्रवृत्ती, ज्ञानप्राप्ती प्रवृत्ती व मूलकारणबंध प्रवृत्ती जागृत होतात. ही सर्व प्रक्रिया इतकी व्यामिश्र असते की त्याचे भौतिक पातळीवर पृथःकरण करणे हे अतिशय कठीण प्रायः अशक्यच ठरते. या प्रवृत्तीतून मानवी सामूहिक जीवनाला लोकबंधात्मक अवस्था म्हणता येईल. या अवस्थेला परंपरा, नवता, वर्तमान व भविष्य यांची जाणीव होऊन यातून सनातन परंतु नित्यवर्तमान असा लवचिक प्रवाहीपणा प्राप्त झालेला असतो. याच प्रवृत्तीतून संस्कृतीला चिरंतनाचे संदर्भ पुरविणारे, शाश्वत सत्याचा अर्थ भरणारे धारणास्रोत निर्माण होतात या धारणास्रोताचे आविष्कार म्हणजे मिथक, पुराणे, धर्मकल्पना होत. मानवी जीवन या लोकबंधातून होत राहते. हे धारणास्रोत, पूर्ण सत्य असल्याचा दृढ लोकविश्वास असतो. हे धारणास्रोत त्रिविध गुणात्मक असतात. सात्त्विक, राजस, तामस ह्या धारणास्रोतांच्या आधारे पूजा, विधी, साधने, योग, सिद्धी, जीवनश्रद्धा, धर्मशास्त्रे, वर्तमान संदर्भासह आणि मूलकारणाची सतत जाणीव ठेवत लोकजीवन, सिद्ध होत असते. प्रगत होत असते. त्यातून नित्य लोकव्यवहार व लोककला प्रकट होत असतात. जीवनविकासाबरोबरच शास्त्रे; व कला यांचा विकास होत जातो. हा विकास होत असतानाही संपूर्ण विश्वानुभूतीच्या मूलकारणाचा, अंतिम सत्याचा वेध श्रद्धापूर्वक घेतला जातच असतो. एक प्रकारे अनंतविश्वातून हा मानवी मनाचा प्रवास सुरूच असतो व या प्रवासात मिथक निर्मिती प्रक्रिया उर्ध्वमूल अधःशाखा न्यायाने जीवनरस निर्मिती करून मानवी जीवनाला अतिमानवी विश्वाशी व्यापकतेने आणि सखोल अर्थभावघनतेने जोडीत केवळ सत्यसौंदर्याची ग्वाही देत असते. म्हणूनच आपले जीवन मिथकांनी भारून गेल्याची अनुभूती आपणास येत असते. मिथक निर्मितीची ही प्रक्रिया अनंत विश्वातील स्थिती गतीच्या पार्श्वभूमीवर 'उर्ध्वमूल अधः शाखम् अश्वथं' या न्यायाने लक्षात घेणे आवश्यक आहे असे म्हणता येईल. ही प्रक्रिया तपासल्यानंतर मिथकाचे स्वरूप व प्रेरणा समजावून घेणे आवश्यक आहे.

**मिथकामागील प्रेरणा व मिथक स्वरूप :–**

मिथकांनी मानवी जीवन व्यवहार, शास्त्रे, तत्त्वज्ञान व कला यांना व्यापून टाकले आहे. त्यांचा प्रवास निरनिराळ्या रूपात आदिम बिंदूपासून निरंतर सुरूच आहे. नवी नवी मिथके तयार होत असतात त्या मागील प्रक्रिया वर



उल्लेखिलेलीच असते व प्रेरणाही त्याच असतात असे लक्षात येईल. म्हणूनच येथे मिथक सादरीकरणामागील, निर्मितीमागील तसेच उल्लेखामागील प्रेरणा सूत्ररूपाने मांडण्याचा प्रयत्न करता येईल.

**(अ) प्रेरणा :** (१) अमानवी किंवा दैवी वाटणाऱ्या कृतींचे दर्शन स्पष्ट करणे. (२) निसर्गशक्तींची पूजा व स्पष्टीकरण. (३) ऐतिहासिक घटनांची अद्भूत व चमत्कार वाटणाऱ्या घटनांची संगती. (४) भौतिक सृष्टीचे स्पष्टीकरण मानवी व पाशवी कोटीच्या अनुषंगाने करण्याची माणसाची प्रेरणा. (५) मानवी संस्कृतीच्या प्रवाहाच्या संगतीची प्रेरणा. (६) जगत मानवातील एकात्मता सिद्ध करण्याची भावना. (७) वासनापूर्तीचे उन्नयन. (८) विभूतीपूजन. (९) विधिसंपन्नता करून धर्मश्रद्धा प्रकट करणे. (१०) दैनंदिन व्यवहाराला नैतिक अधिष्ठान देण्याची प्रेरणा. (११) अद्भूताची संगती लावणे. (१२) पुण्यसंपादन स्वर्गलोक किंवा मोक्षप्राप्ती किंवा सद्गती मिळविण्याची प्रेरणा. (१३) धर्मभावनेची जागृती व प्रसार. (१४) थोडक्यात आशयगर्भ वर्णने करणे. (१५) दिव्यशक्तींना प्रसन्न करून वासनापूर्ती करणे. (१६) अनैतिकतेचे उन्नयन करण्याची प्रेरणा. (१७) अतिप्राचीन ऐतिहासिक अस्तित्त्वाचे जतन. (१८) सृष्टीगती व भविष्य यांची संगती सांगण्यासाठी. (१९) शास्त्रांचे प्राचीनत्व सिद्ध करण्यासाठी व त्यांना श्रद्धेचे व प्रतिष्ठेचे स्थान देऊन धार्मिक घटकांच्या कसोटीवर उतरविण्याची प्रेरणा. (२०) आदिमतेशी संबंध जोडून सनातनला प्रकट करणे. (२१) दैनंदिन व्यवहाराला पावित्र्यांचे, व्रतस्थतेचे, नैतिकतेचे अधिष्ठान मिळवून देणे. (२२) विश्व उत्पत्ती, स्थिती व लय यांचे स्पष्टीकरण करणे. (२३) वंशवृक्ष व मृतगती स्पष्टीकरण. (२४) जननप्रक्रियेची संगती. (२५) मानवी मन, भावना, विचार, कल्पना, स्वप्न. (२६) विश्वातील आकस्मिक आंतरमय वा अपघाती घटना–धूमकेतू, उल्कापात, इंद्रधनुष्य, ग्रहणे. (२७) दोषमार्जन, यशप्राप्ती, उणिवांची पूर्तता. (२८) वर्तमानात खिन्न होऊन आदिम बिंदूपर्यंत पोहोचण्याची धडपड इ. प्रेरणा सूत्ररूपाने सांगता येतील. खरे तर ह्या प्रेरणांची संगती आणखी संक्षिप्त व सूत्ररूप करावयाची असेल तर–

(१) वैश्विक मानवी जीवन संगती (२) देवधर्मसंस्कृती (३) कौटुंबिक, प्रापंचिक व सामाजिक अशा तीन भागात करता येऊ शकेल. या प्रेरणांमुळे प्रवृत्ती कार्यान्वित होतात व प्रवृत्तीतूनच प्रेरणांची निर्मिती होते अशी ही परस्परावलंबी प्रक्रिया आहे.

**(ब) मिथक स्वरूप :** दैवतकथांचे स्वरूप स्पष्ट करताना दुर्गाबाई लिहितात, ''दैवतकथा पुराण व पूज्य कथा असल्याने त्यांचा संबंध धर्माशी जो संबंध शिथिल

व अनियमित असला तरी जगभर जुळलेला आढळतो, मग त्या कथा ग्रंथनिविष्ट असोत की तोंडी. पुष्कळ ठिकाणी मूळ धर्म गेला पण कथा टिकून राहिल्या. युरोपातले पुरातन ग्रीक, केल्टिक, ट्यूटॉनिक धर्मसंप्रदाय याचे उत्तम उदाहरण आहेत. दैवतकथा या साऱ्या प्रभूतदैवतावादी (Polytheistic) धर्मसंप्रदायातूनच जन्मलेल्या आहेत. अशा तऱ्हेने धर्म गेले, संस्कृती गेली, तरी काही कथा अवशेषरूपाने टिकून राहिल्या व बऱ्याच नष्ट झाल्या किंवा अन्य स्वरूपात दृगोचर झाल्या. कारण गत संस्कृतीच्या निदर्शक कथा, मूळ संस्कृती व धर्म यांचा लोप झाल्यास नवोदित संस्कृती व धर्म यात, त्याचप्रमाणे जनतेच्या नित्यनैमित्तिक कर्मबद्ध श्रद्धेत त्यांना वाव न मिळाल्यास कालांतराने दंतकथा किंवा परिकथा म्हणून शिल्लक राहतात. परिकथा या मूळच्या दैवतकथा असल्याचे अनेक लोकसाहित्यकारांनी मान्य केले आहे. मौखिक चालू असलेल्या दैवतकथा परक्या समाजात गेल्यास असे हटकून घडते.''[१९]

मिथकांतून युगायुगांतील लोकजीवन आणि लोकमानस प्रतिबिंबित होत असते. त्यातून इतिहासाचे पुराणीकरण घडते व त्यामुळे इतिहासाला वळण मिळते. या कथांमधून तर्कपूर्व अवस्थेतील समाजाचे चिंतन घडते. गूढतेकडील मानवी मनाची ओढ स्पष्ट होते. त्या विघ्नदेवतांच्या आधाराने दुःखाचे सौम्यीकरण सात्त्विकीकरण करतात, असे विचार रा. चिं. ढेरे यांनी व्यक्त केले आहेत.[२०] ''दैवतकथा पवित्र इतिहास होने के नाते सत्य है । यह उन तथ्योंका इतिहास है जो सर्ग ले आदि-बिन्दु पर घटित हुए थे और इसीलिये सर्ग-प्रवृत्ति के उपरान्त आनेवाले मानव समाज के लिये उसके कर्तव्य की कसौटी संपन्न हुए है। सर्ग के आदि में अद्‌भूत हुए दैवी - दैवतांओंके रचित का अनुगमन करके मानव अपने आपको वर्तमान की झकतक से छुडा लेता है और आस्किलीन देवता के यातु रग्जित चरित के माध्यम द्वारा महाकालमें प्रवेश पा जाता है ।'' अशा शब्दात डॉ. सूर्यकांत यांनी दैवतकथांचे मोठेपण व मानवी जीवन व दैवतकथांचा संबंध स्पष्ट केला आहे.

''दैवतकथेत दोन परस्परविरोधी प्रवाह एकमेकांत मिसळलेले आढळतात. पहिला प्रवाह सुसंगत विचारांनी आणि संभाव्यतेच्या जाणिवेचा असतो. तर दुसऱ्या प्रवाहात अतर्क्य, असंभाव्य अशाच घटना प्रामुख्याने असतात. दैवतकथेत पशू आणि मानव त्याचप्रमाणे नक्षत्र आणि निसर्गातील घटना या सर्वांना एका पातळीवर आणून आणि त्यांचा संबंध जोडून अद्‌भूतता निर्माण केलेली असते. त्यामुळे दैवतकथा किंवा मिथ्य कल्पित, फोल व अवास्तव असतात अशी समजूत



दृढ झाली आहे.

दैवतकथा धर्मसंबद्ध असतात. त्यांच्या भोवती पावित्र्याचे अवगुंठन असते. दैवतकथांच्या या लक्षणामुळे त्यांना धर्मकथा आणि पावित्र्याख्यान अशा संज्ञा योजिल्या जातात. परंतु दैवतकथा या धर्मसंबद्ध असल्या तरी त्यात धर्मकथेपेक्षा व्यापक असा अर्थ सामावलेला आहे. तसेच आख्यान हा शब्दपरंपरेने दीर्घकथा, कीर्तनोपयोगी कथा यासाठी वापरण्यात येतो म्हणून हे दोन्हीही शब्द समर्पक वाटत नाहीत. दैवतकथा पवित्र मानल्या जातात. धर्माचा आणि या कथांचा संबंध घनिष्ट असतो. या कथांच्या आधाराने धर्मकल्पना विकसित झाली आहे असेही दिसते. परंतु काही देशांत धर्मभावना गळून पडल्यावरही दैवतकथा टिकून राहिल्याचे आढळते. धर्मसंप्रदायाच्या प्रेरणेने निर्माण झालेल्या या कथा त्या कथनामागील धर्मभावना आटली तरी अवशेषरूपाने किंवा स्वरूप पालटून समाजजीवन परंपरेने चालत आल्या असे दिसते.

''दैवतकथांचे स्वरूप विषद करताना असे सांगता येईल की, कथेत सृष्टीची उत्पत्ती, रचना, विनाश याचबरोबर दैवी घटना आणि देवता यांची वर्णने असतात. दैवतकथेतील वर्णनांना समाज कल्पित किंवा रूपकात्मक असे सत्य मानतो. यातील घटना प्राचीन काळात केव्हातरी घडल्या आहेत असे शिक्षित माणसेही मानतात.'' अशा प्रकारे डॉ. मांडे यांनी दैवतकथेचे स्वरूप विशद केले आहे.[२२] ''ऐतिहासिकदृष्ट्या दिव्यकथा ही धार्मिक विधिकांडाला अनुसरते. त्याच्याशी सहसंबंध राखते. दिव्यकथा म्हणजे विधिकांडामधला पठणाचा भाग. विधिकांडातून उभी राहणारी कथा. विधिकांड हे पुरोहितवर्गाकडून अनिष्ट निवारणासाठी व इष्ट कामपूर्तीस्तव समाजाकडून प्रत्यक्ष आचरले जाते.''[२३]

या संबंधात विश्वनाथ खैरे लिहितात, ''आपले जीवन आचार, विचार, उद्योग, रंजन, सण-उत्सव, आनंद-शोकांचे विधी या साऱ्यांबद्दल प्रत्येक समाजात संचित आणि प्रचलित कथा असतात. कथा म्हणजे कथेचे शब्दरूप. त्यात कथन असते तसेच वर्णनही असते. या कथांचा (म्हणजे त्यांच्या शब्दरूपांचा) आशय समाजात श्रद्धेने ठरवला जातो. त्यांची मूळ रूपे किंवा खरे आशय नेमके काय असतात किंवा होते हे कळत नसते. अशा कथांना मिथ्यकथा म्हणायचे. मिथ्यकथांचे प्राणतत्त्व मिथ्य असते. मिथ्य हे सत्य नसते तसे असत्यही नसते.''[२४]

'देवत्व' विषयक कथा म्हणजे दैवतकथा. अशी दैवतकथेची (Myth) व्याख्या करता येईल. या Myth (दैवतकथा) चे स्वरूप सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येऊ शकेल. (१) मिथकांना 'लोक' मध्ये श्रद्धा, विश्वास, आणि

सत्यत्वाचे स्थान असते. (२) मिथके सृष्टी उत्पत्ती आणि लय या विषयी स्पष्टीकरण कथात्मक स्वरूपात देतात. (३) दैवत, दैत्य, यक्ष, तारे, नद्या यांच्या निर्मितीविषयक कथा सांगून त्यांच्या गुणदर्शनाचे कार्य करतात. (४) देवता व तत्सम शक्तींचे वर्णन, त्यांनी स्वीकारलेल्या, वापरलेल्या आयुधांचे वर्णन यात असते. (५) प्राणी, वृक्ष, फुले, फळे, पर्वत, दरी इत्यादींना दैवत्व कसे लाभले व त्यांना भजल्याने कोणती फलनिष्पत्ती होते हे सांगितली जाते. (६) दैवतकथांमध्ये देवतांच्या क्रोध आणि प्रसन्नता या संबंधातील कथा सांगून व्रत, परंपरा इ. बाबतीत उपकथानके आलेली असतात. (७) दैवतकथांमधून देवतांनी परंपरा व त्यांच्यापासून मानवी वंशपरंपराही सिद्ध केलेल्या दिसून येतात. (८) शाप, उःशाप, वरदान, अटी, तप, शक्तिपरीक्षा शक्तिपात यांच्या संदर्भात कथा सांगून त्यातून युद्धे, आक्रमणे, शक्तिसंपादन इ. गोष्टींचे स्पष्टीकरण करून इतिहास कथन करण्याचे प्रयत्न असतो. (९) हिंस्र पशू, पक्षी, सरपटणारे प्राणी यांचे कथांच्या माध्यमातून दैवतसिद्धीकरण, दैवतांशी असलेले संबंध, मानव, प्राणी उत्पत्ती विषयीची संकर स्पष्टीकरणे आलेली असतात. (१०) पुनर्जन्म, सामाजिक संकेतबाह्य स्त्री-पुरुष संबंध, अपत्य जन्म, या विषयी स्पष्टीकरणात्मक कथा सांगून नैतिक ऐतिहासिक संगती साधण्याचा प्रयत्न व सत्य प्रस्थापनाचा प्रयत्न असतो. (११) घराणी, राज्ये, क्षेत्रे, जमिनी यांच्याशी 'लोक' व्यक्ती आणि दैवते यांचा पवित्र संबंध प्रस्थापित करून परंपरा कथनाचा प्रयत्न असतो. (१२) क्षेत्रीय दैवते, स्थानिक दैवते, स्थल दैवते, मानवी दैवते यांचा व्यापक सनातन दैवतांशी असलेला अवतार संबंध या कथांमधून व्यक्त होतो. (१३) रूढी, परंपरा, नैतिकता यांच्या निर्मिती व प्रवाह यांचे स्पष्टीकरण सनातनापासून वर्तमानापर्यंत आणून पोहोचविण्याचा प्रयत्न असतो. (१४) विभूतींचे दैवतीकरण सिद्ध करणाऱ्या घटना व चमत्कारांचे वर्णन यात असते. (१५) धर्म उत्पत्ती, धर्मसूत्रे, धर्मविधी आदी सिद्ध करणाऱ्या कथा यात असतात. (१६) पूजाविधी, पूजासाहित्य, पूजाक्रिया यातील प्रत्येक गोष्टीची परंपरा, महत्त्व व दैवत संबंध स्पष्ट केलेला असतो. (१७) सांप्रदायिक परंपरांची स्पष्टीकरणे देण्याचा प्रयत्न केलेला असतो. (१८) तीर्थनिष्पत्ती तीर्थटन परंपरा, फलप्राप्ती यांची स्पष्टीकरणे असतात. (१९) गायन, वादन, नर्तन, चित्रण, शिल्प, नाट्य, काव्य, लेखन इ. कलानिष्पत्ती- त्यांची दैवत परंपरा, दैवतप्रसाद स्पष्टीकरणे या कथातून होत असतात. (२०) रोग, व्याधी, विकृती निवारणासाठीचे तोडगे, यातुक्रिया यासंबंधातील दैवत परंपरा व क्रिया विधी यांची स्पष्टीकरणे व त्यांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध सांगितला जातो. (२१) स्वर्ग, नरक,



लोक (सूर्यलोक, चंद्रलोक इ.), काल, युगे या गोष्टीची उत्पत्ती, स्थिती यांची वर्णने, स्पष्टीकरणे व त्यांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध सांगितला जातो. (२२) न्याय तत्त्वज्ञान, धर्म - समाजनिती. (२३) भूगोल, वैद्यक, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इ. शास्त्रांच्या उत्पत्ती विकास, देवतावर्णने यात येतात. (२४) मानवी प्रवृत्ती, भावना, शरीरशक्ती स्थले, भविष्य, योगायोग इ. विषयीची, देवता, देव या विषयीची उत्पत्ती, मार्ग, विधी, स्थाने, परंपरा, संकेत इ. विषयी स्पष्टीकरणे यात येतात. (२५) चमत्कार स्वरूप जनन घटनांची स्पष्टीकरणे, फळे, सर्प, देवता यांचा जननाशी संबंध यांची स्पष्टीकरणे या कथांतून केलेली असतात. (२६) देवतांचे परस्परसंबंध. (२७) त्यांचे विश्वचालकत्व, सर्व शक्तिमानत्व यातून सिद्ध केलेले असते. (२८) परमात्मतत्त्व, जीव, शरीर, यांचे पृथःगत्त्व व एकत्व यांची स्पष्टीकरणे करणाऱ्या कथा यात येतात. (२९) महाकाव्ये, इतिहास, ललित साहित्य यांचा देवतांशी असलेला संबंध यातून स्पष्ट केलेला असतो. (३०) वन, जल, गड (पर्वत) यांच्या ठिकाणी असणाऱ्या शक्तींचे देवत्वरूप वर्णन करणाऱ्या, त्यांच्या परंपरा सांगणाऱ्या कथा येतात. (३१) देवावतार, महान विभूती यांची भ्रमंती व त्या भ्रमंतीवेळी त्यांनी केलेल्या लीला व त्यातून निर्माण होणारे स्थलमहात्म्य, परंपरा इ. वर्णने या कथांत येतात. (३२) अनेक ठिकाणी देवतांवी घेतलेली निसर्गरूपे (पर्वत, गड, नद्या, वृक्ष, तळी, वनस्पती, आवाज, विशिष्ट पक्षी इ.) व त्यांच्या परंपरांचे, स्पष्टीकरण यात असलेले असते. (३३) व्रते, त्यांची निर्मिती, परंपरा, फलश्रृती यांचे स्पष्टीकरण यांतून केलेले असते. (३४) समंध, मुंजा, चेहेडा, खवीस, चेटकी आदिभूतप्रेत शक्तीवर्णने, त्यांची भ्रमंती, त्यांची वसतिस्थाने, त्यांना प्रसन्न करणारे विधिनिषेध आदींची वर्णने यात येतात. (३५) प्रलय भाकिते, प्रलय संकेत आदी गोष्टी या कथांमधून आलेल्या असतात. (३६) माता, पिता, गुरू, राजा यांना देवत्त्व बहाल करणाऱ्या परंपरा व स्पष्टीकरणे. (३७) समाधी, थडगी (पीर) जागृती वर्णने यात येतात. (३८) अस्त्रनिष्पत्ती, अस्त्र साधन घटना वर्णने यात येतात. (३९) ऐतिहासिक महाविभूतींमधील अवतारित्व किंवा देवत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न यात असतो. (४०) अतिमानवी शक्तींची वर्णने व तत्संबंधीच्या घटना, शक्ती वर्णने यात येतात. (४१) पक्वान्न निष्पत्ती, त्यांचा दैवतसंबंध, विधीसंबंध यांची परंपरा वर्णने यात येतात. (४२) खाणे, पिणे, झोपणे, काम, अभ्यास करणे, मैथून करणे आदीचे संकेत नियम, रूढी, परंपरा व दैवत संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न. (४३) तिथी, वार आणि दैवते यांचा संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न. (४४) सणोत्सव साजरे करणे या मागील घटना, कारणपरंपरा

स्पष्ट करण्याचा प्रयत्न यात असतो. (४५) रंगभूषा, केशभूषा, वेषभूषा, अलंकार या संदर्भातील दैवत निगडित, धर्मनितीकल्पना निगडित परंपरांचे स्पष्टीकरण यांतून करण्याचा प्रयत्न असतो. (४६) निसर्ग, मानवी शरीर व मन, आरोग्य, मानवी वर्तन यामागील शास्त्रीय संकेतांना पापपुण्य, दैवतकोप प्रसन्नता इ. चा संबंध सिद्ध करण्याचा प्रयत्न असतो. (४७) धातू, रत्ने यांचा दैवत संबंध व उत्पत्ती विषयक स्पष्टीकरणे यात आलेली दिसतात. (४८) स्थापत्य संकेत व दैवत संबंध व परंपरा यांचे वर्णन (४९) अतिथी व दैवतरूपे यांच्या परंपरा व स्पष्टीकरणे यात येतात. (५०) अप्सरा, पऱ्या, वनदेवता आदींच्या आख्यायिका यात येतात. (५१) ग्रंथ महात्म्य व तत्संबंधी आख्यायिका, संकेत कथन.

सूक्ष्मपणे विचार करता मानवी जीवनाला धर्मश्रद्धात्मक सत्याचे अधिष्ठान मिळवून देणाऱ्या अतिसूक्ष्म गोष्टी देखील विचारात घ्याव्या लागतील. मानवी जीवन इतिहास, परंपरा, संस्कृती, समाज, शास्त्रे, कला मिथकांच्या अवगुंठनातून प्रवाहित होत असतात. म्हणूनच 'मिथक' हा मानवी जीवन व्यापून टाकणारा प्रमुख लोकबंध होय. मानवी जीवनाचा समग्र अर्थ लावताना त्याच्या सुख, दुःख, सौंदर्यभावनांची चिकित्सा व संगती लावताना 'मिथक' विचार अतिमहत्त्वाचा ठरतो. या मिथकांचा प्रवास मानवाच्या अतिआदिम बिंदूपासून 'लोक' धारणेबरोबर सुरू झाला. भाषेने मिथकांना चैतन्यमय प्रवाहाचे स्वरूप दिले. आणि सबंध 'लोक' जीवन 'लोक'- मानस मिथक या प्रमुख लोकबंधाच्या आश्रयाने वाढू लागले. हा 'लोक' चा सनातनातून चिरंतनाचा प्रवास आहे. या लोकबंधातूनच म्हणजे आदिम मिथकांमधून आदिबंध निष्पन्न झाले असे म्हणता येईल. म्हणजे मानवी जीवनाचा मानवशास्त्रीय परंतु भाषाधिष्ठित विचार करू लागले तर आदिबंधांचा स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता राहील का हे पाहावे लागेल. लोकसाहित्याच्या अभ्यासात 'मिथक' अभ्यासाला विशेष महत्त्व आहे.

**मिथक प्रकार :–**

'मिथक' (दैवतकथा) ची व्याप्ती या सूत्ररूप स्वरूपदर्शनातून स्पष्ट होईल. अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने मिथकांचे प्रकार करण्यास हरकत नाही. वर्गीकरण, तुलना या अभ्यास पद्धतीनुसार लोकसाहित्याचा अभ्यास करण्यास त्याचा उपयोग होऊ शकेल.

श्रीमती दुर्गा भागवत यांनी दैवतकथा या स्वतंत्र प्रकरणात इंद्रकथा, उत्पत्तिकथा, प्रलयकथा, ज्योतिषकथा, आकाश व पृथ्वी सूर्यकथा- चंद्रकथा नक्षत्रकथा–तारे कथा असे प्रकार सोदाहण वर्णिले आहेत.[२५] डब्ल्यू. के. सी.



गुथरिय यांनी 'द डिव्हाइन फॅमिली' मध्ये १२ देवतांची झु (Zeus), हीरा (Hera), पोसेइडन (Poseidon), डीमेटर (Demeter), अपोलो (Apollo), अर्टेमिस (Artemeis), Ares (अरेस), अफ्रोडाइट (Aphrodite), हरमेस (Hermes), अथेन, (Athena), हेफाएस्टस (Hephaestus) आणि हेसटिआ (Hestia) माहिती देऊन पुराणकथांची चर्चा केली आहे.[२६] त्याचबरोबर त्यांनी वासना आणि भीती यांची चर्चा करताना भूतप्रेत कथांचे दैवतीकरण कसे होते याचीही चर्चा केली आहे.[२७] डॉ. उषा पुरी यांनी 'भारतीय मिथक कोष' करताना पुराणकथा, लोककथा, निजंधरी कथा, आख्यानात्मक कथा, प्राचीन साहित्यातील देवता, राक्षस, गंधर्व, यक्ष, किन्नर या सर्वांविषयीच्या कथांचा समावेश होतो असे म्हणून वेद, ब्राह्मणग्रंथ, उपनिषद, आदिमहाकाव्य, बौद्धजैन प्राचीन ग्रंथ यातील दैवतांची माहिती दिली आहेच तसेच त्यांचे वंशवृक्ष मांडून दाखविले आहे.[२८] परिकथा हा प्रकार दैवकथांमध्येच समाविष्ट होईल कारण त्या मूळच्या दैवतकथाच होत. डॉ. मांडे यांनी लोककथांचे वर्गीकरण या चर्चेत प्राचीन आचार्यांनी केलेले व आधुनिकांनी केलेले वर्गीकरण यांचा परामर्श घेतला आहे.[३०] दैवतकथांचे स्वरूप लक्षात घेता 'दैवतकथा' व्याप्तीच्या संदर्भात विद्वानांत एकमत दिसत नाही असे दिसते. मिथक प्रवृत्तीचा विचार करता मिथकांची व्याप्ती बरीच वाढते. वर उल्लेखिल्या प्रमाणे त्या जीवनव्याप्त ठरतात त्या दृष्टीने मिथकांचे प्रकार पुढीलप्रमाणे आशयानुसार करता येतील. (१) उत्पत्तिकथा व प्रलयकथा, (२) दैवत माहात्म्य कथा - पंचमहाभूत दैवते पुराण (इतिहास) दैवते, महाकाव्य दैवते, सृष्टी व मानव समाज भाषा, वंशकथा, विभूती दैवते, प्राणी दैवते, वृक्ष दैवते, (३) पर्वत, नद्या दैवते कथा, (४) भूक्तकथा, (५) परिकथा, (६) ज्योतिषकथा, (७) शास्त्र, कला, (८) विधिकथा धर्म, तत्त्वज्ञान निष्पत्ती कथा, अशा मोजक्या स्वरूपात मिथकांचे प्रकार करावेत असे वाटते. प्रस्तुत लेखकाच्या, प्रबंध अभ्यास प्रसंगी प्रत्यक्ष भ्रमंती, पाहणी व अभ्यास चिंतनातून वरील सात प्रकारात सत्य, अद्भूत, इतिहास आणि श्रद्धा व सामाजिक घटना यांतील एकूण धारणापरंपरा सिद्ध करणाऱ्या मिथकांचा अभ्यास करणे उपयुक्त होईल असे वाटते.

या प्रकारांनुसार सोदाहरण चर्चा करणे अभ्यासाच्या दृष्टीने इष्ट होईल.

**(१) उत्पत्तिकथा व प्रलयकथा :–**

**(अ) उत्पत्तिकथा :** मानवाला 'स्व', 'लोक' व भोवतालची संपूर्ण गोचर सृष्टी कशी व का निर्माण झाली या प्रश्नाच्या समाधानासाठी त्याच्या आदिम अवस्थेतील गोचरांच्या सहाय्याने मानवाच्या तरल कल्पनाशक्तीतून व भाविकतेतून,

सत्याच्या अगदी जवळ पोहचण्याच्या धडपडीतून किंबहूना सत्यस्पर्शामधून या कथा उद्‌भवलेल्या असतात असे म्हणता येईल. मानवाची लैंगिक अनुभूती ही या सत्य अनुभूतीस प्रेरक ठरली असावी असे वाटते. पुराणातील, धर्मग्रंथातील उत्पत्तीकथा किंवा लोकसाहित्यातील मौखिक परंपरेतून आलेल्या कथा या मानवाला अतिजवळच्या व सत्य वाटतात. श्रद्धायुक्त मनाने त्या कथांचे उत्पत्ती-इतिहासकरण केलेले दिसते. अर्थात या उत्पत्तीकथा प्राचीनतम देवतांशी निगडित असतात. या कथांमध्ये सृष्टी-वृक्ष, नद्या, डोंगरदऱ्या, समुद्र, पृथ्वी, सूर्यचंद्रतारे, संपूर्ण सृष्टी, प्राणी, मानव, समाज, जाती, वर्ण, भाषा इ. पासून सूक्ष्मातिसूक्ष्म धुलिकणांपासून प्रत्येक गोष्टीचे उत्पत्ती स्पष्टीकरण देण्यांचा प्रयत्न असतो. लोकसाहित्य, वेदपुराणे, धर्मग्रंथ यांतही या उत्पत्ती कथांमध्ये उघडपणे लैंगिक संबंधांचे, योनी किंवा अयोनी संभोगांचे, संयोगांचे, परिवर्तनाचे नग्न दर्शन असते. परंतु ते अतिशय पवित्र, सत्य स्वरूपात स्वीकारलेले दिसते व त्यांचे दैवतीकरण केलेले दिसते. काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील :

(१) 'अस्य महतो भूतस्य निःश्वसितमेतत्' जग हे परमेश्वराचे निःश्वसित आहे. त्याच्या संकल्पनेत 'हे होवो' असे म्हटल्याबरोबर पंचमहाभूते निर्माण झाली. जीवजंतू झाले. मानव तयार झाला. पुरुष हा सर्व सृष्टीच्या सामर्थ्यांचे तेजाचे प्रतीक असा होतो. त्याचे बीज फैलावावे, सृष्टीत पुरुषाचे प्राबल्य राहावे म्हणून नारी निर्माण झाली. अशा तऱ्हेची वेद पुराणातील कथा दुर्गाबाईंनी दिली आहे.[३१]

(२) 'वैदिक देवशास्त्र' मांडताना ऋग्वेदातील सृष्टी, देव व मानव यांच्या उत्पत्तीच्या कल्पना डॉ. सूर्यकान्त यांनी पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

**सृष्टी मानव देव उत्पत्ती :-**

''ऋग्वेद में आया है कि ब्रह्मणस्पति ने एक लुहार की न्याई इस जगत् को एक साथ धौंका । असत् से सत की उत्पत्ति हुई । उससे क्रमशः पृथिवी, आकाश और अदिति हुए. और अदिति के साथ जन्मे और अदिति के बाद देवता जन्मे। देवताओंने सूर्य को सिरजा। अदिति के आठ पुत्र हुए किंतु आठवें पुत्र मार्तण्ड को उसने दूर फेंक दिया । असल में उसने उसे जन्मने और मरने के लिये रचा। इस सूक्तमें तीन स्तर प्रत्यक्ष है-पहले सृष्टि बनी, फिर देवता बने और अन्त में सूर्य रचना हुई ।

देवो और मानव का उद्‌गम : ''दार्शनिक सुक्तों में देंवों की उत्पत्ति बहुधा जलतत्त्व से बताई है। अथर्ववेद में उनका उद्‌भव असत से बताया गया है। ऋग्वेद



के अनुसार देवोंका उत्थान विश्व की उत्पत्ति के अनन्तर हुआ है। किंतु सामान्यतः उन्हें आकाश-पृथिवी संतति माना गया है । ऋग्वेदमें उनका उद्‌गम संसार के तीन विभागों के अनुसारी तीन तत्त्वों से अर्थात अदिति, जल और पृथिवी से बताया गया है । एक धारणा के अनुसार देवों को एक दुसरे से उत्पन्न हुए बताया गया है। ऋग्वेद में उषा कों देवताओंकी जननी कहा गया है।''

मानव जातिका उद्‌गम सामान्यतः एक आदिम पुरुष से माना गया है । यह आदिम पुरुष या तो विवस्वत्पुत्र मनु है, जिसमे सबसे पहला यज्ञ किया था और जो मनुओं का पिता कहता है; अथवा विवस्वान का पुत्र वैवस्वत यम जिसने अपनी यमल बहिन यमी के साथ मानव जातिको प्रवतित किया था ।

(३) जलस्थल पर्वत उत्पत्ती संबंधी माझ्या 'चाळीसगाव डांगाण : सांस्कृतिक वाङ्‌मयीन भाषिक अभ्यास' या प्रबंधातील एक लोककथा धर्मश्रद्धांचा अन्वयार्थ लावताना मी दिली आहे.[३३]

''पट्टागड हा पर्वत पंख पसरलेल्या पक्ष्याच्या आकाराचा आहे. त्याची मधली एक शीर पुढे आलेल्या चोचीसारखी दिसते. त्या शीरेसमोर 'टाकेद' नावाचे तीर्थ आहे. या पर्वताजवळ अंगठ्याच्या आकाराचा एक प्रचंड सुळका आहे. हे प्रत्यक्ष दाखवून हे लोक सांगतात की, नाशिकच्या पंचवटीतून सीतेला पळवून नेताना रावणाची अन् जटायूची जी लढाई झाली तेच हे ठिकाण. पट्टागड हा जटायू. तो म्हणजेच रावणाचा अंगठा आणि घायाळ जटायूला तीर्थयात्रा घडविण्यासाठी, (रामाने बाण मारून) काशीची गंगा बाण मारून येथे आणली तेच टाकेद. तेथे गंगेकाठी आढळणारी रमनल (राजमल) ही वनस्पती हे लोक पुराव्यासाठी दाखवितात.''

(४) मानवप्राणी उत्पत्ती या संबंधातील माझ्या टंकलिखित प्रबंधात आलेली 'अर्ध्याअंगाची स्त्री' ही कथा पुढीलप्रमाणे आहे.[३४] ''यक व्हता राजा. त्याला व्हता यक मुलगा. तो मुलगा लग्नाच्या वयामधी आला व्हता. त्या मुलाचे आय बाप लगीन करू लागले. त्याच्या बापानं देशोदेशीच्या राज्यांली पत्र पाठवली. तवा त्याचा मुलगा म्हन, ''आय महा वडील कूकं ग्येला?'' त्येची आय म्हण का ''मला जसा तुझ्या बापाना इठ करून आणला तसा तुलायबी लग्नाला बायकू पहायला ग्येला आहे.'' तवा त्येचा बा घरी आला. तो मुलगा म्हन, ''जेव्हढ्या जगामंदी मुली असतीन त्येवढ्या बी मया आया बहिनी लागत्यात.'' तो बापाला म्हन, ''मह्या अंगाचं दोन मधुमध भाग करून काप.'' तवा त्येच्या बापानं तस्कर आनून त्येच्या अंगाचं दोन भाग केलं. आन उजवा डोका आन धड उज्या राजनात

ठुले, आन डावा डोका आन धड डाया राजानात ठुले. ''उजवा धड आन डोका सवा महिन्यानं काहाड आन डावा धड आन डोका यक महिन्यानं कहाड'' अस सांगला. त्या मुलग्याचा उजवा धड आन डोका सवा महिन्याचा न काहाडता महिन्याचं काहाडला. तव तो पुरा मानूस झाला नव्हता. आन त्येच्या नाकातून यक रगताचा टिळा पडला. आन त्येचा का सर्प झाला. मग डावा बाजूला धड आन डोका यक महिन्यांना काहाडला तवा त्या राजनात लय सुरूवार पोर झाली. चंद्राला मंती मानळू नको आन सूर्याला मंती का उगू नको. तो मुलगा आने ती पोर पलंगावं बसली. त्या मुलाच्या नाकातून जो रगताचा टिळा पडला व्हता, हांगी त्येचा सर्प झाला आन त्ये दोघं जन पलगाव बसले व्हते तवा रातीचा कवाडाला धडका घ्याया लागला. तवा ती कवाड उघडाया गेली तवा तो तिच्या सग बोलाया लागला. म्हन, ''ज्यावेळी तुहा नवरा नीमाच अपरा रयला व्हता त्येच्या बाना त्येला काहाडला आन त्येच्या नाकातील रगत पडून त्येतून मी झालो. अशा परकार एका शरीराची तीन शरीरा झाली आन त्येच पुढ नवरा बायकु आन मुलगा झाली.'' शेषनागधारी अर्धनारी नटेश्वराची आदिनाथ म्हणून संभावना केली जाते त्याच्या उत्पत्तीपर्यंत नेऊन ठेवणारी ही कथा आहे असे म्हणता येईल.

(५) लिंगपुराणातील शिवाचे उद्‌गार ताराबाई भवाळकर यांनी अद्‌धृत केले आहे.[३५] ''या विश्वातील सर्व स्त्रीलिंगी प्राणी माझ्या देहातून निर्माण झालेली प्रकृती होय आणि जगातील सर्व पुलिंगी प्राणी म्हणजे माझ्या शरीरातून निर्माण झालेले पुरुष होत. त्या दोन्हींनी मिळून माझी सृष्टी तयार होते.'' 'कैलासराणाशिव' या उल्लेखात त्यांनी शिवपूजा आणि लिंगपूजा योनीपूजा यांची देशविदेशातील संकेत समजुती आख्यायिका देऊन शिवपार्वती ही सृष्टीजीवनाच्या सृजनाचे मूळ कारण असल्याबद्दलची 'लोक' धर्मश्रद्धा सिद्ध केली आहे.

**(६)** **अविनाश आदिशक्ती**
**तिच्यापासून पुढे झाली गणाची उत्पत्ती**
**बिन पुरुषाविण झाली गरोदर**
**तिने रचिले चराचर ।**
**सर्व विश्व तिच्या हाती**
**तिने निर्माण केली पुढे आठ लक्षाची गणती**
**ब्रह्म गोळा तो निर्गुण निराकार**
**पुत्र प्रसवली करून विचार**
**भस्म भस्म केले हाती हाती**



**तिघापासून झाला त्याला काळपुत्र म्हणती**
**ब्रह्म विष्णु आणि शंकर**
**तिघांच्या हाती दिला कारभार।**
**द्रिष्टि भोगोन गार्भिन राहती**
**तीच लांडोरी मोर पहा आहे भूतळावरती**
**ज्ञान दर्शकाची कथा कविश्वर**
**खऱ्या खोट्याचा विचार तू कर''**[३६]

लोकगीतातून संपूर्ण पुराणकथांतील विश्वोत्पत्तीचे मिथक उभे केले आहे.

वानगीदाखल पौराणिक कथा व अलीकडील काळातील लोकसाहित्य संकलन प्रयत्नातून पाहिलेल्या उत्पत्ती विषयक कथा विचारात घेतल्या तर उत्पत्ती मागील बीजतत्त्व समान असते हे लक्षात येईल. येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की उत्पत्तीमागे काही आदिशक्ती किंवा मूळ शक्ती असली पाहिजे यावर मानवाचा दृढ विश्वास बसला आहे. तौलनिक अभ्यास करीत असताना विश्वमानवाच्या एकात्मतेचे बीज सापडू शकेल असे वाटते. वेद, पुराणे, धर्मग्रंथात समाविष्ट झालेल्या कथा ह्या एकेकाळी मौखिक परंपरेत वाहणाऱ्या इतिहासांचे कथारूप स्वरूपात होत्या. म्हणूनच मिथकांचा मागोवा घेतला तर इतिहासाविषयी कल्पना करता येत. उदा. 'डायोनिसस' हा ग्रीक पुराणातील योद्धा व विवस्वत असे मत अ. ज. राजूरकर यांनी व्यक्त केले.[३७] लिखित रूपातील वेद पुराणे यांच्या आधाराने मानवी जीवन व समाज यांच्या उत्पत्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करताना राजूरकरांनी ग्रीक व भारतीय पुराणांमधून तौलनिक विचार करून कृतयुग उत्पत्ती व त्या काळापासूनचा मानवी समाज उत्पत्तीचा ऐतिहासिक वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. लिखित परंपरेतील हे उल्लेख इ. पू. ६७७६ वर्षे इतके जुने आहेत अर्थात त्या अगोदरची मौखिक परंपरा त्या अगोदरच्या अनुभूती यातून मानवी जीवनाची संगती उत्पत्तीच्या अंगाने लावण्याचा प्रयत्न 'लोक' मध्ये कसा केला जात असेल? लोकबंधातील आदिबंधांचे ऐतिहासिक कथारूप निवेदनातून हे स्पष्टीकरण होत असले पाहिजे.

भारतीय परंपरेतील दशावतार कथा ह्या विकासकथा आहेत असे आपण म्हणतो. शिवपार्वती, रामसीता यांची आपण मुले आहोत हा 'लोक' समज, परशुराम अवताराशी लावला जाणारा जाती उत्पत्तीचा पुराणअंश, आदिशक्तीचे – स्त्री देवतांचे पूजन, गंगेचे भूतलावर अवतरण्याची कथा, रामबाणाचा प्रभाव, महाबळेश्वराची कथा, ब्रह्मदेवाची कथा या व अशा पुराणांमधून व मौखिक

परंपरेतून वाहत येणाऱ्या कथा उत्पत्ती विषयक श्रद्धा व इतिहास स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कथा आहेत असे म्हणता येईल. उत्पत्ती कथांचा व्याप अर्थातच इतका प्रचंड आहे की त्याचा कोश तयार करणे ही केवळ अशक्य गोष्ट आहे असे वाटते.

**(ब) प्रलय कथा :** लय, अंत, मृत्यू, महाअंत या अनुभूतीत प्रलयाची कल्पना प्रस्तुत झाली हे खरे. प्रलयाची कल्पना ही कल्पना असली तरी ती सत्यावर आधारित आहे. मात्र मानवाने जगत्कारण शक्तीतून व जननप्रक्रियेतून अविनाशित्वाचा आणि सापेक्षतेचा बोध घेतला आहे. निसर्गातील विनाशकारी प्रकोप त्याने पाहिले ते प्रकोपतत्त्व त्यात सामावलेले आहे. प्रलयाच्या कथा पुराणे व लोकसाहित्य यातून सतत प्रवासहत झालेल्या आहेत. वानगीदाखल काही कथा पाहू.

(१) ''जगबुडी नदी ही खेड (तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी) गावची खाडी असे म्हणतात. (वस्तुतः ती खाडी नाही कर्मोण्याला तिचे खाडीत रूपांतर होते) जगबुडी नदीच्या तटावर एक नंदी (शिव वाहन) आहे. तो दरवर्षी तिळतिळ पुढे सरकतो. तो नदीत गेला की जग बुडणार असा लोकविश्वास आहे. या नदीच्या काठी उन्हेरी (गरम पाण्याचे झरे) आहेत.''[३८]

(२) काम (जनन), काल (मृत्यू) व परशुराम (पुनर्स्थापना करणारा) परशुरामाने एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केल्याची पुराण कथा प्रसिद्ध आहेच.[३९] हा एक प्रकारे प्रलयच होय.

(३) शतपथ ब्राह्मणातील कथेचा म्हणजे मनूच्या कथेचा पगडा अजून भारतीय मनावर तर जसा न तसा बसलेला आहे. पण बायबलातल्या जुन्या करारातल्या नोहाच्या कथेतही त्याचा स्पष्ट ठसा दिसून येतो. आम्ही असे मानतो की, प्रत्येक युगाच्या अखेरीला जग प्रलयात बुडते. मनूची होडी देवमाशाने पहिल्या मन्वंतराच्या आरंभी तटावर आणून सोडली. तीच क्रिया प्रत्येक मन्वंतरात होते व होणार आहे. अशा तऱ्हेने जगाचे रहाटगाडगे कधीही न संपता चालू राहणार आहे. बायबल व कुराणाप्रमाणे हा प्रलय फक्त फारफार पूर्वी एकदाच झाला आणि जगातल्या पापाला विटून ईश्वराने ते बुडविले आणि नोहाच्या होडीत सर्व प्राणी भरून त्याला व त्याच्या बायकोला जग म्हणजे मनुष्यप्राणी जेव्हा सारे पृथ्वीतलावरून नाहीसे होतील त्या दिवशी देवाच्या दरबारी न्यायाचा दिवस येईल व पाप-पुण्याचा झाडा घेतला जाईल. पण पुढे काय होईल ते कुणी सांगावे?

दुर्गाबाईंनी प्रलयांच्या कथेची बीजे दिली आहेत.[४०] (१) माणसाच्या



पापामुळे रागामुळे परमेश्वराने जगाचा नाश करण्याचा निश्चय केला. पौराणिक कल्पनांप्रमाणे विनाश सृष्टिनियमानीच येतो. (२) ईश्वराने राग आल्यावर संहाराची दोन अस्त्रे योजली १. आग व २. पाणी. मिसरी बाबिलोनिय संस्कृतीत अशा कल्पना आहेत. (३) ग्रीककथेत आणि मनूच्या कथेत त्याचप्रमाणे नोहाच्या कथेत पाण्याचा पूर दाखविलेला आहे. (४) वैदिक व आदिवासी कथांत काही ठिकाणी साम्य तर काही ठिकाणी या संदर्भात वैधर्म्य दिसते.

दुर्गा भागवत यांनी प्रलयकथामागील धारणा स्पष्ट करण्यासाठी कथांची बीजे दिली आहेत. ही बीजे विविध कथारूपे धारण करून अवतरतात. भारतातल्या विशेषतः छोटा नागपूरच्या भागातल्या मुंडा खरिया वगैरे आदिवासीत सींगा बोंगाने (सूर्यदेवाने) खरोखरच अग्नी वर्षाव करून जाळून टाकले अशी कथा दिली आहे. शिवाला मृत्यू, लय किंवा प्रलय देवता समजतात हे सर्वश्रुत आहे.

**दैवतमाहात्म्य कथा :** मिथकामध्ये माहात्म्य करणाऱ्या व स्वरूप वर्णन कथा करणाऱ्या कथांचा भरणा प्रचंड आहे. येथे केवळ वानगीदाखल चार उदाहरणे घ्यावयाची आहेत.

**(१) कळसुबाई आमुची आई**[४१] : शेतकऱ्याची एक मुलगी. तिला सावत्र आईचा जाच. गुरे वळण्यास पाठवी. शंकराची भक्त. सावत्र आईने तिचे लग्न कुणा आंधळ्या पांगळ्याशी करावयाचे ठरविले. 'लग्न करीन तर शंकर देवाशीच नाही तर तशी राहीन' असे वडिलांना सांगते. उंच डोंगरावर तप करते. एका कोळ्याने तिला ''तू कोण?'' म्हणून विचारले. ''म्हादेवाची बायकू.'' महादेवभक्त कोळ्याने प्रचिती घेतली. तो तिच्या मागेमागे गेला. त्याला चमत्कार दिसला. ती महादेवाच्या डाव्या मांडीवर बसली होती. डोंगराच्या कळसावर बसून तप करणारी ही शंकराची पार्वती कळसुमाई. परिसरामधील कोळी ठाकरांची आई. एका म्हाताऱ्या भक्ताला कळसापर्यंत जाता येईना म्हणून तिने आपले एक स्थान पायथ्याशी दिले. तिथे तिचे देऊळ बांधले. कोळी ठाकरांचा म्हणतील तो हट्ट पुरविणारी ही माता पार्वती. डांगाणाची आई. पापी ग्येला तर गडावरून जिवंत येत नाही. क्षमायाचना केली तर ती तारते. सुकाळात, दुष्काळात ती कोळी ठाकराचं रक्षण-पोषण करते.

**(२) यक गाय आन प्रवरा माय**[४२] : प्रवरेला अमृतवाहिनी असे नाव आहे. दुग्धवाहिनी असेही नाव आहे. एक गवळण खाट्या गायांना चारायला नेत असे. गाया तिच्यावर प्रसन्न झाल्या. त्यांनी तिला मध्यरात्री नदीवर यायला सांगितले. तेथे दुधाच्या धारा निघतील असे सांगितले. ती रात्री घागर घेऊन प्रवरेवर जाऊ

लागली. दुधाची धार निघू लागली. घागरभर दूध ती आणू लागली. खाट्या गायीचे दूध कसे? लोकांनी प्रश्न केला. तिने भाबडेपणाने सांगितले. ''एक गाय अन् प्रवरा माय'' एका गवळणीने पाळत ठेवली. मागेमागे गेली. दूध आले नाही. वनगायींना वाचा फुटली. ''तू दिलेले वचन कोणाला न सांगण्याचं पाळलं नाहीस! त्या म्हणाल्या. दूध बंद झाल. लोकांच पुण्य असेल तोवर पाणी गोड राहील पाप वाढलं की पाणी फिके पडेल.'' त्यांनी शापवाणी उच्चारली. लोक सचोटीने वागू लागले. म्हण आली 'गोदास्नानं प्रवरा पानं!'

(३) **यात्रा भरली की घनदाट**
**बोला मल्हारीचा येळकोट ।।धृ।।**
**नवलाखाची ही पायरी ।**
**खंडेरायाची ही जेजुरी ।**
**चला आनंदानं चढू घाट ।। १ ।। बोला ---**
**मिळूनि आलो की सर्वजण ।**
**भरले आनंदाने माझे मन ।**
**पाहू डोळ्यानं देवाचा थाट ।। २ ।। बोला ---**
**ऊद कापूर नारळ फोडू ।**
**चला भक्तांनो लंगर तोडू ।**
**मग होणार देवाची भेट ।। ३ ।। बोला ---** [४३]

(४) वेद, ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे, आदि, महाकाव्ये, पुराणे यातील सर्व कथा तसेच त्यांच्या आधारे प्रचलित झालेल्या मौखिक व लिखित परंपरांतील कथा या दैवत माहात्म्यकथाच होत. बौद्ध, जैन इ. पंथ व कुराण, बायबल आदी धर्मग्रंथातील दैवतकथा याच प्रकारात घालता येतील.

(५) नाग, बैल-गाय, वाघ, कुत्रा, मोर, गरूड आदी पशुपक्ष्यांना, औदुंबर, शमी, निंब, बेल, पिंपळ, रामेठा, बिबवा इ. वृक्ष वनस्पतींना दैवत्व बहाल झालेले आहे. त्यांचे माहात्म्य व्रतवैकल्ये सांगणाऱ्या अनेक कथा दिसतात. उदा. १. वेदोत्तरकालीन साहित्यात गरूड हे विष्णूचे वाहन मानले गेले आहे. गरूड पुराण एक स्वतंत्र पुराण आहे. २. वेदात अहि बुद्न्यि देवता बनलेली दिसते. नंतरच्या काळात सर्पांना गन्धर्वांप्रमाणे अर्धदिव्य जाती समजले गेले आहे. ही देवता पृथ्वी, अन्तरिक्ष, द्युलोकातही वास करते. सूत्रांत पृथ्वी, वायू आणि द्युलोकातील हविष-दानाचा अधिकार मिळाला आहे. नागपंचमी हा सण नाग उत्सव म्हणून साजरा होतो. नागपंचमीची कहाणी प्रसिद्ध आहे. ३. गाय-तेहतीस कोटी देवांची



धारणकर्ती आहे असे लोकमानसात तिचे स्थान आहे. बैल व गाय यांचेसाठी स्वतंत्र सण साजरे केले जातात. ४. बेल, पिंपळ, रामेठा, बिबवा ही अनुक्रमे शिव, विष्णु, राम व कलंकी यांची रूपे अनेक ठिकाणी मौखिक परंपरेत सांगितली जातात. ५. वाघदेव-चाळीसगाव डांगाण परिसरात वाघबारस नावाचा सण साजरा केला.[४४] अंबेचे वाहन, रानाचा रक्षक म्हणून त्याचे महत्त्व आहे.

**देव वाघराज नवसाला पावत ।**
**शंभर शेरडा त्येच्या नवसाला लागत ।।**
**देव वाघराज पयली पायरी नेमाची ।**
**यंगून देइना डोंगर गर्विया मनालीं ।**
**देवू वाघराज आमच्या यशीन नकू येऊ ।**
**आमची गुरा ढोरां नको वायाला जाऊ देऊ ।।**
**देवू वाघराज तुला गानाची आरती ।**
**गावाच्या देशीला तुही चंदनी मुरती ।।**
**देवू वाघराज तुहीबारस घालितो ।।**
**तुला देतो टिळा उभा गाव जेवतो ।।**

**(विठ्ठल बारकु रवाडे, कातळापूर-संग्राहक)**

(६) पृथ्वी ही विष्णूची पत्नी असून तिला शेषनागने आपल्या फडावर धारण केले आहे. पृथ्वीला माता मानले असून प्रातःकाली तिला वंदन करून तिला पदकमल स्पर्श करावा अशी परंपरा आहे. ''पृथिवी की स्तुति, जो कि बहुधा धौस के साथ मिली हुई है, तीन मंत्रोवाले एक छोटेसे सुक्त मे आती है''[४५] भूमी वंदना विषयींचा प्रसिद्ध श्लोक असा ''समुद्रवसने देवि । पर्वतस्तन मण्डले। विष्णुपत्नि! नमस्तुभ्यं पदस्पर्श क्षमस्वमे''[४६] वायू, पर्जन्य, आप या देवतांची माहिती देखील प्रो. डानल यांनी दिली आहे.[४७]

(७) विभूतिपूजा प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. त्यातील काही विभूतींना साक्षात देवत्व प्राप्त झालेले आहे. अगस्त्य हे त्यापैकी एक. अगस्त्यांच्या कथा सर्वदूर विखुरल्या आहेत. अकोले येथे अगस्त्यांची समाधी असून त्यांचे माहात्म्य सांगितले जाते.[४८] शंकराचार्य, ज्ञानेश्वर, चक्रधर इ. विभूतींना देवत्व लाभले आहे. त्याच्या विषयीच्या कथा या दैवत माहात्म्यकथाच होत.

**ग्राम, स्थान दैवतकथा (ग्रामदैवते) :-**

गावगन्ना ग्रामदैवते निर्माण झालेली असतात, स्थानपरत्वेही काही देवता निर्माण झालेल्या असतात. त्यांचे माहात्म्य त्या त्या ठिकाणी असते. बांधाबांधावर

बीर उभे केलेले असतात व त्यांच्या विषयी कथा सांगितल्या जातात. पीराच्या कथाही अशाच प्रचलित आहेत. अशा दैवतांना ग्रामदैवते असे म्हणतात. वानगीदाखल काही उदाहरणे पाहू.

**(१) काळुबाचा बळी**[४९] : काळुबा वारंघुशी गावाचे दैवत आहे. फार वर्षांपूर्वीची गोष्ट. सगळे लोक त्याची पूजा करीत. त्याने सर्वांच्या स्वप्नात जाऊन सांगितले की दर तीन वर्षांनी त्याची मोठी जत्रा करा. जत्रेत एक मुलगा आणि एक मुलगी बळी देत जा. झाले हे अनेक वर्ष चालले. एकदा काय झालं गावाची पोर नाहीशी झाली म्हणून लोक घरोघर तपास करू लागले. ज्या घरातील पोरं बळी द्यायचं त्याच्यासह सगळीच नाहीशी झाली. बळी देण्याची वेळ आली. काळुबाच वारं आलं. ''महा निवद आजुक दिला नाही. टिळा झाला नाही. तवा आता गावाची बरीगत नाही'' काळुबा बोलला. लोक म्हणाले ''देवा तुहा परसाद गावत नही आमी त तुही लेकरां आह्यात. त मग सांगशील तसा करू. आज पोहोत करीत आलो. काय बी करा आन गावाला सुख द्या.'' लोक गेले. तपास करू लागले. एका कोपऱ्यात टोपलं होतं. उचललं. दोन बकरा होती. लोकांना आणखी आनंद झाला. लोक म्हणाले ''काळुबाची किरपा झाली पोराबाळाची येल चढली'' लोकांनी बकरं काळुबा जवळ आणली. वारं बोललं ''काय आनला?'' ''बकरा'' भक्त म्हणाले. वारं बोललं ''आरं मी परसन हाये तुमची पोरां सुखी हाये माही सायली गावावं.'' मग गाव सुखी झालं. काळुबा म्हणजे खंडोबाचा आवतार अस लोक सांगतात.

**(२) यहामोगी**[५०] **:** बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्गावर गुजरात सरहद्दीपासून २५ ते ३० किलो मीटरवर लागणाऱ्या देवमोगरा फाट्यापासून दहा किलोमीटर अंतरावर भरूच जिल्ह्यात सागबारा तालुक्यात देवमोगरा गाव, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या सीमेवर तिकोना गावाजवळ हे गाव आहे. येथे यहामोगी ही भिल्ल कोकणा वनवासींची कुलदेवी आहे. महाशिवरात्रीला यात्रा भरते. ५ ते ७ लाखांची, देवीच्या अंघोळीच्या जागी पनठा व गांडा ठाकूरच्या दोन मूर्ती आहेत. (अर्जुन- श्रीकृष्ण अशी श्रद्धा) ते देवीला शोधत येथे आले. नवसाला पावणारे हे जागृत दैवत. ही समृद्धीची देवता होय.

**''केल्ला गावू रेनारो राजा चंदाजीबाहा**
**सिद्धपूर पाटणे रेहलो, राजा चंदाजी बाहा**
**सिद्धपूर पाटणे सोडक्षन चंदाजी बाहा''**[५१]

येथून चांपानेर, पावागड असे करी सागबाऱ्याला आला.



**''राती होपोने आलीही, देवी अंबाजी यहाँ**
**आना काये आखे रा देवी अंबाजी यहाँ**
**होना मूर्ती बोऱ्हावे गावदेवे मोगराले**
**जंबोकाडो पिडलो, राजा चंदाजी बाहा''**

तो सागबाऱ्याला आला. त्याने मोठी सभा भरविली. त्या सभेला सगळे राजे आले. राजाने एक छानसे घर बांधले आणि त्यात सोन्याच्या मूर्तीची स्थापना केली. तिची पूजाअर्चा केली. मोठी यात्रा भरविली. देवी संतुष्ट झाली. सातशे वर्षांपासून पूजा होते आहे.

(३) भारतात तीर्थक्षेत्रे विपुल आहेत. प्रत्येक नदी, डोंगर, देवस्थान यांच्या विषयीच्या कथा काही पुराणात नमूद केलेल्या तर काही केवळ स्थानिक आहेत. इथे भीमाने नदीला बांध घातला, इथे रामाने वाळूचे लिंग स्थापले इत्यादी. जिथे जाल तेथे आख्यायिका ऐकू येतील. दुर्गाबाईंनी या कथांचे अनेक पर्याय कसे सापडतात, प्रतीककथांच्या स्वरूपात त्या कशा असतात यांचे विवेचन केले आहे. त्यांनी अबूच्या पहाडावरील वृद्ध वाल्मिकीचे ज्या कुमारीवर प्रेम जडले पण जिची प्राप्ती त्याला तिच्या आईच्या विरोधामुळे झाली नाही, त्या तीन प्रस्तरमूर्तींची कथा अशीच आहे.[५२] पंढरीच्या विठ्ठलाची कथाही अशाच स्वरूपाची प्रांतिक स्थान तीर्थकथा आहे. गुरुचरित्रात अशा स्थानमाहात्म्याची अनेक उदाहरणे आहेत. महाराष्ट्रातील नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसर हा अशा कथांनी भरला आहे. एक छोटे उदाहरण येथे घेणे ठीक होईल.

**सवतीर्थ**[५३] : ''ही कुंडा कंदी आटत नही आन कितीक पाऊस झाला तरीबी भरत नाही ही का लक्षेमनाची कुंडा आह्यात.'' यकदा काय झाला का रामाना सीताला वनवासात सोडून यीयाला सांगला. त मंग लक्षेमनाला परश्न पडला का कुक नेवा. तवा तो इठ आला. त मंग सीता पकी दमेल व्हती. उजुक गरवार नारी. तवा तीलाका तवारी आली. ती का होंगी यंठ निजली आता लक्षेमनाना इच्यार केला का ईला का इठच सोडून जावा. पन म्हन, का ही उठल्यावं पानी मांगल, 'न मंग कंचा रं गड्या पानी पील?' त मंग त्यांनी डोक्याक यक तीर मारून कुंड क्येला. पर त्येली इंच्यार क्येला का 'डोक्याकचा पानी पील का पायाकचा पानी पील?' तवा त्याना पायाक बी यक कुंड क्येला आन म्हनं 'इकीला पानी पीवं नयत तिकीला पीव' आन निंगून ग्येला. सीता उठल्यावं पयती त म्हनं, हा समद्या तीरथांचा पानी मयासाठीच आनला असं हा कंदीच आटनार नही ''आन मग ती तीठून उठीली आन निंगून गेली. तवापून यंठ या तीरताला पक लोक येत्यात आन

इठीला पानी पित्यात. दुसकाळामंदी बी हा पानी आटत नाही.''

अकोले तालुक्यात कातळापूर गावाजवळ तेरुंगणची वाडी आहे तेथे औदुंबराच्या झाडाखाली ही कुंडे आहेत.

**आजुबाचा डोंगर**[५४] : ''ह्या आजुबा ध्यानाला बसलं असं. औजुबा मंजी वाल्मीक रीगषी. ते का तातुबाच्या मठात रयत असं आन या थंड ध्यान धरत असं तवा त्येचा हा डोंगर.''

आजुबा नावाचा एक डोंगर अकोले तालुक्यात आहे. हे सह्याद्रीचे उंच शिखर (१३२७ मी. उंच) आहे.[५५] प्रवरा नदीच्या तीरावर रंधा गावाजवळ एक तातोबाचा मठ नावाचे स्थान आहे. हा वाल्मिकीचा आश्रम. येथे लवकुश जन्मकथा सांगितली जाते व प्रवरेच्या तीरावर सीतेची बाळंते धुण्याची जागा दाखवून 'सीतापाऊल'[५६] नावाचे एक स्थानही आहे.

**भूतकथा :–**

भूतपिशाच, नाग या अतिमानवी योनी म्हणून पुजिल्या जातात. त्यांना शूद्रदेवता म्हणता येईल. मृतात्मे व त्यांच्या संबंधीच्या कथा ह्या यातच ग्रथित होतील. झपाटणे, लागीर इ. गोष्टी यात येतात. महाभारत, रामायण व जातकापर्यंत या योनीचा उल्लेख मिळतो. वेताळ हा प्रकार यात करता येईल. वेताळकथा सर्वदूर प्रचलित आहे. आग्यावेताळाचे सोंग बोहाड्यात नाचविले जाते. या संबंधात गावागावातून कथा सांगितल्या जातात. बहुतेक कथा या स्थानिक असतात.

**(१) भुताटक्याचा राजा :** ''पकालाम कोकनाच्या वाटाव यक वस्ती हाये. तीकीली लोक का भुताटक्या करत्यात. त्यठ यक आव व्हती. ती का कंदी म्हातारीच व्हत नसे. ती का इकील्या बाजूना कोकणात चाला का त्येला मंदिच थांबवायचा आन त्येचं का कोंबड नहीत माकाड करून दिसभर ठिवायची आन रातचा भोगईच्छा पुरी करून आन आंधळा करून सोडून दियाची. तो येस वलांडून रस्त्याला लागला का मंग त्याला दिसं. असा लई दिस चाला, यकदाका ठाकरवाडीचा लक्षा ठाकूर चेटक्या व्हता. आन तो का त्या वाटाना बेला घिऊन विकाया चाला. त त्या चेटकीना पाहायला. तसा त्येला बोलावली त्याना हेरला का ही चेटकी हाय इचिका खोडकी जीरवायची, तो त्यंठ ग्येला. बैलाबिला बांधली आन ती मंतर म्हनु लागली तसा तीच कोंबडं झाली. त मंग त्याना कोंबड्याचा रूप चेतला तीन भोग घेतला आन बगलला मारून आन बरूबर घिऊन ग्येला. बाजार झाल्येव तीला घ्येऊन आन वाडीव आला. आन बारीच्या खिंडीत दोघांनी घर क्येला, आन येका झाडाखाली त्येंचा देयव मांडला आन तो बायी त्याची



बटीक झाली. दोघा मिळून जाणाऱ्या-येणाऱ्यांना लुटाया लागली. लय दिसानं ती गेली पर डागानाची शीव वलांडायची असली का त्यो देव लागतोच. मंग त्येला सीर द्यावा लागतो. अजून बी तठ त्या आह्ये.''[५७]

**(२) साप किंवा नागाविषयीच्या रूढ समजुती :** डॉ. मांडे यांनी बऱ्याच विस्तृत प्रमाणात दिल्या आहेत.[५८] पण त्यात अतृप्त इच्छा असणारे मृतात्मे, धनरक्षक, भूजंग, जलदेवता. (उदा. कालिया), पुत्रप्रातीसूचक पूर्वज, श्रेष्ठ व अवतार व्यक्तींचे रक्षक-कृष्ण, बुद्ध, मल्हारराव होळकर इ. बांधांपासून रक्षक, पृथ्वीचा धारक, स्त्रियांचा क्रियकर, नागापासून मानवनिर्मिती इ. नाग अमर आहे. इ. समजुती आहेत. 'नागबंध' चर्चेत तारा भवाळकर यांनी या संबंधी बरीच चर्चा केली आहे.[५९] ह्यात त्यांनी नागबंधाची परंपरा स्पष्ट केली आहे. त्यात देशविदेशातल्या समजुतींचा परामर्श केला आहे. त्यांनी दिलेली एक नागकथा अशी ''त्यावेळी गावच्या जुन्या घरात राहात होतो आम्ही. मळा वडिलार्जित जुना होता. मोठी विहीरही होती मळ्यात. दुपारच्या वेळी सहज म्हणून मळ्यात होतो सगळे. जो तो आपापल्या उद्योगात होता. आम्ही मुले झाडावरचे पेरू-चिंचा असला मेवा शोधण्याच्या चिंतेत होतो. मोठ्या बायका आमच्या पोटापाण्याची सोय करण्यात गढल्या होत्या. वडील आणि काका पाणी आणण्यासाठी म्हणून विहिरीवर गेले. थोड्या वेळाने दोघेही आले पण ते खूप घाबरलेले होते. सगळ्यांनी घाबरून उत्सुकतेनं त्यांच्याभोवती कोंडाळं केलं, तेव्हा त्यांना धीर आला. मग कळलं की, त्यांना विहिरीत मोठा नाग दिसला होता.

आजी-आजोबांनी निःश्वास टाकला. ते म्हणाले ''मग तर भ्यायचं मुळीच कारण नाही उलट मुलांना शुभशकून झाला. तो आपल्या घराण्याचा मूळ पुरुष आहे. शेतमळ्याचा तोच रक्षक आहे. त्याने दर्शन देऊन अभय दिलं. आजीनं रीतीप्रमाणे सर्वांच्या जेवणाआधी 'त्या' च्या नावाने नैवेद्य काढून विहिरीच्या पाळीवर नेऊन ठेवला आणि आम्ही निश्चिंत झालो.''

**(३) सोमलवाडीचा गायख्या :** ''ह्या डोंगराला वरतील्या, त्या आग गडद्या आह्यात पक शमशंभर जनावर त्यंठ रयतय. गायखं कितीक दिस तीठ मुक्कामाला रयतय. तीठील्या यका गडदीत का खवीस हाये. हांगो त्येला कोंबड म्हना, बोकड्या म्हना का सीर म्हना दिल्या सिवायकाय तो रहन द्येत नही, यकदाका यक गायखं त्यंठ ग्येलं. तो का म्हनं का मी काय त्येला सीर द्येनार नही. पहू बरा काय व्हताय. त मंग झोपायच्या टायमाला यक शेळी कुढून कायानु त्येंठ आलीत गायख्या म्हनं कोनाची रं गड्या चुकली त्यानं का त्या शेळीला ठून घेतली. रातीचा

वखत आन पक आंधार. गायख्यांना का श्येक केला आन, गुरा लावली यक्या बाजुला आन श्येकत असं, त मंग त्या शेळी आली आन श्येकाव उभी रयली. त गाख्या म्हन कसा गड्या असा. त्या शेळीला कायच कसा व्हयना? त समद्या गायाहं मराया लागल्या. समद्या शेळ्या मेंमाया लागल्या. तसाच ती शेळी का पकी मोठी मोठी व्हत गेली आन तीन यक शेळी पार समंदी धरली आन यकाच घासात खाली आन तसाच जाळात गप्प गप्प झाली. गायख लय जोऱ्यात वराडलं आज बेसूद पडलं त्येचा वराडना का गायख्यांनी आयकला व्हता. सकाळीच आलं. त गायख बेसूदत त्यांना का समदा सांगला. पर उजुक तो काय नीट झाला नही. तवापुन त्यठ रयच आसला त का पयला सीर द्या त्यात आन मंग रयत्यात मंग कायच व्हती नाही.''[६०] सोमलवाडी ता. अकोले येथील डोंगराची ही कथा आहे.

**(४) घोटीचा चकवा :** ह्या तीन रस्त आह्यात आन यठ चेटक्याचा राज हाये. त्येच्या फेऱ्यात गवासला का तो कुकयबी फिरीतो. यकदा दोन परवासी या चकव्यात फेऱ्यात सांपडलंत बारा वर्स फिरत रयलं. त्यली कुठे जातो आन कुठंनही काय समजान. मंग बारा वर्सानं त्ये चकव्याच्या केंद्रातून निफाटले सभोवती तीन फेऱ्या मारल्या का चकव्यातून निफाटता येतो. हा चकव्याव पक मोठ भूताटक मांत्रिक कोकणातून आलं होतं त्यांच्या पैनी पडल्या कोनाच्या अंगात लय ताकद हाये. तवा त्येनी ह्यो चकवा करून ठिवला. यंठ भुताचा राज असतोय.[६१] घोटी (कोतुळ डांग), ता. अकोले, जि. नगर ह्या गावी जमाना इथे तीन रस्ते लागतात तेथे हा चकवा असल्याचे सांगितले जाते.

**(५) 'भूतमातेचा महोत्सव' :** या लेखात डॉ. रा. चिं. ढेरे यांनी भूतमाता या दैवताच्या परंपरेचा, स्थानांचा व महोत्सवाचा परामर्श घेतला आहे.[६२] ही भूतमाता 'प्रेतभूतसमाकुला' असल्याचे सांगतात. तिच्या उत्सवात भूतपिशाचांप्रमाणे सर्व प्रकारची गलिच्छ राख लोक अंगाला लावून घेतात. पार्वतीच्या रजस्रावातून ही देवी निर्माण झाली असे शिवाने पार्वतीला सांगितले. ही भूतमाता उत्पन्न झाल्यावर शिवाच्या वीर्यातून एक पुरुष निर्माण झाला. हा पुरुष भयंकर होता. त्याच्या परिवारात भूतपिशाचांचा समावेश होता. त्यांच्या हस्तस्पर्शाने सर्वत्र रात्र होईल असे सांगितले. 'दिवसा तुम्हाला काही करता येणार नाही' असेही शिवाने सांगितले. मग ती दोघे एकरूप झाली. कालरात्र असे त्याचे स्वरूप-भूतमातेचा उत्सव वैशाख वद्य प्रतिपदेपासून आमावास्येपर्यंत करावा. उत्सव केल्याने पीडा होत नाही. या उत्सवात अनिष्ट कर्माची फळे दाखविणारी व पाखांडाची विटंबना



करणारी नाना प्रकारची नृत्ये करावीत असा संकेत. सौराष्ट्रात प्रभास क्षेत्री ही भूतमाता आहे.

(६) 'होप्स अॅण्ड फीअर्स ऑफ द ऑर्डिनरी मॅन' या प्रकरणात विचक्राफ्ट अॅण्ड कोर्सेस आणि घोस्ट या स्वतंत्र मुद्यांची चर्चा केली आहे.[६३] (Hopes and Fears of The Ordinary Man IV Which Craft and Curses. V Ghost) In The I liad The ghost of Patroklas appears to achilles to the latters great astonishment, with the simple request: "Bury means quickly as possible and let me pass the gates of Hades' This belief in ghost was strong enough in latter Greece for Plato to be able to refer to and use for the parpses of his own argument in the Phaedo")

(७) नगर जिल्ह्यात (महाराष्ट्र) श्रीगोंदा, अकोला, पुणतांबा या गावात अनेक भूतकथा प्रचलित आहेत असे माझ्या पाहणीत आढळले आहे.

**परिकथा :-**

यात अतिमानवी योनीपैकी अप्सरा, पऱ्या, मावलया (मातृका सटवाई) (सातीआसरा-पाण्यातल्या) यक्ष, गंधर्व, किन्नर यांच्या कथा समाविष्ट होतात. ह्या कथा मूळच्या दैवतकथाच होत असे म्हणण्यास हरकत नसावी. या विषयी अद्‌भूतता, काल्पनिकता यामुळे संभ्रम निर्माण झालेला असला तरी या देवता म्हणूनच पूजन होते. राक्षस व दैत्य हेही याच दैवत कथांमध्ये समाविष्ट करणे योग्य होईल.

(१) कथासरित्सागरात सूर्य प्रभलंबकात (तरंग ६) एका संन्याशाने स्मशानात यक्षणीला प्रसन्न करून घेण्यासाठी होम केला. तेव्हा विद्युन्माला नावाची यक्षीण विमानातून आली. विद्युन्माला, चंद्रलेखा व सुलोचना या यक्षिणी उत्तम, बाकीच्या हीन असाही उल्लेख कथेत आहे. महाभारतात लोकपाल सभापतीत जी यक्षांची नावे आहेत त्या मणिभद्र, विशालक, यांच्याबरोबर पिशाच्चांचाही उल्लेख आहे. त्यावरून यक्षांचा पिशाच्चांशी संबंध व त्याचे स्मशानातले राहणे यांचा उलगडा होतो. 'जैन वाङ्मयातील उल्लेखही दुर्गाबाईंनी दिले आहेत.'[६४]

(२) किन्नर हे गायनात नर्तनात मुरलेले असतात. तोंड घोड्याचे व शरीर पुरुषाचे असा उल्लेख कुमारसंभवात आला आहे. ते अतिकामुक पण प्रेमळ असतात या संदर्भात महाभारतात काही कथा आढळतात.[६५]

(३) गंधर्व विविध रूपे धारण करतात. ते गायन वादनात तरबेज असतात. आकाशगमन अवगत असते. कौषीतकी ब्राह्मणात गंधर्व पाण्यात राहून इंद्राच्या

सोमाचे रक्षण करतात.[६६]

(४) राक्षसकथाही अद्‌भूततेने भरलेल्या असतात. रामायण, महाभारतात व पुराणात अनेक राक्षसकथा आल्या आहेत. राक्षसांना लिंग नव्हते, त्यांच्या रक्तस्त्रावातून पुनरात्पत्ती होते असे उल्लेख व समजुती होत्या. ते रक्षक असतात. त्यांना उपभोग मात्र घेता येत नाही.[६७] अतिमानवी योनी वैशिष्ट्ये दुर्गाबाईंनी दिली आहेत ती अशी[६८] १. त्यांना मायिक सिद्धी प्राप्त असतात. २. त्यांना आकाशसंचार सुलभ आहे. ३. त्यांना अदृश्य होता येते व रूप पालटता येते. ४. त्यांना कला, संगीत, नृत्यात प्रावीण्य असते. ५. मानवांशी संभोग करता येतो. ६. त्यांची मानवापासून झालेली अपत्ये मानव असतात. ७. पऱ्यांप्रमाणे त्यांना उडताना पंख लागत नाहीत. गंधर्व विद्याधरांना माळांच्या सामर्थ्याने उडता येते ८. दिवसापेक्षा रात्री संचार त्यांना आवडतो. ९. मानवाच्या दैवाचे प्रमुख साहाय्यक किंवा विघातक म्हणून त्यांचे महत्त्व.

अद्‌भूत कथांमध्ये या योनीचे उल्लेख आहेत हे खरे; परंतु माझ्या पाहणीत मातृका आसरा यांची स्थाने दिसतात. हे उल्लेख मात्र लोकसाहित्यात पुष्कळ सापडतात. गडागडाच्या मावलायांचे उल्लेख व स्थाने, साती आसरांची स्थाने डांगाण परिसरात अनेक ठिकाणी आढळली. सटवाईचे देऊळ पिंपळगाव (अकोला) येथे आहे.[६९]

**तारे, नक्षत्रे व ज्योतिषकथा :–**

'ज्योतिषकथा' या दैवतकथांतल्या प्राचीनतम कथा आहेत असे म्हणायला हरकत नाही. अंधार–उजेडाच्या प्रतीतीतून त्या निर्माण झाल्या. दिवसरात्रीचे क्रमाने आगमन, चंद्रसूर्य व नक्षत्रे यांचे प्रकाशदान व परस्परावलंबित्व किंवा विरोध त्याचप्रमाणे आकाशाच्या अनंत पोकळीत सामावलेले खगोल विश्व आणि जीवजंतूंना आधार देणारी पृथ्वी, अंतराळातून अदृश्य असा भिरभिरणारा वारा आणि त्याचे श्वासोच्छ्‌वासागणिक मानवाला होणारे भान, पृथ्वीला वेढून टाकणारा सागर, सूर्याला झाकणारी अभ्रे आणि उंच आकाशातून गर्जत कोसळणारा पाऊस आणि त्या योगाने अंकुरित झालेली फलदा धरणी, या सर्व महान आश्चर्याच्या भावनेतून ज्योतिषकथा स्फुरल्या आहेत. पंचमहाभूतांच्या भयकारी व सुखकर आविर्भावांचा मानवी नियतीवर झालेला परिणाम त्या त्या भुतांचे जागृत अवस्थेतले मानवाने केलेले आवाहन मिळून या कथा तयार झाल्या आहेत.[७०] ही ज्योतिषकथा निर्मिती प्रक्रिया एकूण मिथकप्रवृत्तीचा भाग आहे असे म्हणायला हरकत नाही. यात आकाश, पृथ्वी, सूर्यचंद्र ग्रह, तारे, नक्षत्र, धूमकेतू, उल्का, भविष्यविषयक,



निसर्गातील पशुपक्षी, मानव यावर आधारित कथा, दिवसरात्र इ.कथा येतील. त्यांचे नमुने पाहताना दुर्गाबाईंनी भारतीय वेदपुराणे ब्राह्मणग्रंथ, जैन, बौद्ध वाङ्मय याचबरोबर जागतिक क्षेत्रातील प्राचीन ग्रंथ व लोकसाहित्यातील अनेक उदाहरणे दिली आहे.[७१] येथे वानगीदाखल काही पाहू–

**(१) आकाश व पृथ्वी** यांची लग्नकथा ऐतरेय ब्राह्मणात आढळून येते[७२]– 'पहिल्याने आकाश व पृथ्वी एकत्र होती. मग ती विभक्त झाली. त्याबरोबर पाऊस पडेनासा झाला. पंचजनात कल्लोळ माजला. तेव्हा देवांनी त्यांना एकत्र आणले व त्यांचे लग्न लावले.' आकाश हा पुरुष व पृथ्वी ही स्त्री तर द्युला पिता (आकाशाला जनिता आणि पृथ्वीला माता) असे म्हटले जाते. 'द्युः हा वृषभ असून आपल्या हंबरड्याने पृथ्वीला गाभण करतो.' उषा ही कन्या, आश्विन हे त्याचे नातू. सूर्य व मरुत त्याचे मुलगे असे उल्लेख आढळतात.[७३] पृथ्वीला मानवाने माता मानले आहे. याबाबतीत मात्र जागतिक एकमत दिसते.

**(२) सूर्य आणि चंद्र :** मानवसंतती ही सूर्यसंतती असल्याची कल्पना जगभरच्या संस्कृतीत आढळते. भारतात सूर्य, चंद्र व शेष असे वंश प्रसिद्ध आहेत. सूर्योपासनेला अनेक धर्मात व पंथात महत्त्वाचे स्थान आहे. सूर्यदेवाची कहाणी प्रसिद्ध आहे. पुराणातही सूर्याच्या कथा आढळतात. सूर्याच्या पांगळेपणाविषयी उल्लेख येतात. सूर्य आणि नाग यांचेही अतूट नाते उल्लेखिले जाते. नाग हे कश्यपाचे पुत्र व सूर्याचीही एक विभूती कश्यप नावाने ओळखली जाते. महाराष्ट्रात पांगुळ नावाचे सांप्रदायिक भिक्षुक पहाटे गाणी म्हणत हिंडतात. सूर्य व चंद्र यांचा संबंध बहीण–भाऊ, भाऊ–भाऊ, स्त्री–पुरुष असा आलेला आढळतो. मेंरिफ्रियरने Old Deccan Days मध्ये पुढीलप्रमाणे कथा दिली आहे.[७४] सूर्य, चंद्र, वारा व पिंपळ ही भावंडे असतात. त्यांना जेवायचे आमंत्रण येते. बाकीचे भाऊ जेवणावर ताव मारतात, पण चंद्र एकटाच आईकरिता जेवण नखातून आणतो, तेव्हा आई चंद्राला, 'तू सदैव आल्हादकारक होशील' असा आशीर्वाद देते. सूर्याला 'तू जळजळशील', पिंपळाला 'तू सळसळशील' आणि वाऱ्याला 'तू भिरभिरशील' असा शाप देते. चंद्राच्या कथाही लोकसाहित्यात बऱ्याच आहेत. चंद्र हे रत्न असून समुद्रमंथनातून ते प्रकटले ही कथा सर्वतोमुखी आहे. चंद्राचा संबंध स्त्रीजीवनाशी – भाऊ, प्रियकर, सखी आदी नात्याने आला आहे. स्त्रीभविष्यातही चंद्रबल पाहण्याची प्रथा आहे. चंद्रावरील डाग, चंद्रावर हरीण, चंद्र, भरती–ओहोटी, चंद्रक्षय आदींविषयी अनेक लोककथा प्रचलित आहेत.

**(३) सूर्यचंद्रनक्षत्रे यांचा संबंध** : सूर्यचंद्र पतिपत्नी असून नक्षत्रे ही त्यांची

मुले होत असे खरिया व संताळ मानतात.[७५] नक्षत्राचा संबध पावसाशी आहे. हे मात्र जागतिक लोककल्पनात नमूद आहे. नक्षत्रांची संख्या कमी-अधिक प्रमाणात भिन्नतेने दिलेली दिसते. काही नक्षत्र कथांना वैदिक किंवा पौराणिक वाङ्मयात पर्याय नाहीत यावरून त्या पूर्ववैदिक असाव्यात अस निष्कर्ष दुर्गाबाईंनी काढला आहे.[७६] सूर्यचंद्र यांना 'चांदो' असे म्हटले जाते. महाराष्ट्रात मंडपाला चांदवा (छत) बांधण्याची प्रथा आहे. त्यात संपूर्ण आभाळ असा अर्थ दिसतो. नक्षत्रांच्यावर पावसाचे आडाखे बसविलेले दिसतात. ''सत्तावीस पैकी नऊ पडली नाहीत तर खाली किती नक्षत्रे राहिली?'' उत्तर 'शून्य', असा उखाणाही प्रसिद्ध आहे. नक्षत्र व तारे सारखेच परंतु त्या तारकांच्या बाबतीत वेगळेपणामुळे काही लोककथा निर्माण झालेल्या दिसतात. शतपथ ब्राह्मणात 'नक्षत्रम' म्हणजे ज्याला क्षत्र किंवा बल नाही ते नक्षत्र असे म्हटले आहे. कारण आदित्याने नक्षत्रांना शोषून घेतले. पूर्वी प्रत्येक नक्षत्र किंवा तारा सूर्याप्रमाणे तेजस्वी होता. पण पुढे सूर्याने त्यांना शोषून घेतले म्हणून त्याला आदित्य व तारांना नक्षत्र म्हटले. प्रत्यक्ष नक्षत्राची स्वतंत्र कथा व स्वतंत्र महात्म्य वर्णन करणाऱ्या कथा प्रचलित दिसतात. दुर्गाबाईंनी विस्ताराने या संदर्भात लिहिले आहे.[७७] पुष्यनक्षत्र शुभकार्यास उत्तम असल्याची समजूत लोकमानसात सर्वदूर प्रचलित आहे. अगस्त्य, ध्रुव, राहू अशा काही ठळक तारकांच्या कथा प्रसिद्ध आहेत. सप्तर्षीना खायले किंवा बाजले म्हणण्याची प्रथा आहे. जागतिक परंपरेतही असा पर्याय आढळतो, असे दुर्गाबाईंनी म्हटले आहे. ध्रुव ताऱ्याला कुंभार म्हणून समजले जाते. सप्तर्षीना मानवजातीचे निर्माते म्हणतातच असे वैदिक प्रथेचा हवाला देऊन दुर्गाबाईंनी म्हटले आहे.

**नवग्रह :** महाभारतातील उल्लेखानुसार राहू हा कश्यप व सिंहिका यांचा मुलगा होय. राहू हा दैत्य असून तो चंद्रसूर्यांना गिळतो. जालंधराच्या बाजूने शंकराकडे शिष्टाई करणारा म्हणून राहूसंबंधी पौराणिक संदर्भ आहे. राहू हा जातीने मांग आहे असे समजले जाते. दोसाढ व धनगरात राहूला मुखदेव मानून त्याची पूजा करतात. मंगळ हा रुद्रापासून उत्पन्न झाला व भूमीने वाढविला म्हणून तो भूमिपुत्र होय. मंगळ हा भविष्याच्या दृष्टीने पापग्रह मानला जातो. लग्न जुळविण्यात या ग्रहाकडे विशेष लक्ष दिले जाते. मंगळाच्या वधूचे लग्न मंगळाच्या वराशी करणे इष्ट समजले जाते. अन्यथा पती किंवा पत्नी मरते अशी समजूत आहे. 'नवग्रहांच्या' बाबतीत भविष्याच्या दृष्टीने अनेक आराखडे बांधलेले दिसतात. ग्रह कथांच्या दृष्टीने 'शनि माहात्म्य' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. नवग्रहस्तोत्रातही ग्रहमाहात्म्य प्रसिद्ध आहे. नवग्रहांशी संपूर्ण ज्योतिष जोडलेले आहे असे ज्योतिषशास्त्र सांगते. शुक्र



हा कामवासनेचा, सौंदर्याचा ग्रह मानला जातो. अशनी किंवा उल्का या संबंधातही अनेक समज आहेत. उल्कापात हा पुण्यात्म्याचा पुनर्जन्म या संबंधातही अनेक समज आहेत. उल्कापात झाल्यास काही अनिष्ट घडते असाही समज आहे.

**पशुपक्षी :** ज्योतिषकथात, नंदीबैलवाले, नंदी भविष्य कथन करतो असे सांगतात. ही परंपरा पौराणिक काळापासून प्रचलित असावी. शंकरपार्वती भविष्य व प्रलय विषय संवाद नंदी साक्षीने चाललेला असतो. त्यामुळे ह्या नंदीकेश्वराची पूजा केली तर तो सुकाळ, दुष्काळ, बरकत, इष्टानिष्ट याबाबत भविष्य सांगतो असा समज दिसतो. सहदेव भाडळी कुडमुडे ज्योतिषी आपली परंपरा शुकमुनीपासून सांगतात. रामपक्षी, शुकमुनी (पोपट), पावशा, टिटवी, घुबड, साळुंकी, कावळा, कोकीळ यांना भविष्यज्ञान आहे अशा श्रद्धा आढळतात व त्यामागच्या परंपरा सांगितल्या जातात. या परंपरांचा स्पर्श ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन देवतांशी आहे असे दिसते. अस्वल, भालू, कोल्हे, कुत्रे, मुंगूस, मांजर इ. पशूंच्या कथा ह्या भविष्याशी निगडित आहेत.

**भविष्यदैवते :** ब्रह्मदेव शंकर (कालभैरव), आकाश-(आकाशवाणी), सटवाई अशी दैवते व त्यांच्या कथा व समजुती प्रचलित आहेत. पितृदेवता मातृदेवता, ग्रामदैवतांच्या स्वरूपात कौल देण्याचे किंवा भविष्यकथनाचे काम करतात. यासंदर्भात आख्यायिका प्रसिद्ध आहेत. कळसुबाई, म्हसोबा, बहिरोबा (भैरवनाथ) (अकोला तालुका), केदारनाथ (ऐनी) ही याची उदाहरणे म्हणता येतील. ऋषीकथा-ब्रह्मऋषी नारद भविष्य सांगतात अशा कथा आढळतात. तसेच त्रिकालज्ञ ऋषींची परंपरा भारतात आढळते. वाल्मिकीने रामजन्मापूर्वी रामायण लिहिलं अशी आख्यायिका आहे. भृगुसंहिता हा भविष्यविषयक ग्रंथ प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे.

**शास्त्र, कला, धर्मनिष्पत्ती कथा :-**

धर्मनिष्पत्ती कशी झाली असावी याविषयी एकच समजूत नाही. हिंदू धर्माच्या बाबतींत वैदिकधर्म हा सनातन धर्म मानला आहे. मनुस्मृतीविषयी कथा दिसते. परंतु वैदिक धर्म हा वेदोव्यासांपासून सुसुत्रतेने प्रचलित झाला असावा असे म्हणता येईल. व्यासांनी वेदांची संगती लावली. वैदिकधर्म हा मौखिक परंतपरेतून वाहत आलेल्या शक्ती व संकेत यांच्या आधाराने लिखित स्वरूपात आला असावा असे वाटते. ब्रह्म उत्पत्ती, त्यातील मुख्य उत्पत्ती आहे. ब्रह्म हे विष्णूच्या नाभीकमलातून प्रकटले व त्यांस चार मुखे म्हणजे चार वेद होत अशी समजूत प्रचलित आहे. हेच मौखिक परंपरेचे सुसूत्र आदिरूप असावे. वेद अपौरुषेय

आहेत असे म्हणत असताना प्रत्येक वेदात अनेक ऋषींच्या ऋचा व मंडले मात्र ग्रथित आहेत. हे ऋषी स्वतंत्र संशोधक व लोकसाहित्य संपादक असावेत व त्यांनी लोकबंधांचे सुसूत्रीकरण आपल्या बुद्धी व मनःसामर्थ्याने समूह मनाचा कल पाहून अनूभूतीपूर्वक केले असावे असे वाटते. हे घडूनही सुसूत्रपण आले नाही असे मौखिक परंपरेतील साहित्य भरपूर शिल्लक राहिले व त्यातून अवैदिक परंपरा निर्माण झाल्या असाव्यात. मनुस्मृती हे त्या वैदिक परंपरांचे पुनरुज्जीवन होय असे म्हणता येईल. हिंदू धर्म निसर्ग नियमानुसार प्रगमनशीलतेने प्रगत होतो आहे असे म्हटले जाते. त्यास भरपूर पुरावा या स्वरूपात उपलब्ध आहे. ख्रिस्त, महंमद हे परमेश्वराचे प्रेषित आहेत, तर बुद्ध, जैन हे परमेश्वराचे ज्ञान झालेले ज्ञाते आहेत त्यामुळे अशा प्रकारे परमेश्वराविषयी ज्ञान सांगून एक वर्तनपरंपरा सिद्ध करणारे ज्ञाते हे एक प्रकारे अनुसारणी निर्माण करणारे ब्रह्मवेत्ते ऋषीच होत, असे म्हटले पाहिजे. त्यांच्याविषयी जन्मकथा व त्यांच्याकडून झालेल्या धर्मउत्पत्ती कथा स्वतंत्रपणे मांडण्याचे कारण नाही तरी देखील एक गोष्ट येथे मान्य केली पाहिजे की सनातन वैदिकधर्म हा सृष्टीचे आदिकारण, हे सृष्टीला धारण करणारे तत्त्व असावे असे मानतो व त्यांची पूजा करणे हे प्रथम कर्तव्य मानतो. अन्य धर्म, धर्म संस्थापकास देव नव्हे तर प्रेषित मानतात. याचाच अर्थ असा की, तेही या सनातनधर्म बंधाचे घटकच ठरतात किंवा त्यातूनच निर्माण होणारे एकग्रंथ एकसारणी पंथ ठरतात.

**शास्त्रे व कला :** दर्शने शास्त्रे कशी झाली यांच्या कथा वेदपुराणात आढळतात व त्या संदर्भातील दैवतेही सांगितली जातात. उदा. वैद्यकशास्त्र उत्पत्तीविषयी कथा (१) चरक, सुश्रुत व काश्यप संहितेतील उल्लेखांनुसार प्रथम आयुर्वेदाची उत्पत्ती झाली. नंतर विविध मानवप्रजा जन्माला आली. मनुष्य किंवा अन्य प्राणी कसा जन्माला यावा, त्याची वाढ कशी व्हावी, त्याच्या शारीरिक क्रिया-प्रक्रिया कशा सुरळीत घडून याव्यात यासंबंधी सर्व नैसर्गिक नियम ब्रह्माने (प्रजा निर्माण करणाऱ्या निसर्गदेवाने) निर्माण केले. नंतरच मनुष्यप्राणी निर्माण झाला.[७८] ब्रह्मा-प्रजापति-अश्विनौ-इंद्र-सुश्रुत, चरक काश्यप-सुश्रुतापासून धन्वंतरी, चरकापासून भारद्वाज आणि काश्यपापासून काश्यप, वशिष्ठ, भृगु, अत्रि त्यांचे पुत्र व शिष्य अशी परंपरा दिली आहे.[७९] (२) धन्वंतरी हा विष्णूचा अवतार समजला जात असे. आणि त्यास यज्ञात हविर्भाग अर्पण केला जातो अशीही समजूत वेदोत्तर आली आहे. वेदात 'अश्विनौ' उल्लेख आहे.[८०] नाट्यशास्त्राच्या बाबतीत नाट्योत्पत्तिविषयक पहिल्या अध्यायात - आत्रेयप्रभृती मुनींनी विचारलेल्या नाट्यवेदांसंबंधीच्या पाच प्रश्नांच्या उत्तरादाखल भरतमुनी सांगतात की, देवांच्या विनंतीला मान देऊन सर्व वर्णांना



उपयोगी व दृश्य आणि श्राव्य क्रीडनीयकाच्या स्वरूपाचा नाट्यवेद ब्रह्मदेवाने चार वेदांचा अंश घेऊन निर्माण केला.[८१]

**विधिकथा :** यातुक्रियांवरील श्रद्धा मानवाच्या अतिप्राचीन काळापासूनची असावी. मानवी व्यक्तिगत व लोकगत अशा जीवनातील गरजा, इच्छातृप्तीसाठी तत्संबंधी शक्ती आत्मसात करणे किंवा वश करून घेणे या कल्पनेतून शक्ती अनुसरून त्या शक्तींचे मंत्र, स्तोत्रे व पूजनार्थ त्या शक्तीची समग्रप्रतीके निर्माण करून योजकतापूर्वक पूजन करण्यासाठी काही नियम, संकेत व प्रतीकात्मक आखणी करणे म्हणजे यातुक्रिया विधी मार्ग होत. यातुक्रिया म्हणजे अशा कृती की ज्यांच्या सहाय्याने मानव अतिमानवी शक्तीला वश करून तिच्याकडून आपल्या इच्छेप्रमाणे काम करून घेऊ इच्छितो. ही शक्ती परिणामरूपाने किंवा कार्यरूपानेच प्रत्ययाला येते. यातुक्रियेमध्ये मंत्रतंत्राचा वापर केला जातो. मांत्रिक त्यांच्या साधनांना गुप्त ठेवतात. मंत्राचा संबंध शिव या पूर्ववैदिक अतिप्राचीन देवतांशी असून, मंत्रातील 'ऱ्हीं' 'क्ली' असे उच्चार नेमके केव्हा व कोणत्या भाषेचे अवशेष आहेत हे सांगता येत नाही. ब्राह्मण व यज्ञ यांच्याशी त्याचा संबंध नसावा असे दिसते. सिद्ध पुरुषांचे उच्चारण म्हणजे मंत्र, उदा. होमहोमात शिवाला 'रुद्राय पशुपते स्वाहा' म्हणून आहुती दिली जाते. मंत्रांचा अर्थ आजतरी पूर्ण तुटला असला तरी ध्वनिरूप शिल्लक असून विधींशी मात्र त्यांचा संबंध आहे. जादूटोण्याशी त्यांचा संबंध आहे. मंत्राप्रमाणे यंत्र (Amulet) प्रचलित आहेत. मंत्र, यंत्रधात्वात्मक स्वरूप प्रतीकात्मक असते. डॉ. मांडे यांनी या संदर्भात उदाहरणांसह चर्चा केली आहे.[८२] यातुक्रियांनी सर्व व्यवहार व्यापले आहेत.

मानवी जीवनातील गरजा व इच्छा तृप्ततेसाठी अनके व्रते केली जातात. तोडगे केले जातात. या व्रतांमागे शिव, शक्ती, ब्रह्म, विष्णू यांच्यापासून परंपरा असतात. या विधिव्रतांचा भरणा भारतीय संस्कृतीत फार मोठा आहे.

(१) सत्यनारायण व्रतकथा. त्यात व्रत परंपरा व कथा आलेली दिसते. (२) नागनारायणबली विधी परंपरा क्रिया सांगितली जाते. (३) शतचंडीमहायज्ञ, यज्ञविधी कथा परंपरा सांगितली जाते. अशी अनेक उदाहरणे देता येतील. 'चर्तुवर्ग चिंतामणी' या ग्रंथात एक हजार व्रते सांगितली आहेत. ही व्रते हेमाद्रीपंडितांनी संपादिली आहेत.

दैवतकथांचा व्याप एवढा प्रचंड आहे की त्याने जगातील सर्व जीवनाला अर्थगर्भता दिली आहे. मिथकांचा प्रवास हा अनादी अनंत आहे. 'लोक' प्रवासात नवी मिथके तयार होत असतात. मात्र एक महत्त्वाचे लक्षात येते, की मानव पुन्हा

पुन्हा अतिआदिम बिंदूपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतो. हा प्रवास काहीसा उलटा असतो. तो 'स्व' व 'लोक' च्या जिवंतपणात भरून राहिलेला युगांचा संदर्भ असतो. आदिबंधात्मक प्रवास तो हाच. मात्र हे आदिबंध हे देखील अतिआदिम मानवी जीवनाला स्फुरलेले अतिआदिम, सनातन, शाश्वत स्वरूपातून स्फुरलेले आणि लोकजीवनात साठलेले संचित असते. म्हणूनच गीतेतील 'उर्ध्वमूल अधः शाखा' वादाने ह्या जीवनप्रवाहाची आणि संचिताची संगती लागते. मिथक प्रवृत्तीतून प्रेरीत झालेली काही सनातन शाश्वत बीजे किंवा लोकबंध शोधण्याचा प्रयत्न केला तर काय दिसते. –

**सनातन शाश्वत कल्पनाबंध (लोकबंध) :–**

(१) सर्व विश्वाचे मूलकारण एक शाश्वत चैतन्यत्व आहे.

(२) सृष्टीतत्त्वे पृथ्वी आप तेज वायू आणि आकाशही सनातन गोचर शाश्वत तत्त्वे मूळ चैतन्यतत्त्वापासून निर्माण झाली आहेत. ही मूळ दैवते होत.

(३) सृष्टीतत्त्वात सदैव जननप्रक्रिया सुरू असते.

(४) जननाचा संबंध शाश्वत तत्त्वातून निर्माण झालेल्या शक्तीतत्त्वांमध्ये असतो. ही शक्तीतत्त्वे स्वयंभूपणे सनातन गोचरातून चैतन्य तत्त्वाच्या प्रेरणेने निर्माण झालेली असतात. किंबहूना त्याचेच रूप असते.

(५) पुरुषतत्त्व व स्त्रीतत्त्व यांपासून सृष्टी निर्माण होते परंतु काही अपवादात्मक परिस्थिती केवळ चैतन्यतत्त्वाच्या रूपापासून वा त्यांच्या अंशापासून प्रकृतीतून अयोनी संभवतेने उत्पत्ती निर्माण होते.

(६) या मूळ शक्ती तत्त्वाची अनेक रूपे सृष्टी जीवनात प्रकटतात. कधी ती मानवी वा अतिमानवी स्वरूपातही जाणवतात. लोकमानसात त्यांना देवत्त्व प्राप्त होते. ही दैवत मानण्याची प्रक्रिया मानवाच्या जीवनप्रवाहात श्रद्धारूपाने धर्म तत्त्वाच्या स्वरूपात सनातन संचित रूपाने वाहत असते. कारण त्यातूनच त्याच्या विकारांचे समाधान होते. त्याला मानसिक आणि शारीरिक सुरक्षितता वाटते.

(७) सर्व दैवतांची परंपरा अखेर कोणत्यातरी अतिआदिम सृष्टीतत्त्वात व त्यानंतर मूळ तत्त्वात जाऊन मिळतात. लोकसमूहात असाधारण कर्तृत्त्वसंपन्न मानवसुद्धा त्या शक्तीने युक्त वाटल्याने त्यांचे विभूतीमत्त्व देवत्त्व धारण करतो.

(८) अतिमानवी योनी ह्या मानवी जीवनाला सहाय्यक असतात व त्याचा उद्‌भव हा असाधारण संकर परिस्थितीतून निर्माण झालेला असतो.



(९) मानवाची मरणोत्तर अवस्था चैतन्यतत्त्वाशी निगडित अवस्थेत देवत्त्व मिळणे, चैतन्यतत्त्वाशी एकरूप होणे किंवा पुनर्जन्म लाभणे अशी अवस्था लाभते. अधांतरी अवस्थेत भूतपिशाच्च व प्राणीरूपे यांच्यात प्रकटीकरण होते.

Myth (दैवतकथा) चा येथवर विचार केला, समाजजीवनात दैवतांची उपासना विविध स्तरांवर सुरू असते. – (१) ग्रामदैवते (२) स्थानदैवते (३) क्षेत्रदैवते (४) कुलदैवते इ. परंतु या सर्व दैवतांची संगती वरील शाश्वत कल्पनाबंधाच्या आधारे लावता येते.

**संदर्भसूची :–**

१) मालशे (डॉ.) स. गं. (अनु.) **'साहित्य सिद्धान्त'** (रेने वेलेक आणि वॉरन लिखित Theory of Literature या ग्रंथाचा अनुवाद), प्रकाशक : महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र, प्र. आ. मे १९८२ पृ. २०४.

२) मांडे (डॉ.) प्रभाकर : **'लोकसाहित्याचे स्वरूप',** परिमल प्रकाशन औरंगाबाद पहिली आवृत्ती १९७८,पृ. २०५ ते २०७.

३) भागवत दुर्गाबाई : **'लोकसाहित्याची रूपरेखा',** वरदा बुक्स, पुणे सुधारून वाढविलेली दु. आ. १९७५, पृ. १४९ ते २१८.

४) सहस्रबुद्धे (डॉ.) अनिल : **'लोकसाहित्यविचार',** सविता प्रकाशन, औरंगाबाद प्र. आ. १९९१, पृ. १८ ते २२.

५) पुरी विद्यावाचस्पति (डॉ.) उषा (संपा. ले.) : **'भारतीय मिथक कोश',** नेशनल पब्लिशिंग हाऊस २३, दिल्ली, प्र. संस्करण १९८६, भूमिका.

६) ENCYCLOPEDI BRITNICA; A New Survey of universal Knowledge Volume 16 Mushroom to Ozonolysis Chicayo 1962, London, Toronto / Mythology Classification.

७) तत्रैव.

८) उनि : लोकसाहित्याचे स्वरूप, पृ. २०५ ते २०७.

९) तत्रैव : पृष्ठ ११ ते ४१.

१०) उनि : लोकसाहित्याची रूपरेखा. पृ. १८३ व इतर ठिकाणी.

११) जोशी (पं) वेंकटेशशास्त्री, ढेरे (डॉ.) रामचंद्र चिंतामण व थिटे (डॉ.) गणेश उमाकांत (संपा.) : **'संस्कृति सुगंध'**. प्रकाशक : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे द्वि. आ. ९ मे १९७७, **'दिव्येतिहासाचे स्वरूप आणि आपला वारसा'** : दिनकर केशव बेडेकर, पृ. ९७.

१२) उनि., '**भारतीय मिथक**' कोश, पृ. ८.
१३) तत्रैव : पृ. ११.
१४) उनि., '**लोकसाहित्याची रूपरेखा**', पृ. १९.
१५) Guthrie W.K.C.: The Greeks and Their Gods' London Methuen Co Ltd , First Published Jully 27-1950, page 1 to 26.
१६) सूर्यकांत (डॉ.) (अनुवादक): '**वैदिक देव शास्त्र**', मूळग्रंथ वैदक माइथालोजी– प्रो मैकडानल ए.ए., प्रकाशक श्री. भारत भारती (प्राइवेट लिमिटेड) दिल्ली, प्र. संस्कारण जुलै १९६१, पृ.१.
१७) उनि., भारतीय मिथक कोश भूमिके, पृ. २ ते ५.
१८) श्रीमदभगवद्गीता अध्याय १५.
१९) उनि., लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. १५१ व १५२.
२०) ढेरे रा. चिं. : '**लोकसाहित्य शोध आणि समीक्षा**' , श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ३० ऑक्टो १९९०, पृ. ९, '**शोधाच्या वाटेवर**'.
२१) उनि., वैदिक देव शास्त्र, पृ.१.
२२) उनि., लोकसाहित्याचे स्वरूप, पृ. २०५ ते २०७
२३) उनि., साहित्य सिद्धान्त, पृ. २०४.
२४) विश्वनाथ खैरे : '**भारतीय मिथ्यांचा मागोवा**', संमत प्रकाशन.
२५) उनि., लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. १४९ ते २१८.
२६) उनि., The Greeks and Their Gods, पृ. २७ ते ११२.
२७) तत्रैव, पृ. २५४ ते ३०५.
२८) उनि., भारतीय मिथक कोश, पृ. ४२३.
२९) उनि., लोकसाहित्याचे स्वरूप, पृ. २०५ ते २०७.
३०) तत्रैव, पृ. १९८ ते २०१.
३१) उनि., लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. १५८.
३२) उनि., वैदिक देवशास्त्र, पृ. २४ ते २८.
३३) उनि., लोकहित्यविचार, पृ. १९.
३४) सहस्रबुद्धे (डॉ.) अनिल : '**चाळीसगाव डांगाण परिसर सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास**' (टंकलिखित – प्रबंध) पुणे विद्यापीठ १९७९ भाग दोन, पृ. १६३, १६४ (निवेदिका संग्राहिका तुळाबाई देशमुख शेणित (अकोला, अ.नगर)
३५) भवाळकर (डॉ.) तारा, '**लोकसंचित**', राजहंस प्रकाशन पुणे. (कैलाशराणा) पृष्ठे १०८ ते ११९.
३६) बाबर (डॉ.) सरोजिनी (संपा.), '**एक होता राजा**', भाग ५, कोकणी लोकगीते २ संग्राहिका सौ. शरदिनी मोहिते सांगली, पृ. १७६, प्रकाशक लो. सा समिती माला पृष्प १० वे.
३७) राजूरकर अ. ज., '**ग्रीक पुराणाशतील डायोनिसस म्हणजे वेदातील विवस्वत**'–'**भारतीय इतिहास आणि संस्कृती**' (त्रैमासिक) मुंबई मराठी. ग्रंथालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक, पुस्तक १०९, एप्रिल–जून १९९१, पृ. ३ ते ८.
३८) सहस्रबुद्धे आनंदी (संग्राहिका) : '**जगबुडी नदी**' लोककथा, मूळ राहणार ऐनी मेटे, जिल्हा रत्नागिरी.
३९) सहस्रबुद्धे आनंदी : '**काळ काम परशुराम**'.
४०. उनि., लोकसाहित्याची रूपरेखा, पृ. १६७ ते १६९.
४१) भागाजी घाणे (संग्राहक ): '**कळसुबाई आमुची आई**', मु. वारणघुशी, ता. अकोले, जि. अ.नगर.
४२) झडे वामा. (संग्राहक): 'एक गाय प्रवरा माय', मु. रत्नवाडी, ता. अकोला, जि. अ.नगर
४३) उनि., 'एक होता राजा' 'वाघ्यामुरळीची' गाणी, पृ. २५.
४४) उनि : 'चाळीसगाव डांगाण', पृ. ६५.
४५) उनि., वैदिक देव शास्त्र, पृ. ३२२.
४६) '**भारत भक्ति स्तोत्र**'. संपादक लोकविकास केंद्र, गोपाळ नगर, जालन्धर (भारत)
४७) उनि., वैदिक देव शास्त्र, पृ.२०४ ते २१४.
४८) उनि., चाळीसगाव डांगाण परिसर, पृ ३० (भाग १).
४९) तत्रैव, भाग २.
५०) '**लाखो आदिवासींमधील श्रद्धास्थान यहामोगी**', स्पेशल रिपोर्ट योगेंद्र, जुनेगढ, 'लोकमत' जळगाव ५/३/१९८९.
५१) सोनार (सौ.) विजया (संग्रा.) : '**यहामोगी**' नवापूर जळगाव.
५२) उनि., 'लोकसाहित्याची रूपरेखा', पृ. २६१ ते २६३.
५३) उनि., 'चाळीसगाव डांगाण परिसर' (भाग २) पृ. १८५/१८६.
५४) तत्रैव, पृ. १८९.
५५) तत्रैव, पृ. १८६ / १८७.

५६) तत्रैव, पृ. १८६ / १८७.
५७) तत्रैव, पृ. १९६ / १९७.
५८) मांडे (डॉ) प्रभाकर : 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह' कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, आ. पहिली १९७५, पृ. ६७/६८.
५९) उनि., लोकसंचित, पृ. १२८ ते १३४.
६०) उनि., चाळीसगाव डांगाण परिसर, पृ. १९७/१९८.
६१) तत्रैव, पृ. १९८.
६२) ढेरे रामचंद्र चिंतामण : **'लोकसंस्कृतिची क्षितिजे'**, विश्वकर्मा साहित्य २०३५, २ सदाशिव पेठ, पुणे, प्र. आ. ३ ऑ. १९७१, पृ. २१ ते ३४.
६३) उनि., The Greeks Their Gods, पृ. २७०.
६४) उनि., लोकसाहित्याची रूपरेखा (तळटीप), पृ. २२३.
६५) तत्रैव, पृ. २२१ ते २४०.
६६) तत्रैव, पृ. २२१ ते २४०.
६७) तत्रैव, पृ. २२१ ते २४०.
६८) तत्रैव, पृ. २२१ ते २४०.
६९) उनि., चाळीसगाव डांगाण परिसर.
७०) उनि., 'लोकसाहित्याची रूपरेखा', पृ. १७०.
७१) तत्रैव, पृ. १२० ते १७०.
७२) तत्रैव. ७३) तत्रैव.
७४) तत्रैव, पृ. १८०, १८१.
७५) तत्रैव, पृ. १९०.
७६) तत्रैव, पृ. १९२.
७७) तत्रैव, पृ. १९३.
७८) वडोदकर सिद्धेश्वर विष्णू : **'आयुर्वेदाचा इतिहास'**, म. वि. ग्र. नि. म. प्रकाशन, प्र. आ. १९७३ (ग चं शके १८९५), पृ. १.
७९) तत्रैव, पृ. ५०.
८०) तत्रैव, पृ. ८१.
८१) कंगले र. पं. : **'नाट्यशास्त्र'** /महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ प्रकाशन मुंबई, प्र.आ. १९७३.
८२) उनि., लोकसाहित्याचे अंतःप्रवाह पृ. १४९ ते १६१

✦✦✦



# ३. लोकबंधात्मक समीक्षा : संकल्पना व प्रयोग

**(अ) लोकबंधात्मक समीक्षेची संकल्पना :–**

(१) लोकसाहित्य आणि ललितसाहित्य यांचा अनुबंध शोधण्याच्या धडपडीतून लोकबंधात्मक समीक्षेची संकल्पना पुढे आली आहे 'लोकतत्त्वीय समीक्षा' असा शब्दप्रयोग यासाठी पूर्वी केला गेला आहे.[१] भारतीय विचार परंपरेत 'तत्त्व' हा शब्द तत्त्वज्ञानाच्या संदर्भात आलेला आहे. या शब्दाचा अभिप्रेत अर्थ धर्म, नीति, शास्त्र या मर्यादेत प्रकटतो. लोकधारणेतील सर्व अंगे, लोकधारणेची सर्व पारंपरिक कल्पनासूत्रे, संकेत प्रकट करण्याचा दृष्टिकोन 'लोकबंध' हा शब्द प्रचारात आणला आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे समीक्षा दृष्टीला अधिक व्यापकता येते हे लक्षात घेऊनच 'लोकबंधात्मक समीक्षा' हा शब्दप्रयोग केला आहे. लोकसाहित्याचे मूलागमित्त्व, जीवनसमग्रता, वर्तमानसंदर्भता, लवचिकता या सर्व संदर्भात 'लोकबंध' हा शब्द सयुक्तिक वाटतो. लोकसाहित्याची स्थलकाल परिस्थिती सापेक्षता आणि पारंपरिकता या दोन्ही गोष्टी सूचित करण्याचे सामर्थ्यही 'लोकबंध' या शब्दात आहे. त्या संबंधातील विस्तृत विवेचन 'लोकबंध'[२] या ग्रंथातून अभ्यासकांनी वाचणे योग्य होय.

**(२) लोकबंधात्मक समीक्षेचे स्वरूप :** लोकबंध मौखिक रूपात, वर्तनपद्धतीत, विधिविधानांच्या सादरीकरणात पारंपरिकतेतून वर्तमानाच्या संदर्भासह जगताना जाणवतात. लोकबंधाचे प्रकटीकरण म्हणजे लोकसाहित्य होय. अशा लोकबंधाचा वापर कोणताही कलावंत, अपरिहार्यतेने 'घटकलोक' असल्याने, स्वाभाविकपणे आपल्या कलाविलासात करतो. त्यामुळेच एखाद्या साहित्यिकाचे साहित्य व्यष्टीपासून समष्टीपर्यंत विस्तारित अनुभूती घडवीत जाते. वरील तीनही प्रकाराने जाणवणारे 'लोकबंध' साहित्यात शब्दरूपातूनच प्रकट करावे लागतात.

या शब्दरूपांची लोकबंधात्मक सर्वांगीण पाहणी करू लागले की साहित्यकृती अधिकाधिक उकलत, उमलत जाते. अर्थातच आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन या दृष्टीने लोकबंधात्मक पाहणी साहित्याला वेगळे परिमाण मिळवून देते. लोकबंधात्मक समीक्षा करणे म्हणजे साहित्यिकाची भाववृत्ती लोकबंधांच्या आधाराने अपरिहार्यतेने साहित्यरूप कशी घेते याची साहित्यकृतीतील शब्दरूपातून उकल घडविणे होय.

(३) आदिबंधात्मक समीक्षा या समीक्षेस खूपच जवळची आहे. आदिबंधात्मक प्रतिमा या लोकबंधच होत. मात्र लोकबंधात्मक समीक्षा आदिम प्रतिमांप्रतीकांवरच अवलंबून न राहता 'लोक' जीवनातील प्रत्येक क्षण वर्तमान व सत्य मानून स्थलकाल परिस्थिती सापेक्ष मानसिक व व्यावहारिक जीवनात लोकधारणा करणाऱ्या म्हणजे 'लोक' चे एकजीनसीपण धारणात्मकतेने स्पष्ट करणाऱ्या सर्वच कल्पनाबंधांना (कल्पनासूत्रांना) व प्रतीके, प्रतिमा यांना सारखेच महत्त्व देते. 'लोकबंध' ज्या भाषिक रूपातून व्यक्त होतात त्या भाषिक रूपातून मानवी जीवनानुभूतीच्या समग्र व एकजीनसी रूपाचा वेध घेण्याचा प्रयत्न करते.

**(४) समीक्षेची पद्धती :** (१) भाषारूपे ही 'लोक' मानसाच्या पारंपरिक मान्यतेच्या कसोटीवर 'लोकबंधच' असतात. त्या आधारे समीक्षा करणे गृहीत असते. (२) विशिष्ट शब्दयोजना, वाक्प्रचार, म्हणी, लोककथा, दैवतकथा, श्रद्धा, समजुती, अतींद्रिय अनुभूती व शक्ती याविषयी कल्पना, अधरात्मे व त्या प्रकारच्या सर्व देवतांसंबंधी विधिनाट्ये, विधिविधाने, यातुक्रिया इ. विषयींच्या प्रतिमा, प्रतीके व संकेत यांची जाणीव घडविणारी शब्दरूपे, खगोल, निसर्ग, पशुपक्षी या संबंधी रूढ संकेत आणि त्या संदर्भातील रंग, रूप, नाद, लय, गंध, स्पर्श आदी प्रकट करणारी शब्दरूपे अशा प्रकारे शब्द लोकबंधांच्या आधारे आस्वादकाने 'स्व' च्या 'लोक' मधून साहित्यिक कलावंताच्या 'लोक' मध्ये डोकावून हृद्यसंवाद करण्याची अपेक्षा असते. (३) अशा पाहणीत आस्वादकाच्या 'लोक' मधील लोकबंधांच्या तुलनेत समीक्षा करता येते. या दृष्टीने अशी समीक्षा आशय व आकृती या दोहोंचा विचार करते. (४) कलावंतांची अपरिहार्य शैली लोकबंधात्मक अपरिहार्यतेने कशी प्रकटली आहे याची पाहणी केली जाते. (५) जीवनाच्या सर्व अंगोपांगातून लोकबंध आलेले असतात. त्यामुळे सर्व अंगोपांगांचे अर्थग्रहण, सौंदर्यग्रहण यात अभिप्रेत असते. त्यामुळे सर्वांगीण पाहणी घडते. (६) घटकलोक (व्यक्ती), अंगस्वरूप लोक (समूह) आणि विराटपुरुषरूप लोक अशा त्रिविधतेने कलाकृतीचा शोध घेणे अभिप्रेत असते. (७) स्थलकाल परिस्थिती



सापेक्ष संवेदनेने अपरिहार्यपणे कलावस्तूला, एक स्वयंपूर्ण व सेंद्रीय असे रूप लोकबंधातून प्राप्त होते. या सेंद्रीयतेची उकल अभिप्रेत असते.

**(५) व्याप्ती; मर्यादा व पथ्ये :–**

(अ) व्याप्ती : (१) 'लोक' च्या समग्रतेची अनुभूती घेताना आशय आणि अभिव्यक्ती संदर्भात प्रचलित सर्वच समीक्षा पद्धतींना स्पर्श होतो. त्यामुळे ही सर्वसमावेशक पद्धती ठरते. (२) कलानुभव सतत वाढवत नेण्याचे सामर्थ्य असते. (३) आकलन व आस्वाद यावर भर असला तरी मूल्यमापनापर्यंत पोहोचून सतत कक्षा वाढविण्याची क्षमता असते. (४) कलाकृती व्यष्टीकडून समष्टीकडे घेऊन जाण्यास अधिक उपयुक्त ठरते. (५) 'लोक' सापेक्ष साहित्य प्रकारांच्या (उदा. दलित, ग्रामीण इ.) साहित्य समीक्षेसाठी उपयुक्त. (६) कला आणि जीवन यामधील दुवा म्हणून कार्य.

(ब) मर्यादा : (१) सर्वस्पर्शीत्वाच्या नावाखाली सर्वच संदर्भात अपूर्णता येण्याचा धोका अतितांत्रिकतेतून निर्माण होईल. (२) कलास्वादापेक्षा 'लोक' उलगडून दाखविण्यातच अडकण्याची शक्यता. (३) लिखितरूपाची स्पष्टीकरणात्मक निवेदनेच अधिक होऊन समीक्षा व्यापार ठप्प होऊ शकेल.

(क) पथ्ये : सौंदर्यलक्षी पद्धतीने लोकबंधात्मक दृष्टीने तारतम्यपूर्व साहित्यकृतीला सामोरे जाऊन समीक्षाव्यापार करणे आवश्यक आहे.

(६) समीक्षक व रसिक, साहित्यिक आणि साहित्यकृती हे सर्व घटक 'लोक' चेच असतात. साहित्यकृती 'लोक' मधून प्रकट होते व 'लोक' मध्येच भावते. या दृष्टीने असे भावणे जेवढे सूक्ष्म व सखोल तेवढी समीक्षेची उपयुक्तता सर्व घटकांच्या दृष्टीने अधिक. या दृष्टीने लोकबंधात्मक समीक्षा महत्त्वाची ठरते. अर्थात हे अनेक प्रयोग अनेकांनी करूनच सिद्ध होईल. 'लोकबंध' या ग्रंथात ही संकल्पना विस्ताराने सोदाहरण मांडली आहे. संकल्पना समजावून घेऊन प्रयोगपूर्वक अभिमत तयार करणे इष्ट होईल असे जाणकारांना सुचवावेसे वाटते.

**संदर्भ : टीपा :–**

(१) 'लोकतत्त्वीय समीक्षा' असा शब्दप्रयोग डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. रा. चिं. ढेरे आणि डॉ. तारा भवाळकर यांनी केला आहे व अशा समीक्षेचे प्रयोग केले आहेत.

(२) सहस्रबुद्धे (डॉ.) अनिल 'लोकबंध' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे प्र.आ.१९९५.

**(ब) माळ : विद्याधर पुंडलिक**

**लोकबंधात्मक समीक्षा : प्रयोग**

'माळ' ही विद्याधर पुंडलिक यांनी लिहिलेली कथा. ही कथा प्रथमतः 'सत्यकथा'-दिवाळी १९७०, मधून प्रसिद्ध झाली. 'माळ' या विद्याधर पुंडलिकांच्या कथासंग्रहात ऑक्टोबर १९८० साली संग्रहित झाली. संग्रहाला 'माळ' हेच शीर्षक दिले. येथे 'माळ' या कथेची लोकबंधात्मक समीक्षा करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.

'माळ' ही कथा एका लोकसारणीची कथा आहे. 'माळ' आणि 'वारी' या लोकबंधात ही लोकसारणी सामावलेली आहे. 'माळ' ही लोकबंधात्मक प्रतिमा कथेच्या केंद्रवर्ती आहे. एका सूत्रात ओवलेले अनेक मणी एकाच फेऱ्यात 'स्व' चे माळरूप अस्तित्व प्रकट करीत असतात. त्याचवेळी सबंध माळेचं एकजीनसी अस्तित्व प्रकट होत असते. 'माळ' एका लोकसारणीची अशीच अनुभूती घडविते. ही 'माळ' ज्ञानोबा, तुकारामाची अद्वैताच्या सूत्रात एकेका श्रद्धावंत अनन्यभक्ताला गोवत जाणारी, आसक्ती, संसार, वासना यांच्या पलीकडचं निखळपण, परतत्वात सामावून टाकण्याची ग्वाही देणारी आहे. याचि देही याचि डोळा परमसुख सोहळा अनुभवास आणून देण्याची ग्वाही देणारी. एक नवा जन्म घडविणारी आणि याच जन्मातली अनुभूतीही घडविणारी म्हणूनच ही 'माळ' वारकऱ्याची, वारीची, अद्वैताची, पंढरीच्या राणाची, माऊलींची, वैष्णवांच्या भागवत धर्माची प्रतिमा! 'माळ' घातली की हे सार वाट्याला येण्याची ग्वाहीच! म्हणूनच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे 'माळ' या शीर्षकाने सुरू होणारी ही कथावस्तू एका लोकसारणीची कथा आहे. हा 'लोक' वारीच्या रूपानं आकारतो आणि 'वारकऱ्यांच्या समुद्रात' विराटरूपात वारीला सामावून घेतो. या घटिताची 'सनद' असते 'माळ'. वैष्णवांच्या सनातन जीवनाचं शाश्वत सूत्र 'माळ'. ही माळ माऊलींच्या नावानं गळ्यात घालून, भगवी पताका खांद्यावर घेऊनच वारी 'लोक' मध्ये प्रकट व्हायचं.

'माळ' या कथासंग्रहाच्या मलपृष्ठावर विद्याधर पुंडलिकांच्या कथेसंदर्भात स. शि. भावे अभिप्राय व्यक्त करतात, ''एकटेपणा, व्यक्तीचा आणि व्यक्तित्त्वाचा एकटेपणा पुंडलिकांना व्याकूळ करतो. देव, दैव, निसर्ग, समाज, कुटुंब अशांशी असलेल्या नात्यांचा उपयोग, जसा स्वतःचा एकटेपणा विसरण्यासाठी तसाच हा एकटेपणा निर्धास्तपणे भोगण्यासाठीही माणूस करतो. माणूस म्हणून प्रत्येकाच्या वाट्याला आलेला हा एकटेपणा पुंडलिकांच्या कथानुभवाचा मूलाकार आहे.''



ते पुढे लिहितात, ''पुंडलिकांचा वेगळेपणा हा की, हा एकटेपणा निराशेच्या किंवा आत्महीनतेच्या एकाच रंगाने माखलेला नाही, स्वतःशीच रमण्याचे, बाहेरच्या जगाला आपलेसे करण्याचे, क्षणाक्षणाला स्वतःसाठी नवीन निर्मिती करण्याचे- असे खोल साफल्य देणारे जे विविधरंगी आकार अशा एकटेपणाला असतात ते त्याच्या कथानुभवात गोळीबंद ताकदीने अवतरतात.'' त्यांची शैली या एकटेपणातील निर्मितीक्षमतेची ही 'गुप्तवाट' सापडल्याने आकारली आहे, असे त्यांना वाटते.

हा अभिप्राय लोकबंधात्मकतेने 'माळ' या कथेची पाहणी करतांना पूरक ठरेल यात शंकाच नाही. मात्र ते म्हणतात ''ती 'गुप्तवाट' वेगळ्या तऱ्हेने जोखावी लागेल. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे 'स्वतःचा एकटेपणा विसरण्यासाठी तसाच हा एकटेपणा निर्धास्तपणे भोगण्यासाठी'....इ.'' विधानांतील 'माणूस' चे वैशिष्ट्य लोकबंधात्मकतेने तपासावे लागेल. विद्याधर पुंडलिकांच्या कथेविषयी स. शि. भावे म्हणतात तसा मूलाकार वेगळ्या तऱ्हेने समजावून घ्यावा लागेल. लोकबंधात्मक जाणीव व्यक्तीचा 'घटकलोक' म्हणूनच अनुभव घेते. अत्यंतिक आत्मनिष्ठेतही 'घटकलोक' पण कोणी विसरू शकत नाही. या घटकलोकत्वापासून अत्यंतिक आत्मनिष्ठेमुळे आभासात्मकतेने एकटेपणाची किंवा पृथकपणाची झालेली जाणीवही माणसाला सहन होऊ शकत नाही. या पृथक्पणातून विकृती निर्माण होते किंवा मुमुक्षूपण तरी प्राप्त होते. तरी या दोन्ही अवस्था 'लोक' सापेक्षच ठरतात. माणसाचे घटकलोकत्व हाच त्याचा मूलाकार आहे. हाच पुंडलिकांच्या कथानुभवाचा मूलाकार आहे असे 'माळ' वाचताना सहज जाणवते. या मूलाकारात घटकलोकच्या वासना, भावना याही प्राणी पातळीवरून घटकलोकत्वाच्या पातळीवर झेपावण्यातच धन्यता वाटते. भासणारे पृथ:करण क्षणकालच असते. माणसाचे घटकलोकत्व, अंगस्वरूपलोकत्व आणि विराटपुरुषरूपलोकत्व हेच चिरंतन सत्य विद्याधर पुंडलिकांच्या कथानुभूतीतून देखील त्यांच्या या सूक्ष्म जाणिवेमुळे प्रकटते असे म्हणता येईल.

'माळ' या कथेत वारीचे सेंद्रीय अस्तित्व प्रकट झाले आहे. हे अस्तित्व वारकरी, दिंडी, वारी, वारकऱ्यांचा समुद्र या अपरिहार्यपणे शब्दरूपात आकारलेल्या लोकबंधातून प्रकट होते. 'वारी' च्या अस्तित्वात दिंडी हे जणू एक पात्र आहे. ही तात्यासंताची दिंडी, या दिंडीच्या, आळंदीपासून पंढरपूरापर्यंतच्या प्रवासाची ही वारीतली कथा. ही प्रवासकथा एक 'लोक' ची आहे. त्यात केसकर मास्तर आणि काशीताई ही दोन केंद्रवर्ती पात्रे. या दोन घटकलोकच्या आधाराने विद्याधर

पुंडलिक कथा निवेदन करतात. वरवर पाहता, ही कथा केसकर मास्तर आणि काशीताईंच्या एकटेपणाच्या अनुभूतीतून, दिंडीतून 'लोकपण' अनुभवण्याच्या धडपडीतून आणि कैवल्याच्या वाटेवर निःसंग बनून विराट पुरुषाच्या अनुभूतीत गुलाल बुक्क्यातला कण होऊन परमसुख अनुभवण्याच्या ओढीतून आकारली आहे असे वाटावे इतक्या वैपुल्याने या दोघांचे उल्लेख, त्यांचे संवाद, त्यांच्या संदर्भाने प्रसंग आलेले दिसतात.-

केसकर मास्तर दिंडीची आणि दिंडीबरोबर येणाऱ्या काशीताईंची वाट पाहतात. यायचे नाही असे ठरविले असूनही येतात. काशीताईंच्या संगतीत दिंडीतला प्रवास लोकबंधात्मकतेने करतात. घटकलोकच्या अस्तित्वातील सुखदुःखे एकमेकांना सांगतात आणि दिंडीच्या अंगस्वरूप लोकमध्ये ती सामावून टाकतात. पंढरपूरची वेस आणि चंद्रभागा ओलांडताना दोघांची दृढ होऊ पाहणारी संगत विराटपुरुषास लोकानुभूतीतून घेण्याच्या आसेतून तोडून टाकतात. निःसंग होऊन जातात, वारकऱ्यांच्या समुद्रात! कैवल्याच्या भेटीसाठी. वाटेवरल्या प्रवासात लोकजीवनाची एक लोकबंधात्मक अनुभूती 'स्व' सापेक्षतेने देतांना आपल्याला होणारा एकटेपणाचा क्लेशदायक आभास मोकळेपणाने एकमेकांजवळ ठेवतात आणि अखेर लोकबंधात्मक प्रवासात स्वतःला हरवून टाकतात. असे हे कथानक दिंडीचे मुक्काम, दिंडीचा प्रवास, त्यातली भजने, गप्पा, जेवणावळी, प्रवचने, जेजुरीचा डोंगर चढणे-उतरणे आणि वारी किंवा दिंडीतील नित्यनैमित्तिक विधिविधाने, सारणीच्या लोकबंधातून आणि अपरहार्य शाब्दरूपातून आकारलेला दिंडी आणि वारीचा एकजीनसीपणा यातून सादर होतो. हे सादर होताना 'दिंडी' या पात्ररूपतेच्या हालचाली आपणास कबीरबुवा, तात्या ओक, अमृता, दत्तु पेंटर, कोनाबाई, तिचा पोरगा, सोपानबाबा रायरीकर, कोंडीबा या घटकलोकच्या अस्तित्वामधून जाणवतात.

हे चराचर नव्हतं तेव्हांपासूनची कैवल्याची ही पहिली अनादि वाट- आळंदीला जाऊन प्रथम घेतलेल्या ज्ञानदेवांना पुसत पुसत पुढे जाणारी. या वाटेवर आकारला 'ज्ञानोबातुकाराम'चा 'लोक' 'वारी'. ही वारी या वाटेवर आकारते. पुढे पुढे सरकते आणि स्वतःच समुद्र बनते वारकऱ्यांचा! 'जय जय विठ्ठल! जय हरि विठ्ठल!' च्या गजरात ते 'परमसुख' सर्वांना कळते. सारा अट्टाहास सफल होतो.

कैवल्याचा आदिबंध परमसुखाचा मूलाकार प्रत्येकाच्या मनात ज्ञानोबा तुकाराम यांच्या रूपात साकारलेला. ज्ञानोबा तुकारामाच्या भावरूपानं त्यांच्याशी 'अद्वैत साधण्यासाठी आळवणी करायची' 'माझे माथा तुझा हात। 



शरीरसंबंधाची मिठी ।', 'विठो तुझे माझे राज्य। नाही आणिकाचे काज।' असा भावबंध प्रत्येकाच्या मनी वारीच्या रूपानं लोकबंध बनून प्रकटतो. 'विश्वाचे आर्त पांडुरंगाच्या पायी, स्वतःचे आर्त त्यातच विरवून मांडायचे', हा 'संतांचा निरोप' हा माऊलींचा मुळातला लोकबंध प्रत्येकाच्या मनात अशी कैवल्याविषयीची अनन्यभक्ती 'माऊली' च्या म्होरकेपणानं पालख्यांच्या विधिविधानातून अनंतमुखानं पण एकत्रितपणानं वाळवंटी मांडायची. ज्ञानोबा तुकारामाचा 'लोक' असा एकत्रिपणानं वाळवंटात 'समुद्ररूप' धारण करतो. पारंपरिक लोकबंध कलात्मक आणि व्यक्तिरूप प्रतीकातून मांडताना पुंडलिक सहज 'मांडणी' करतात, सगळ्या पालख्या एकत्र आल्या. निवृत्तीबुवा तुकारामाला, एकनाथ सोयराबाईला, नामदेव मुक्ताबाईला भेटला. चोखा बहिणाबाईला भेटला. युगायुगाच्या भेटी झाल्या. आता फक्त देवांचा देव पाहायचा होता या मांडणीत योगी निवृत्तीबुवा सगुणोपासक तुकोबाला आलिंगन देतात. एकनाथ सवर्ण शूद्र सोयराबाईला कवेत घेतात, सगुणवादी नामदेव निर्गुणोपासक मुक्ताबाईला भेटतात. केवळ भक्ती, चोखा-बहिणाच्या रूपानं प्रकटते असे 'लोक' चे केवलपण कैवल्याच्या भेटीसाठी 'देवाचा देव' पाहण्यासाठी प्रकटते. येथे प्रत्येक देवच होतो. अवघा भेद हरतो. घटकआत्मा विराटपुरुषरूप परमात्म्यात स्वतःला सामावतो. असा लोकमानसाचा बांध फुटतो.

'माळ' कथा एक प्रदीर्घ 'विधिनाट्य' आपणापुढे पारंपरिकतेने 'विधिविधाना' तून आणि त्याशी अपरिहार्य औचित्यपूर्ण शब्दरूपातून चमत्कृतिपूर्णतेने सादर करते. आपल्या समोर असलेली शब्दरूप कथावस्तू लोकबंधात्मकतेने आपल्या मनात ते 'विधिनाट्य' रंगविते. या विधिनाट्यात प्रत्येक वारकरी एक नाट्यघटक आहे. तो 'वारकरी' म्हणून जन्म घेतो तेव्हाच वारीतला घटकलोक होतो. त्याचे एकटेपण वाचकाला अनुभवास येतच नाही. त्याला भासणारे एकटेपणही तो कोणाजवळ तरी सांडतांना दिसतो. व्यापतापसंसारातील सुखदुःखाने व्याप्त असे त्याचे घटकलोकत्व आभासात्मक पृथकत्वाने आर्त बनून, जणू ते नाहीसे करण्यासाठी वारीचे घटकलोकत्व पत्करते. संसाराच्या वाटेवरून कैवल्याच्या वाटेने निघते. व्यवहाराच्या वाटेवरून वैराग्याच्या वाटेने निघते. 'निःसंग' बनण्यासाठी वारीचा सत्संग स्वीकारते. ज्या केवलपणातून चराचराचा जन्म झाला त्याशी अद्वैत पावण्यासाठीचे हे विधिनाट्य. या विधिनाट्याचा मातृकोश ज्ञानोबा तुकाराम! त्यांनी दिलेली विधिनाट्यातली सांगी 'निरोप' सांगणारी ही 'माळ' मोह, माया, वासना, यांचा त्याग करावयास लावणारी! विधिनाट्याचे सूत्र ही 'माळ'च. ही

'माळ' म्हणजे कैवल्याच्या वाटेची 'वहिवाट' या वारीत जन्मायचं तेही 'सनद' घेऊनच.

या विधिनाट्यातील प्रथम प्रवेशात 'वारी' केसकर मास्तरांपर्यंत येते ती त्यांना आपल्यात सामावून घेण्यास. कल्पनाचमत्कृतीपूर्ण मांडणीतून आणि महाराष्ट्राच्या पर्यावरणातील रस्त्यांच्या वर्णनासाठीची शब्दकळा वापरून पुंडलिकांनी वर्णन केले आहे. रस्त्यानं जिथे एकदम उंच फडा काढला होता तेथपर्यंत पालखी आली होती. एकेक वारकऱ्याची आकृती अन् त्याची भगवी पताका त्यामुळे एखाद्या प्रचंड खोल पोकळीतून वर आल्यासारखी वाटत होती. हळूहळू वारकऱ्यांचे घोळके दिसू लागले. थोड्या वेळानं पालखीच्या रथाचा चांदीचा कळस सूर्याच्या किरणात चमकला. आकाशात आणि झाडाझाडातून भगव्या पताकांचे लहान लहान थवे नाचतांना दिसू लागले, धरणीच्या खोल आतून घुमत यावा, तसा 'ज्ञानोबा तुकाराम' चा मंद थरथरता घोष कानावर आला. हां हां म्हणता वारी जवळ आली असा वारीचा मास्तरांसमक्ष जन्म.

विद्याधर पुंडलिक वारीतील विधिविधाने बारीकसारीक सामग्रीसह साक्षेपाने टिपून विधिनाट्यातून लोकमानसाचे प्रकटीकरण घडवितात. रस्त्यातली धूळ कपाळाला लावणे, ज्ञानेश्वरांच्या पादुकांवर माथा टेकणे, गुलाल बुक्का फासून घेणे, नेमलेल्या दिंडीत शिरणे, दिंडीच्या बुवांना वाकून नमस्कार करणे, बुवांना आलिंगन (ऊरभेट) देणे, कोणीतरी गुलाल माखून स्वागत करणे, कोणीतरी कपाळावर कपाळ टकरीसारखं आपटणे, ठरलेली जागा घेणे, टाळ (झांजा) वाजवणे, पखवाज (मृदंग) ताल देणे, चिपळ्या एकतारी, तंबोरा, पालखी, पताका, माळ, सामानाची थैली यासह वारी पुढे सरकणे, ठरलेल्या मुक्कामी वारी पडणे, सामूहिक भोजनाचा सोहळा, ठरलेली माणसे स्वयंपाकाच्या तयारीला लागणे, बुवांच प्रवचन, आरती, प्रवासात पद, अभंग घेणे, तो सर्वांनी आळवणे, पालख्या पालख्यांची भेट, वारीवारीची भेट, त्यात दिंड्या, त्यातील वारकरी कोठल्या कोठे एकजिनसीपणे वारीलोकबंधात सामावून जातात, अखेरचे प्रवचन होणे, आरती होणे, ती फिरणे, दिंडी फुटणे, वारकऱ्यांचा समुद्र दर्शनाला लोटणे या वारीच्या परंपरा, त्यातील वारकरी, आवाज यांच्या नवतेसह अपरिहार्य, लोकबंधात्मक शब्द उल्लेखातून पुंडलिक मांडतात. मास्तरांनी पहिल्यापासूनची स्वतःची वारी आठवली. वारी जशी जुनी तशी नवीही. पाणी तेच पण दर क्षणाला ताजं. विठ्ठलाघरचा नाद सनातन, पण अमृताचा आवाज नवा. सुख-दुःखाचे फेरे तेच पण आम्ही माणसं नवी. मी काशीताई विद्याधर हे वारीचं चिरंतनत्व



व सेंद्रिय मोजक्या पात्रांच्या (घटकलोक) आधारे प्रकट करतात. प्रवासात त्यांचे असणे प्रपंचाचा आठव आणि परमार्थाची ओढ, पाप फिटण्याची आस, 'परमसुख' अनुभवण्यातली उत्कटता, या सर्वांच्या पलीकडे देखील आणखी एक जाणीव प्रकटते ती म्हणजे वारीतील 'लोक' चे असणे, त्यांचे एकजिनसीपण, त्यात हरवून संसार- 'लोक' मधील घटकलोकत्व सोडून वारीतील 'लोक' मध्ये जन्मण्याची ओढ, यालाच स. शि. भावे यांनी एकटेपणातील निर्मितीक्षमतेची 'गुप्त वाट' असे म्हटले असावे. ही नावीन्याची ओढ म्हणजे जीवनमुक्ततेची सौंदर्याची जाणीव असावी, ही जाणीव प्रत्येक माणसात असते, हा विश्वात्मक मानवाचा उदात्त अनुभव विद्याधर पुंडलिकांनी केसकर मास्तर या नायक पात्राच्या प्रसंगातून सुचित केला आहे. ''दिंडीत तिसऱ्या नंबरची जागा मास्तरांची अन् शेवटची ऐंशी वर्षांच्या सोपानबाबा रायकरांची ठरलेली वहिवाट. आता मात्र मास्तरांना खरं बरं वाटलं.'' नव्या जन्मातही घटकलोकत्वच माणसाला हवं असतं ही जाणीव विद्याधर पुंडलिक नाट्यमय मांडणीतून सहज करून जातात. सूचक संवादातून ही ओढ अधिक स्पष्ट झाली आहे, ''येणार नव्हता. पण आणलंच ना माऊलीनं खेचून? या, घ्या आपली जागा. मंडळी केव्हांची वाट पाहांत आहेत.'' हीच कथा प्रत्येकाच्या जन्माची नव्हे काय? कथानुभूती अशी व्यापक होत जाते. एका मातृकोशात वावरत असतानाच तो मातृकोश धारण करणाऱ्या सांस्कृतिक पर्यावरणाच्या नैतिक विश्वात व्यापताप संतापाने माणूस कसा आणि कसकसा कावून जातो हे त्या घटकलोकलाच कळत नाही. येथेच त्याला एकटेपणाचा आभास होतो. तो त्याला कुरतडू लागतो. तो खरे एकटेपणा नसतो. ती नावीन्याची नव्याने मातृकोशाची ओढ असते. 'याचि देही याचि डोळा' तो अनुभव भोगण्यांची, पूर्व मातृपितृकोश हरवून जाण्याची दुर्दम्य लालसा असते. माणसाच्या विविध भूमिका आणि कलेची निर्मिती आणि कलेतील स्वतःला हरवलेपण यातूनच निर्माण होत असेल का? विद्याधरांची कथानुभूती अशी अंतर्मुख होऊन विचार करावयास लावते. जीवन तेच पण त्यातील प्रत्येक मणी मात्र नवा. ही सनातन 'माळ' विद्याधर पुंडलिकांना सुचवायची असावी अशी, विश्वमानवाची सनातन भावानुभूती 'माळ' मधून व्यक्त होत जाते ती या विधिनाट्याच्या आधारे.

दुसऱ्याही एका तऱ्हेनं ही विधिनाट्यरूप कथावस्तू त्यातील शब्द उल्लेखातून भावत जाते. वारी हे एक व्रत आहे. 'वारी' व्रताचा लोकबंध स्वीकारतो तो वारकरी. दिंडी हे त्याचं माध्यम वारी आणि माळ, टाळ, मृदुंग, पताका, ज्ञानोबा तुकारामाचा घोष ही त्या व्रताची विधिविधाने. हे व्रत एकदा घेतलं की कैवल्याच्या

भेटीशिवाय निःसंगपणा प्राप्त होऊन कैवल्याशी अद्वैत साधले जाईपर्यंत टाकायचं नाही. प्रत्येक वारीत अनन्यपणे पुढे रेटण्याचा प्रयत्न करायचा. खरा भागवतधर्मी म्हणजे पांडुरंगासमोर उधळलेल्या गुलालाचा अन् बुक्क्यांचा एक एक कण! कण! कसं व्हायचं माणसानं कणांसारखं? देह कसा विसरायचा? आसक्ती कशी सोडायची? कर्म कसं टाळायचं? प्रारब्धाचा हिशेब कसा चुकता करायचा? पण काशीताई काय विचार करत असतील? 'सुखाचे ओतले। दिसले श्रीमुख चांगले ... होता दृष्टा दृष्टी। ताप गेला उठाउठी ... तुका म्हणे...' मास्तरांनी त्या अभंगावरच गुलाल बुक्का उधळला. अशा नाट्यमय शैलीतून विद्याधर पुंडलिक, 'वारीत अस्तित्त्व हरवणं' मांडतात. असं अस्तित्त्व हरवायचं. अशी वहिवाट सांभाळायची. त्यात हरवण्यातलं समाधान हाही एक नवाच जन्म! तो भोगण्याचं हे व्रत. इंद्रियांना वळण लावून सांभाळायचं, जीवनातलं सुखातलं सुख त्यात असं मानायचं. अशी अनन्यनिष्ठा ठेवून पूर्वलोकबंधातलं जगणं विसरून जायचं. 'पाडिले वळण इंद्रिया सकळा। भाव तो निराळा नाही तेथे।' विधिनाट्य हा असा जगण्याचा विषय असतो. मात्र हे विधिनाट्यही पुन्हा लोकसापेक्षच असतं. लोकबंधच असत. महाराष्ट्राच्या मानसातला हा लोकबंध, मानणं म्हणजे घटकलोकत्व जतन करणं, हे व्रत सांभाळताना कधी 'वाट मळणारच,' वासनादेह आणि विठ्ठलाची वाट यात संघर्ष होणारच पण उतून मातून घेतला वसा टाकायचा नाही हाच संतांचा निरोप. केसकर मास्तर आणि काशीताई नायक-नायिका पात्रं एकमेकांना सांगतात आणि वारकऱ्यांच्या समुद्रात स्वतःला हरवून घेतात. विद्याधर पुंडलिकांनी कथावस्तूला पूर्णत्त्व देताना त्यांचा संवाद व्यंगात्मकतेने मांडला आहे. – मास्तर एकदम थबकले काशीताईचा हात अगदी घट्ट दाबून त्यांनी देवळाकडे पाहत धडधडत्या छातीनं विचारलं 'मग काय करायचं काशीताई?' काशीताईंनी खालच्याखाली दुसऱ्या हातानं डोळे पुसले अन् त्या कापऱ्या आवाजात म्हणाल्या, ''काही नाही–'' ''फक्त दर्शनच ना आता?'' ''हो दर्शनच, दुसरं काय आहे मास्तर आता? येते मी.'' ''या.'' मास्तरांनी तो ओला हात सोडून दिला.

विधिनाट्य सापेक्ष शब्द लोकबंध, विधिविधाने, पात्रे, प्रसंग आणि पर्यावरण याबरोबरच संत वचनांचे संदर्भ यातून वारीचे एक समग्र रूप आपल्या डोळ्यासमोर 'माळ' या केंद्रवर्ती लोकबंधात्मक प्रतिमेतून भावत जाते. 'वारी जवळ आली' त्यातली – 'नेहमीप्रमाणे आठवी दिंडी तात्या संतांची' त्यातली 'तिसऱ्या नंबरची जागा मास्तरांची' नाहीतरी कितीतरी गोष्टी या वारीत ठरून गेल्या होत्या. हे चराचर नव्हतं तेव्हापासूनची कैवल्याची ही पहिली आनंदी



वाट-आळंदीला जाऊन प्रथम घेतलेल्या ज्ञानदेवांना पुसत पुसत पुढे जाणारी! 'खंडोबाची जेजुरी आली', 'शाळेच्या आवारात वळकट्या, पिशव्या, गाठी येऊन पडल्या.' 'जेवणं आटोपली. बुवांचं प्रवचन झालं. मागून आरती झाली. सगळी जण झोपी गेली.' जेजुरीच्या डोंगरावरून मास्तर आणि काशीताईला वारी दिसली– 'खालती लांबवू पसरलेली वारी वेगवेगळ्या रंगाचे ठिपके असलेल्या एखाद्या प्रचंड जनावराच्या धुडासारखी वळवळत थरथरत होती.' 'सकाळी माळशिरसहून वारी पुढे सरकली,' सोपानबाबांनी त्यांचा अभंग घ्यायला सांगितला. मास्तरांना स्वतःची वारी आठवली, 'वारी तशी जुनी, तशी नवींही पाणी तेच दरक्षणाला ताजे.' 'दिंडी सरकू लागली', 'पावसाच्या कलत्या धारा वारकऱ्यांना झोडपू लागल्या. पालखी वेडी वाकडी होऊन ती भंगली, फुटली, होती की नव्हती अशी नाहीशी झाली. पण मास्तरांनी आपली वारीतली तिसऱ्या नंबरची जागा सोडली नाही.' 'सगळ्या पालख्या एकत्र झाल्या युगायुगाच्या भेटी झाल्या,' 'मग दिंडी फुटली' (अर्थात वारीही फुटली). कंठ दाटून आले. पुढच्या वर्षाचे वायदे अन् संकल्प बोलून झाले. गाठीभेटींची वचनं झाली. अखेरची उराऊरी भेट झाली.' 'एक यात्रा संपली' 'समोरचं चंद्रभागेचं वाळवंट वैष्णवांनी नुसतं फुलून गेलं होतं. अनेक रंगांचा आणि वस्त्रांचा वारकऱ्यांचा समुद्र वरखाली हेलकावत होता. अशा उल्लेखातून वारीचं हे एकजिनसी, सेंद्रिय प्रवाही व्यक्तित्त्व विद्याधर पुंडलिक नेमकेपणानं संयतशील गतिमान आणि हालचाली सहज सुचित करणाऱ्या लोकमान्य वारीसापेक्ष वर्णनातून आपल्या डोळ्यासमोर उभं करतात. हे वारीचं अनादि अनंत एखाद्या जलौघासारखं नित्यनूतन रूप उभं राहतं आणि ते भावत जातं ते त्यातील वारकरी, दिंडी, वारकऱ्यांचं वागणं, बोलणं, पुढे पुढे सरकणं, भावोत्कटतेनं आळवणं यातून. या अस्तित्वाला, वारीच्या जगण्याला एक अनादि नादलय आणि प्रवाहीपण आपल्याला अनुभवास येते. संवाद लयीतून आपणास पुढेपुढे नेते, ती सरकते तसे आपण सरकतो. वारी मुक्कामी पडते तसे आपण मुक्काम करतो, अनुभवू लागतो. हे या कथा सादरीकरणातलं सामर्थ्य म्हणता येईल. खरं तर येथे कथेचे मौखिक सादरीकरण नाही. परंतु विद्याधरांची कथानिवेदन पद्धती ही अशा कथनपद्धतीने येते असे वाटते. याचे कारणही त्यांच्या नाट्यमय मांडणीपेक्षा लोकबंधात्मक प्रकटीकरण हेच आहे! वारीचा लय अखेर अथांगतेत होतो हे वारीचं विश्वात्मकत्व-व्यापकत्व वारकऱ्यांच्या 'समुद्र' च्या प्रतिमेतून लेखक उभं करतो.

या रूपदर्शनाच्या सामर्थ्याला एके ठिकाणी मात्र गालबोट लागल्यासारखं

वाटतं. 'वारी' चं रूप अनेक रंगी असलं तरी एकात्म आहे. ते विकट नाही भावोत्कट आहे. ते केवळ 'अजस्र' नाही ते भव्योदात्त आहे. ते केवळ 'वळवळते' नाही. म्हणूनच विद्याधर पुंडलिकांनी डोंगरावरून दिसणारं वारीचं रूप 'जनावराच्या धुडा' च्या प्रतिमेतून मांडण्याऐवजी दुथडी भरून वाहणाऱ्या जलौघाच्या स्वरूपात मांडले असते, तर त्यांनी 'वारी' चा केलेला शेवट अधिक उत्कटपणे भावला असता. कदाचित पृथगात्मतेचा विलय स्वतःत सामावून टाकणारं विक्राळ अस्तित्व त्यांच्या मनात काशीताई आणि मास्तर यांच्या मनातील भासमान पृथगात्मतेतून साकारलं असेल! परंतु शाब्दरूपातील कलात्मक अनुभूती घेतांना ही प्रतिमा लोकबधांच्या कलात्मक मांडणीच्या निकषावर अपरिहार्यत्वाने टिकत नाही असे वाटते.

वारीच्या सेंद्रिय रूपातील अवयव किंवा घटक म्हणजे वारकरी. या वारीत मास्तर आणि काशीताई या नायक–नायिका पात्रांच्या स्वरूपात, हे वारीतील घटक जाणवू लागतात. आणि कथावस्तू एका वेगळ्या स्तरावर भावू लागते. दोन कावल्या जीवांना आभासात्मकतेने जाणवणाऱ्या एकटेपणातून सुटण्यासाठी हे जीव वारीतील लोकपण भोगण्याचा प्रयत्न करताहेत का? त्यांची जीवन कहाणी वारीच्या प्रवाहात वाहतांना दिसते. 'वारीत राहूनही वारीत नाही' अशी जाणीव होणं हे त्याचं सूचक आहे. 'जळती डोंगर पापांचे' अशी श्रद्धा ठेवून वारीत समाविष्ट झालेल्या या जीवांना आपल्या जीवन कोषातील आर्तता वारीत येऊन सुद्धा विसरता येत नाही. त्यातून त्यांच्या मनात एक भावसंघर्ष सुरू होतो. पर्यायाने 'माळ' ही कथा 'माळे' तील दोन जीवांची, दोन घटकलोकची कथा वाटू लागते. ती त्या दोन जीवांची कथा हे खरे. असे असूनही या दोन जीवांच्या एकत्र येण्याविषयीची हुरहूर, उत्कंठा निर्माण करून संसारी लोकजीवनातील घटकलोकत्वाचा आविष्कार घडविण्यात आणि मानवाचा प्राणीपातळीवरील जीवनापासून कैवल्यापर्यंतच्या प्रवासाची अनुभूती घडविण्यात विद्याधर पुंडलिक यशस्वी झाले आहेत. या अनुभूतीने वाचकाच्या मनात जीवनातील दोन स्तरावरील भावतरंग उमटविण्याचे सामर्थ्य विद्याधर पुंडलिकांच्या शब्दकळेने नक्कीच प्रकटविले आहे. ही भावानुभूती देखील सनातन स्वरूपाची आहे. व्यंगात्म ढंगाने ती कथेत प्रकटते. वारी बरोबरच वाचकाची या दोन घटकलोकच्या कहाणी संबंधातील उत्कंठा पुढे पुढे सरकत जाते. मास्तरांची धडधडती छाती, ही भावना मुळातच सुचविते 'मघाशी आपल्या डोळ्यात पाणी आलं ते काशीताईच्या आठवणीनीही आलं–नुसत्या ज्ञानोबांच्या पायाच्या कल्पनेनं नाही. हो उगाच लपवायचं कशाला स्वतःपासून ?' असा कबुलीजबाब व्यक्त करणं, काशीताईचं नखशीखांत निरीक्षण करणं, त्यांची 'ती' शी तुलना करणं, आमटी करतांना काशीताईंचं मास्तरांशी आणि मास्तरांचं काशीताईशी भावभरलेपणानं जवळीक साधणं, एकमेकांच्या जीवनातलं दुःख एकमेकांजवळ जवळीकेनं ठेवणं, रात्रीच्या वेळी 'आसक्ती कशी सोडायची? कर्म कसं टाळायचं? प्रारब्धाचा हिशेब कसा चुकता करायचा?' असा विचार करता करता 'काशीताई काय विचार करीत असतील?' असा विचार मनात येणं. आपला घर सोडण्याचा विचार काशीताईंनी मास्तरांजवळ भावूकपणे मांडणं, दोघांनी जेजुरीच्या खंडेरायाचं दर्शन घेऊन येणं, येता येता सुखदुःख सांगणं, एकत्र बसून जेवणं, एकमेकांना एकमेकाचं अन्न घेण्याचा आग्रह करणं, कच्चं अन्न मास्तरांचं नाव घेत दर बुधवारी खाण्याचा उल्लेख करणं. ''मोहात पाडता काय काशीताई?'' मिश्किलपणे विचारणं, चंद्रभागा पार करताना काशीतांचा हात हातात घेणं, काशीताईंनी तो घट्ट पकडणं, काशीताईंच्या डोळ्यांतून मास्तराच्या सहवासाचे समाधान ओघळणं, येथपर्यंत हे दोन जीव बहुधा एकत्र येतील असे वाटावे एवढे वाचकाला उत्कंठित करण्यात विद्याधर यशस्वी झाले आहेत. दोघांनी आपली वाट मळण्याचा कबुलीजबाब एकमेकांना देणं, या गोष्टी वाचकांच्या मनात मानवी वासनांची–भावनांची आवर्तने नक्कीच निर्माण करतात. क्षणभर दोघेही 'जळती डोंगर पापांच' या श्रद्धेनं व्रतस्थपणे आले आहेत, कैवल्याच्या ओढीत माऊलींच्या पदराआडून आले आहेत हे विसरायला लावणारी कलात्मकता, व्यंगात्मकता पुंडलिकांनी नक्की साधली आहे. अर्थात या भावकथेतून विद्याधर पुंडलिकांना प्रातिनिधिकत्वाने वारकऱ्याच्या मनातील विविध प्रकारची आर्तता प्रकट करावयाची आहे हेच स्पष्ट होते. अशा, असंख्य आर्तप्रवाहांना स्वतःचा आर्तपणा विसरता येत नसताही विसरायला लावणारा जलौघ म्हणजे वारी. हे वारीचं व्यापक समावेशक रूप विद्याधर पुंडलिकांना या भावानुभूतीतून मांडावयाचे दिसते.

'वारी' चे रूप, वारीची कथा किंवा केसकर मास्तर आणि काशीताई या वारकऱ्यांची ही कथा म्हणजे 'माळ'. ही कथा वाचकांच्या मनाला विशेषत्वाने स्पर्श होते ती लोकबंधात्मक शब्दकळेच्या कलात्मक मांडणीमधून. विद्याधर पुंडलिकांचा कथानिवेदनाचा खास असा ढंग या कलात्मक मांडणीमधून जाणवतो. ही मांडणी चमत्कृतिपूर्ण, कल्पनाविलास, भावुकता आणि गतिमानता, व्यंगात्मकता आणि मिश्किलपणा, वेधकता आणि संवादात्मकता, घटना प्रसंग यानुरूप आलेल्या संत संदर्भातून होत जाते. ही मांडणी स्वाभाविकपणे आणि

कलात्मक जाणिवेतून प्रकटलेल्या अपरिहार्यतेतून आलेली असल्याने 'वारी' च्या प्रवासाबरोबरच वारीच्या गर्भात सामावलेल्या मानवी जीवनाची आर्तता, उत्कंठपूर्णता मनाला स्पर्श होते आणि कथा भावत जाते. क्षणभर वाचक 'वारी' च्या 'लोक' मध्ये घटकलोक होऊन अनुभूती घेऊ लागतो.

वाटेवरल्या छोट्याछोट्या गावातून वारी आळंदीहून पंढरीला निघाली आहे. आडवा हात पसरला आहे असे वाटणाऱ्या वडाच्या 'त्या' फांदीवर बसताना वडाच्या 'खांद्यावर बसून वाट' पाहिल्यासारखे वाटल्याचा उल्लेख, रस्त्याने 'फडा काढलेला' असणे, खोल पोकळीतून 'वारकरी' येणे, तसाच धरणींच्या खोलीतून 'ज्ञानोबा तुकाराम' चा 'घोष' 'घुमत' येणे, भगव्या पताकांचे 'थवे' झाडातून आणि आकाशातून आल्यासारखे वाटणे, या उल्लेखातून विश्वातून वारीचे आकारणे घडते आहे असे वाटते. वारी जन्माची उत्कंठा आतुरता वाढते आहे. तो 'वटवृक्ष' (अक्षयवट) आपल्या लहानग्यांना सामावून घेण्याचा इशारा करतांना जणू आडवा हात पसरतो आहे. ही वारीची 'अनादी' 'वाट' ज्ञानदेवांना 'पुसत' निघणे, या उल्लेखातून वाचकाला एका विशिष्ट भावलोकात नेले जाते. विद्याधर पुंडलिकांची 'माळ' 'लोक' शी निगडित त्यांच्या जीवनातून आणि विधिनाट्याच्या भावविश्वातून आली आहे अशी अपरिहार्य शब्दकळा साधण्याचा प्रयत्न विद्याधरांची कथानुभूती करते, हे कथावस्तूचे शब्दरूप वाचतांना सहज जाणवते. गुलाल माखणे, कणासारखं होणे, पाणी कापणे, वांग शितकडणे, पंढरीची तीस वर्षाची सनद असणे, बाबानं (पावसानं) डोळे वटारणे, तमाखु फिणणे, यज्ञकर्म करणे, असे कितीतरी लोकबंध (वाक्प्रचार) 'वारी' तील लोकजीवनात वाचकाला सहज घेऊन जातात. वारीत नागर, ग्रामीण या दोन्ही जीवनाचे असंख्य भेदांचे व्यामिश्र लोकजीवन उभं राहिलं आहे. त्यातूनच वारीचं अवघेपण साकारलं आहे. वारीत मास्तर आणि काशीताई यांच्या रूपानं संसारातलं आर्तपण सांडण्यासाठी वारीचं वारीपण कसं आकारतं, या वारीपणात ही जीवनकहाणी साथसंगत करीत असते. 'कैवल्यांच्या वाटेवर' 'आसक्ती' सुटता सुटत नाही. तरी निदान दुःखं मोकळी होतात. वाट सरत जाते. 'माळ' मधील 'दीपमाळे' ची प्रतिमा विशेष बोलकी आहे. जीवन म्हणजे देवापुढील जन्माला आल्यापासून पडून जाईपर्यंतची दीपमाळ. दुःखाचे काळेकुळकुळीत दगडासारखे 'खवले', मधूनच उगवणाऱ्या 'हिरवळीनं' सुखवायचं आणि दगड फोडून जिवानिशी बाहेर झेपावणाऱ्या 'पिंपळाच्या फांदी' सारखं जगायचं असतं. काशीताई, मास्तर असे जगतात. काशीताईंची भावव्यथा जीव गोळा होणे, वाट फुटेल तिकडे जाणे, धरणं धरणे, डोकं आपटणे, अवतार



होणे इ. स्त्रीसुलभ लोकबंधातून प्रकटतात तर मास्तरांच्या अनुभूती मोहात पाडणे, लगाम घालणे, वाट मळणे, झुंबड उडणे, इंद्रिय लालचावणे अशा संप्रदायातून प्रकटतात.

माळ 'कथेतील वारीतील एकूण अनुभूती', 'अनादी वाट', 'पालखी', दिंडी, दिंडी असणे, दिंडी फुटणे, योमिया दुर्लभ तो प्रत्यक्ष पाहणे, विठ्ठलाचा सनातन नाद असणे, सुखदुःखाचे फेरे, माळ घट्ट धरणे, तुकारामाचा मरणाचा अनुपम सोहळा अनुभवणे, ज्ञानोबाला वाट पुसणे, संताचे निरोपे असणे, निरोपाचे प्रवचन, पालख्यांचे एक होणे, युगायुगांची भेट होणे, अभंग घेणे, निःसंग होणे अशा लोकबंधातून प्रकटतात.

शब्दकळेच्या चमत्कृतिपूर्ण मांडणीबरोबरच संवादात्मकता हा विद्याधर पुंडलिकांचा शैलीविशेष जाणवतो. या संवादातून त्यांच्या खास ढंगातला मिश्किलपणा आणि नाट्यमयता जाणवते. प्रसंग चित्रण करतांना सहज संवाद आणि प्रसंगसापेक्ष शब्दरूपे यातून कथावस्तू कलात्मक रूप धारण करते. हे संवाद आणि प्रसंग, बायकांचं स्वयंपाकात लुडबुडणे, माया पुढे धावणे, वारीच्या वाटेवर ताडीचं दुकान अयोग्य वाटणे, बाईचा (दारूचा) नाद लागणे, प्रेमानं कठोर निश्चय तडीस न जाणे, सुखदुःख वाटून घेणे, प्रारब्धाचा हिशेब चुकवणे, देव सगळे पाहत असणे, भौतिक श्रीमंतीत सुखाची कल्पना सामावलेली असणे, पाप जळून जाणे, जत्रा फुलणे, देवानं वेगळं करणे, अशा अनेक कल्पनाबंधातून आकारले आहेत. संवाद आणि प्रसंगातील अनेक क्षणचित्रे अगदी शब्दाच्या कुंचल्यानं लोकबंधात्मक शब्दांचा चमत्कृतिपूर्ण उपयोग करून चितारतात आणि तो प्रसंग रंग, रूप, नाद, लय, स्पर्श यासह उभा राहतो, ''कोंडिबाच्या पखवाजाच्या 'घुमून आलेल्या' 'तरंगत्या थापेनं ते दुकल'' किंवा ''बोला मास्तर काय घेऊ'' ''कोणतं घेतोस?'' ''अवतारांच्या राशी घेतोस?'' आणि अभंग सुरू झाला, अमृताच्या 'चिपळ्या सुळसुळल्या', कोंडीबाची 'मृदुंगांची थाप कडाडली', 'झांजा शांत झणझणल्या' अमृताच्या गोड आवाजात आसमंतात पसरलेल्या उन्हाची 'कोवळी ओल' आली. तो 'घोळवून घोळवून' म्हणू लागला किंवा मध्येच मास्तर एकदम चुकून जागे झाले कोणाच्यातरी आवाजाने. त्यांनी त्या दिशेनं पाहिलं. कोनाड्यात ठेवलेल्या दिव्याजवळ बसलेले सोपानकाका अगदी हळू हळू 'कापऱ्या आवाजात' खोकत खोकत 'पांडुरंग पांडुरंग' म्हणत होते. अर्धवट उजेडातली 'कानटोपी' घातलेली त्यांची आकृती 'गाठोड्याला मुंडके फुटावे' तशी दिसत होती. त्यांचं डोकं 'डुगडुगत' होतं. भिंतीला टेकून ठेवलेल्या पताकांच्या 'काठ्यांवर या

गाठोड्याची सावली' एखाद्या झुलत राहणाऱ्या वेड्यावाकड्या अस्वलाप्रमाणे पडली होती. किंवा खरं आहे काशीताई पण नुसतं देवाच्या वाटेवर जाताहेत असं नाही 'डोकं टेकायला' बुवांची मांडी, एक हात 'माळेवर' दुसरा 'अमृताच्या हाती', भोवताली आपण. तुकोबा म्हणतात तसा मरणाचा अनुभव सोहळा चाललाय हा! वर्णनाप्रमाणेच संवादातून हा ढंग कसा अवतरतो हे पाहण्यासारखं आहे. उदा. नाही मास्तर, आता सहन होत नाही, माझ्याच्यानं! पांडुरंगाच्या पायी डोकं ठेवून त्याची क्षमा मागणार अन् सुटणार या नरकातून! वाटलं होतं, इतकी वर्ष खेटे घालते आहे विठ्ठलाकडे. जळेल त्याच पाप. पण नाही अजून नाही. मास्तर, खरंच, खरंच माणसाची पापं जळून जातात का हो? मास्तर दचकले. उसासा टाकून म्हणाले, 'आता मला तरी काय माहीत काशीताई?' तुकोबा म्हणून गेले आहेत- ''घेता नाम विठ्ठलाचे जळती डोंगर पापांचे-आपल्या सारख्यांनी त्यांच्यावर आपली श्रद्धा ठेवायची काय?'' ''दोघंही डोंगर उतरली.'' अशी अनेक उदाहरणं वाचकाला कथेत गुंतून ठेवतात. सोपानबाबांचं आजारी पडणं, सगळ्या पालख्या एकत्र होणं, समोरचं चंद्रभागेचं वाळवंट ... आता फक्त दोनच, माकडाचा सिनेमा पाहणे या प्रसंगीचे संवाद असे लक्ष्यवेधक आहे.

अशा प्रसंगवर्णनातून आणि संवादातून विद्याधर पुंडलिक वारीचं वारीपण सांभाळतातच, त्याचबरोबर घटकांकडे त्यांचे दुर्लक्ष होत नाही. कथानकाला गौण स्थान देऊन लोकबंधात्मक जाणिवा शाब्दरूपातून प्रकट करीत विद्याधर पुंडलिकांची कथा आकार घेते. पात्रे प्रसंग आणि घटना, वर्णने, प्रतिमा, संवाद आणि संदर्भाच्या अपरिहार्यतेतून स्वतःच्या खास नाट्यमय ढंगातून कथा सादर केल्या जातात. ह्या त्यांच्या ढंगामुळेच मांडणीत नाट्यमयता येते आणि वाचक जणू कथावस्तूत स्वतःला हरवून बसतो. आणि त्यातीलच एक घटकलोक बनून स. शि. भावे म्हणतात तसे एकटेपण विसरून जातो. हेच त्या कथेचे सामर्थ्य वाटते. हे घटकलोकत्व प्राप्त झाल्याने वाचक आपल्या 'लोक' मध्ये अंतर्मुख होऊन कथानुभव घेऊ लागतो. आणि लोकबंधांच्या पातळीवर कथा मनात व्यापक अनुभूती घडवत जाते. 'माळ' या कथेतून वारीचे सनातनत्त्व पुन्हा पुन्हा मनात ठसत जाते आणि ज्ञानोबातुकारामाची 'माळ' ही विठ्ठलाचा नामगजर करीत राहते आणि कथानुभूती मनात रेंगाळत राहते.